



श्री. अमोल पालेकर गगनविहारी बोराटेचा सन्मान करीत आहेत.




क्रीडा विभागाचा पारितोषिक वितरण समारंभ : प्रमुख पाहुणे श्री. एम्. जी. पटवर्धन यांचा प्राचार्य नवलगुंदकर सत्कार करीत आहेत.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

# मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५

# ' मॉडर्न '

## १९८६-८७

**संपादन समिती**

अध्यक्ष : प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर

सल्लागार : उपप्राचार्य प्रा. प. स. चिरपुटकर

**समिती सदस्य :**

प्रा. बा. गो. वाणी
प्रा. गीताराम गायकवाड
प्रा. व. य. भिडये
प्रा. सुरेखा परब
प्रा. निर्मला मोने
प्रा. अमृता सातभाई

**संपादक :**

डॉ. वि. भा. देशपांडे

**विद्यार्थी - प्रतिनिधी :**

राजेश घेवडे
द्वि. व. शास्त्र

मुखपृष्ठ : रविमुकुल

प्रकाशक : प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर
मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

मुद्रक : श्री. दिलीप माजगावकर
साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

# संपादकीय / वि. भा. देशपांडे

या वर्षीचा नियतकालिकाचा अंक वेळेवर आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या लेखनगुणांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यातून नियतकालिकासाठी काही साहित्य हाती यावे म्हणून आम्ही एक लेखनस्पर्धा आयोजित केली होती. दिलेल्या विषय-विभागांमध्ये काही विषयांना चांगला प्रतिसाद मिळाला. त्यातूनच काही लेख–कथा–कविता इत्यादींची निवड या अंकासाठी केली. विद्यार्थ्यांच्या लेखनाबरोबरच सहकारी प्राध्यापकांनीही आपापल्या आवडीच्या विषयांवर लेखन करावे असे आग्रहाचे आवाहन आम्ही केले. आनंदाची गोष्ट म्हणजे काही प्राध्यापक–सहकाऱ्यांनी अभ्यासपूर्ण लेख दिले. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्या लेखन संयोगामुळे या अंकाला पुरेसे वाचनीय साहित्य उपलब्ध झाले.

महाविद्यालयाच्या प्रशासकीय स्तरावर यंदापासून बदल घडलेला आहे. गेल्या वर्षी नियामक मडळ जसे नव्याने निवडून आले, तसेच प्राचार्य, उपप्राचार्य यांचीही नियुक्ती या वर्षी नव्याने झाली. प्राचार्य स. य. गंभीर यांनी स्वेच्छेने प्राचार्यपदाचा राजीनामा दिल्यावर प्रा. डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांची नियुक्ती रीतसर पद्धतीने झाली. डॉ. पाथरे आणि प्रा. आपटे यांची उपप्राचार्य म्हणून नेमणूक झाली. या तिघांचे मनःपूर्वक स्वागत. नवीन प्राचार्यांनी आपल्या कारकीर्दीच्या आरंभ–वर्षात काही नवे विषय महाविद्यालयात सुरू केले. वाढते विषय आणि वाढती विद्यार्थीसंख्या ध्यानात घेऊन महाविद्यालयाच्या इमारतीचाही विस्तार सुरू झालेला आहे. इमारतीच्या विस्ताराबरोबर विद्यार्थी गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने अनेक उपक्रम, कार्यक्रम प्रत्यक्षात आणले गेले.

या वर्षी शालांत परीक्षेत उत्तम यश संपादन करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला. विशेष म्हणजे बोर्डाच्या गुणवत्ता यादीतील पाच विद्यार्थिनींचा व ऐंशी टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनींचा महाविद्यालयातील प्रवेश हा अभिमानाचा विषय आहे.

काळाच्या नव्या आवाहनाला सामोरे जाण्यासाठी अनेक विषय अभ्यासात येणे महत्त्वाचे असते. ती दूरदृष्टी समोर ठेवून यंदापासून काही नवे विषय महाविद्यालयाने सुरू केले. १) इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्यूटर सायन्स, वरिष्ठ महाविद्यालयासाठी. २) संस्कृत आणि ग्रंथालय शास्त्र, कनिष्ठ महाविद्यालयासाठी. ३) नाटयशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम. हे विषय आरंभित करीत असतानाच पुढील वाटचालही डोळ्यासमोर आहे. शासकीय मान्यता मिळाल्यास इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्यूटर सायन्स हे विषय कनिष्ठ महाविद्यालयातही सुरू होऊ शकतील. त्यामध्ये पदविका । प्रशस्तिपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार आहे. तसेच वर्कशॉप टेक्नॉलॉजी या विषयाचा पदविका । प्रशस्तिपत्र हा अभ्यासक्रम सुरू करण्याचे आमच्या योजनेत आहे.

यंदाच्या वर्षी अनेक शिक्षणप्रेमींनी निरनिराळ्या संदर्भात गुणी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या आणि पारितोषिके आमच्या सुपूर्द केली. त्यामध्ये सर्वश्री शेणोलीकर, गाडगीळ, ताटके, कानेटकर, संगमनेरकर, रासने आदींचा समावेश आहे. या सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत. अशाच प्रकारच्या शिष्यवृत्त्या क्रीडा आणि कला क्षेत्रांतील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हाव्यात म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत. या संदर्भात आमचा एक विद्यार्थी राजेंद्र यादव

याची जपानमधील ज्यूदो प्रशिक्षणासाठी निवड झाली आणि तो ते शिक्षण घेऊन आला याचा आम्हाला आवर्जून उल्लेख करताना आनंद होतो.

अनेक नवे विषय सुरू होत असल्याने आणि विद्यार्थी संख्याही वाढल्याने नव्या वर्गांची आवश्यकता भासत आहे. ती गृहीत धरून सहा नवीन वर्ग–खोल्यांचे बांधकाम पूर्ण होत आलेले आहे. त्याचबरोबर गणकयंत्र केंद्राच्या उभारणीचे प्रयत्न सुरू झालेले आहेत.

यंदा आम्ही अकरावी, बारावीमधील आणि मेडिकल–इंजिनिअरिंग–आर्किटेक्चर इत्यादी शाखांकडे जाणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा एक मेळावा आयोजित केला होता, त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती ध्यानात घेऊन यंदाचे स्नेहसंमेलन दोन दिवसात अतिशय आटोपशीर आणि साध्या रीतीने केले. त्याचबरोबर परिस्थितीची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी तीन हजार आठशे रुपये निधी गोळा केला आणि तो मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश श्री. सावंत यांच्या हस्ते पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे दिला.

विविध विषय–विभागांमध्ये चर्चासत्रे–परिसंवाद घडवून आणणे ही आपल्या महाविद्यालयाची खासियत आहे. या वर्षी प्रसिद्ध कवी आणि नाटककार श्री. वि. वा. शिवाडकर यांना ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल साहित्य संघटना आणि मराठी विभाग यांनी एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यामध्ये डॉ. अनुराधा पोतदार, प्रा. के. रं. शिरवाडकर, श्री. अनंतराव कुलकर्णी, डॉ. वि. भा. देशपांडे यांनी आपले विचार मांडले. अध्यक्ष होते डॉ. व. दि. कुलकर्णी. कै. श्री. म. माटे यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने एक चर्चासत्र लौकरच होणार आहे. तसेच अर्थशास्त्र विभागाच्या वतीनेही एक चर्चासत्र आयोजित करण्यात येत आहे.

जीवशास्त्र विभागाने एक स्वतंत्र उपक्रम राबवला. त्यासाठी त्यांना सुमारे एक लाख रुपये अनुदान प्राप्त झाले. पदव्युत्तर संशोधन केंद्र म्हणून या विभागाने केलेली कामगिरी स्पृहणीय आहे.

वाणिज्य विभागात काही महत्त्वाचे उपक्रम हाती घेण्याचा मानस आहे. विशेषत: विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच नोकरी–व्यवसाय मिळवताना त्याचा उपयोग व्हावा. अशा उपक्रमांमध्ये कम्युनिकेशन स्कीम, प्रॅक्टिकल अकाउंटिंग, सेल्समनशिप यासारखे अभ्यासक्रम विद्यापीठाच्या अभ्यासाव्यतिरिक्त आयोजित करीत आहोत.

स्वायत्त महाविद्यालयाचा विचार शिक्षणक्षेत्रात सध्या चर्चिला जातो आहे. आमचीही वाटचाल त्या दिशेने काही प्रमाणात चालू आहे. त्यासाठी ज्या अनेक गोष्टींची तयारी करावी लागणार आहे त्यामध्ये प्राध्यापकांची गुणवत्ता वाढणे ही महत्त्वाची गोष्ट. त्यासाठी पूर्वतयारी म्हणून काहींनी पीएच्. डी. पदवी संपादन केली आहे, काही तयारीत आहेत. तसेच एम्. फील्. चे काम पूर्ण करणारे आणि त्यासाठी नोंदणी केलेले प्राध्यापक यांची संख्या समाधानकारकरीत्या वाढताना दिसत आहे.

सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत आपल्या महाविद्यालयाने एक विकास–आराखडा सादर केलेला आहे. त्या योजनेतील मूलभूत साहाय्य म्हणून एक लाख पंचावन्न हजार रुपये मंजूर झालेले आहेत. त्यातून ग्रंथ व उपकरणे उपलब्ध होतील.

अशा विविध प्रकारच्या योजना, उपक्रम यांनी हे वर्ष नेहमीप्रमाणेच गजबजलेले आहे. त्याचे तपशिलवार अहवाल अंकात दिलेले आहेत, त्यावरून एकूण कार्याचा आलेख डोळ्यासमोर येऊ शकेल. महाविद्यालयाच्या आरंभापासून वाणिज्य विभागात काम करणारे आमचे ज्येष्ठ सहकारी प्राध्यापक एम. आर. भावे हे नुकतेच निवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ अनुभवाचा आणि ज्ञानाचा आमच्या विद्यार्थ्यांना भरपूर फायदा झाला. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. तसेच त्यांना दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा.

विस्तार आणि विकास कार्यक्रमात महाविद्यालय मग्न असतानाच वाणिज्य विभागातील आमच्या एक सहकारी

सौ. ज्योत्स्ना गोडबोले यांचे अकाली निधन झाले. अल्पशा आजाराने त्यांचे झालेले निधन ही आम्हा साऱ्यानांच धक्कादायक अशी गोष्ट होती. त्यांच्या कार्याच्या स्मृती आमच्या मनात दीर्घकाळ राहतील.

कलाक्षेत्रातील स्मिता पाटील आणि अरविंद देशपांडे यांचे निधन हेही असेच अकाली, मनाला अस्वस्थ करून जाणारे ठरले. या सर्वांच्या स्मृतींना आमचे अभिवादन.

नियतकालिकाचा अंक हाती येईपर्यंत अनेकांचे मार्गदर्शन, सल्ला, सहकार्य अनिवार्य असते. प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर, उपप्राचार्य प्रा. प. स. चिरपुटकर यांचे बहुमोल मार्गदर्शन झाले. प्रा. वाणी, प्रा. निर्मला मोने, प्रा. सुरेखा परब, प्रा. गीताराम गायकवाड, प्रा. विजय जोशी यांच्या सहकार्याविना कामाला गती येणे शक्यच नव्हते. तसेच रजिस्ट्रार श्री. वाय. पी. देशपांडे, कार्यालय अधीक्षक श्री. एस. वाय. कुलकर्णी, कार्यालयीन कर्मचारी, सेवक आणि संबंधित सर्व सहकारी प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

श्री. रविमुकुल यांनी तत्परतेने आकर्षक मुखपृष्ठ तयार करून दिले. साप्ताहिक मुद्रणचे श्री. दिलीप माजगावकर यांनी योग्य वेळात उत्तम मुद्रण करून दिले.

ह्या सर्वांच्या सहकार्याने हा अंक आपल्या हाती मी वेळेवर देऊ शकलो.

सर्वांचे मनःपूर्वक आभार.

□ □



# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


- गर्द : प्रा. सौ. मेधा सिधये...९
- अमली पदार्थांचे सेवन एक व्यक्तिमत्व विकृती : प्रा. सौ. अमृता ओक...१२
- आणि दिवस सुरू होतो : कु. ज्योत्स्ना शिदिड...१६
- गंगा तेरा पानी अमृत : राजेंद्र पिंगळे...१७
- 'बाई'च्या निमित्ताने : राजश्री देशमुख...१९
- आभाळाचे गाणे : कोजागिरी श्री. कुलकर्णी...२१
- गुलाम : स्वप्नगंधा दिवेकर...२३
- कॉलेज जीवन-कालचे आणि आजचे : वर्षा दीक्षित...२४
- असा मी, तसा मी, कसा मी कळेना : उमा गोविंद दातार...२६
- तत्त्वनिष्ठ : एच्. के. दांगट...२८
- डॉ. होमी भाभा– भारताचे एक शिल्पकार : प्रतिभा घावटे...३०
- विद्यार्थी–शिक्षक परस्पर संबंध : मेघना देशपांडे...
- लोकशाहीचे विडंबन : राजाराम संभाजीराव दिवेकर...३४
- सावल्यांचे बंड (कविता) : जयंत कुलकर्णी...३५
- जपानचा ज्युदोचा अनुभव : राजेंद्र वामनराव यादव...३६
- सद्यः परिस्थिती सामाजिक आणि शैक्षणिक : संध्या रांगणेकर...३८
- माथ्यावरचे आकाश (कविता) : मुकुंद मोरेश्वर पंत...४०
- पाण्यावरचं घर : प्रा. संजीवनी राहाणे...४१
- घात : सिद्धार्थ ओव्हाळ...४४
- मी कोण आहे ? : पुष्कर महाजन...४५
- समान नागरी कायदा : जया मुथा...४६
- 'यः क्रियावान् स पंडितः' : प्रा. मनोहर कुलकर्णी...४९
- आलिया भोगासी : संजय गोर्ले...५२
- अनंताची वाटचाल (कविता) : योगिनी शरदचंद्र मुळे...५५–५६

## हिंदी विभाग


- दहेज प्रथा– एक सामाजिक अभिशाप : समशेरसिंग चमलेगी...५९
- भारत बलवान है : राजेश एम्. मुप्पीड...६०
- आतंकवाद समस्या और समाधान : रेखा नारायण...६१
- मन का पंछी (कविता) : कु. अलका राजपाल...६२
- राष्ट्रीय एकता– एक सुदृढ नींव : नरेंद्रसिंह कुशवाहा...६३
- कतार (कविता) : कु. अनुप्रिता राजे...६४
- भाषा व नाम राष्ट्रीय एकता : फेबिओला शेख... ६५
- वृक्षारोपण : शिकोह अहमद.. ६६
- चित्रपट–कुछ विचार : भारती केळकर...६७
- टाफी सुमिरन (कविता) : अनिल तिवारी...६८


## इंग्रजी विभाग


- Psychology and Popular Entertainment : Prof. Mrs. Asha S. Purulekar...71
- My Dear Daddy (Poem) : Shilpa Chavan...72
- FUNGI–The Food of the Future : Prof. Miss G. S. Patil...73
- Environment Science, Geographical Perspective : Prof. Walmiki Ahirrao...76
- A Mission of Mercy : Sagar S, Ronghe...78
- 41 Years of Struggle and Achievement of the United Nations : Shikoh Ahmed...82
- Dreams : Miss Priya S. Darade...83
- Are you a Word Detective : Nita Patil...83
- The Post Graduate Research Centre, Department of Botany...84
- Project–Frog : Dr. H. V. Ghate...85
- Dr S. Y. Paranjape at the International Conference...87
- A Special Friend (Poem) Shilpa Chavan...88
- My Imagination (Poem) : Rekha Narayan...88
- Turn of the Age : Miss Priya S. Darade...88
- वार्षिक अहवाल...८९


□ □

# मराठी विभाग



प्राचार्य
डॉ. शं. ना. नवलगुंदकर

प्रा. डॉ. अशोक पाथरे
- उपप्राचार्य

प्रा. पद्माकर आपटे
- उपप्राचार्य








'मॉडर्न श्री' - १९८६–८७
अनिल दत्तात्रय पवार



**प्रा. अहिवळे जयवन्त**
मराठी विभाग एम्. फिल.



**श्री. शेरीकर विनय**
मास्टर इन एज्यु.(फिजिकल)



शिक्षण उपसंचालक श्री. सेवेकर
विद्यार्थ्यांचा गौरव करीत असताना



**प्रा. मुथा पो. सी.**
एम्. फिल.



**प्रा. पिंगळे पद्मा**
एम्. फिल. गणित.



**प्रा. कापरे प्र. श्री.**
एम्. फिल.



**प्रा. कुलकर्णी प्र. दि.**
'विद्यावाचस्पती पदवी'
रसायनशास्त्र विभाग



**प्रा. भावे एम्. आर.**
मॉडर्नच्या पहिल्या दिवसापासून
नोकरीत.
नामवंत चार्टर्ड अकौंटंट
या वर्षी निवृत्त



वक्तृत्व व वादविवाद मंडळ
कनिष्ठ महाविद्यालय



'पुरुषोत्तम एकांकिका स्पर्धा' व आंतर महाविद्यालयीन संगीत स्पर्धेत पारितोषिक मिळविणारे स्पर्धक कलाकार.



राष्ट्रीय सेवा योजना

कला मंडळ व सर्व वर्गप्रतिनिधी



# ' गर्द '

**प्रा. सौ. मेधा सिधये**
( मराठी विभाग )

डॉ. अनिल अवचट यांचे विविध प्रकारच्या अस्पर्श अशा सामाजिक प्रश्नांना हात घालणारे लेखन सुपरिचित आहे. हे ललित वाङ्मय की 'सामाजिक ऐवज' केवळ माहिती की आत्मपर लेखन याचीही वेळोवेळी चर्चा झालेली आहे.

वाङ्मयेतिहासात असे बरेचदा घडलेले दिसते की, नव्या स्वरूपाचे लेखन कोणत्यातरी चौकटीत अडकवून टाकलेले आहे. त्यावर एखादा विशिष्ट शिक्का मारून टाकलेला आहे आणि मग त्या लेखनाचे मूल्यमापन तटस्थ वृत्तीने आणि लेखनाचा प्रकृतिधर्म लक्षात घेऊन करणे काहीसे अवघड होऊन बसते.

वाङ्मयाच्या प्रवाहात अधूनमधून एखादे लेखन अशा काही जोमदारपणे पुढे येते की त्याचे 'स्व–रूप' ओळखताना, निश्चित करताना, त्या लेखनाचे मर्म समजावून घेताना, समीक्षेची नेहमीची तत्त्वे ठराविक पद्धतीने वापरून चालत नाहीत. अवचटांचे लेखन असे वेगळ्या वाटेने जाणारे आहे. त्यांची पुस्तके वाचकांसमोर अनेक तऱ्हेचे प्रश्न उपस्थित करतात. हे प्रश्न वाङ्मयीन असतात, सामाजिक जाणिवेशी निगडित असतात, माणसाच्या माणूसपणाशीच भिडलेले असतात. सर्वसामान्यांना अपरिचित असलेले, पशुंनाही लाजविणारे माणसांचे जग ते आपल्याला दाखवीत असतात आणि जणू म्हणतात– 'म्हणा या लिखाणाला काय म्हणायचं आहे ते ! पण मी पाहिलंय ते असं असं आहे.'

'गर्द' हे पुस्तकही लेखकाच्या इतर पुस्तकांप्रमाणेच त्याच्या निरीक्षणावर, अभ्यासावर आधारलेले आहे. यात माहिती, तपशील भरपूर आलेला आहे. तसा तो आला यात वावगे काही नाही, कारण लेखक 'गर्द'च्या व्यसनात अडकलेल्या एखाद्या व्यक्तीवर, त्या संदर्भातील घटना–प्रसंगावर ललितकृती निर्माण करण्याच्या प्रतिज्ञेने लेखनाला प्रवृत्त झालेला नाही तर त्या व्यसनाबद्दलची माहितीच त्याला वाचकांना द्यायची आहे. चांगल्या निरीक्षकाला आवश्यक असलेली तटस्थता, प्रश्नातले बारकावे उमजून घेण्याची तीव्र जिज्ञासा, ज्या प्रश्नाचा आपण अभ्यास करतो आहोत त्याबद्दलची डोळस आस्था या गोष्टी अवचटांजवळ आहेत. शिवाय, त्यांना मिळालेले ज्ञान, ही विशिष्ट शैली आहे असे चटकन् जाणवून न देता, वाचकांपर्यंत नेऊन पोचविण्याचे कसबही आहे. यात ज्ञान आहे, स्वतःची शैली आहे, लेखकाच्या व्यक्तिमत्वालाही स्थान आहे, बेचैन करून सोडण्याचे सामर्थ्य आहे वैचारिक वाङ्मय आणि ललित वाङ्मय यांची संमिश्र वैशिष्टचे असलेल्या या लेखनाचा बाज वेगळा आहे तो वाचकांना आव्हान आणि आवाहन दोन्ही देणारा आहे.

'गर्द' या पुस्तकाच्या निमित्ताने, अवचट यांच्या अशा स्वरूपाच्या लेखनासंबधी काही विचार मांडावेसे वाटतात. यातील एक विचार, या लेखनाच्या परिणामाचा. मुख्यतः ललित वाङ्मय आवडीने वाचणाऱ्या सामान्य आणि सुजाण वाचकांवर, विविध वाङ्मयीन प्रवाहांची दक्षतेने दखल घेणाऱ्या समीक्षकांवर अवचटांच्या लेखनाचा जो परिणाम होईल तोच परिणाम पोलिस अधिकारी, मानसोपचार तज्ज्ञ, अंडरवर्ल्डमध्ये काम करणारी अल्पशिक्षित, अर्धशिक्षित मुले

किंवा मोठी माणसे, हमालांच्या, देवदासींच्या, व्यसन-मुक्तीच्या प्रश्नांमध्ये लक्ष घालणारे कार्यकर्ते यांच्यावर होईल का? मध्यमवर्गीय पांढरपेशा, सुशिक्षित ठराविक प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या वाचकांहून या सगळ्यांच्या प्रतिक्रिया भिन्न असतील. म्हणजे या लेखनातील नवीनता, परिणामकारकता सापेक्ष आहे.

या लेखनाची प्रेरणा व प्रयोजन सामाजिक आहे, वाङ्मयीन नव्हे. तरीही ही पुस्तके समाजशास्त्र विभागात घालून मोकळे होता येणार नाही. कारण याचे स्वरुप शुद्ध शास्त्रीय नाही ते लालित्याच्या अंगाने जाणारे माहितीपर असे आहे. यात कल्पिताला वाव नाही ते वस्तुनिष्ठ सत्यावर आधारित आहे. यात रिपोर्टाज् आहे पण वृत्तपत्रीय रिपोर्टाज्मधील कोरडेपणा मात्र यात नाही. हे आत्मपर लेखन नाही कारण व्यक्ती किंवा कलावंत म्हणून लेखकाच्या मनाची स्पंदने त्यात सतत व्यक्त होत नाहीत. याचा अर्थ लेखक केवळ फोटोग्राफरच्या भूमिकेत दिसतो असे नाही. चिंतनशील, सहृदय माणूस म्हणून त्याचे दर्शन घडते; पण श्रेष्ठ दर्जाच्या ललितकृतींमध्ये, माणूस आणि कलावंत म्हणून लेखकाचे व्यक्तिमत्व सुप्तरुपाने जाणवत राहाते, तो त्या लेखनाचा गाभा असतो. तसे इथे घडत नाही.

देवल 'शारदा' लिहितात, हरिभाऊ 'पण लक्षात कोण घेतो' लिहितात, शंकरराव खरात 'तराळ–अंतराळ' लिहितात, नारायण सुर्वे 'माझे विद्यापीठ' लिहितात– या सगळ्यांच्या लेखनामागील भूमिका व अवचटांची भूमिका यात मूलभूत फरक आहे. काही विशिष्ट सामाजिक प्रश्नांसंबंधीची पोटतिडीक आणि त्या प्रश्नांचे गांभीर्य समाजापर्यंत पोचविण्याची तळमळ दोन्ही ठिकाणी सारखीच आहे. तरीही वरील चौघांचे लेखन हे निःसंदेहपणे ललित वाङ्मयात समाविष्ट झालेले आहे. अवचटांच्या लेखनाबाबत तसे म्हणता येत नाही. वरील चार लेखक, कवी हे कलावंत ठरतात कारण त्यांनी माणूस म्हणून, कलावंत म्हणून अनुभवलेले जीवनाचे विविध रंग, रूप, आकार, त्यांच्या लेखनात कलात्म रीतीने व्यक्त होतात. अवचट जे 'पाहिलंय्' ते लिहितात पण ते जे पाहतात ते कलावंतांच्या नजरेने नव्हे तर समाजाचा एक सुजाण घटक म्हणून सभोवतालचं दुर्लक्षित, उपेक्षित 'वास्तव' ते पाहतात व ते जसेच्या तसे आपल्यापुढे मांडतात. अवचटांचे वेगळेपण, वैशिष्टय या त्यांच्या भूमिकेतच आहे. ही भूमिका वाङ्मयकृती निर्माण करून 'अ–लौकिक' आनंद देण्याची नसून 'लौकिका'च्या पातळीवर पोटतिडकीने लिहून, निद्रिस्त समाजाला जागे करण्याची आहे.

रोचक शैलीत केलेले, सामाजिक प्रश्नांशी निगडित असलेले निरीक्षणावर आधारित माहितीपर लेखन हेच या लेखनाचे स्व-रूप आहे. आपल्या कोशातून बाहेर पडून, भोवतालचे जग उघड्या डोळ्याने बघण्याचा आणि दाखविण्याचा प्रयत्न, तळमळ हेच या लेखनाचे आत्मतत्त्व आहे, वैभव आहे. म्हणूनच माहितीपरता ही येथे अपरिहार्य आहे. लेखनाच्या मूळ प्रकृतिधर्माशी ती सुसंगत अशी गोष्ट आहे.

'गर्द' या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात माहिती आली आहे ती चेसिंग कसे करतात याबद्दलची. पुढेही माहिती आणि गर्दच्या समस्येचं पृथक्करण यावर भर आहे. बाकीचा भाग डॉ. आनंद नाडकर्णींच्या ग्रुप थेरपी सेशन्समधील निरीक्षणे, वेगवेगळ्या व्यक्ती, वस्त्या, संस्था यांच्या भेटीगाठीतून समजलेल्या या व्यसनाबद्दलच्या धक्कादायक गोष्टी यासंबंधीचा आहे. डॉ. आनंद नाडकर्णींचे गर्दच्या व्यसनमुक्तीबाबतचे कार्य हा भाग या पुस्तकात महत्त्वाचा आहे. डॉक्टरांचे ऋण लेखकाने मोकळेपणी मान्य केले आहे.

मुंबईत चरस व ब्राऊन शुगरला 'राम और श्याम' म्हणतात तर पुण्यात चरसला केशर व ब्राऊन शुगरला कस्तुरी म्हणतात ही माहिती मिळाल्यानंतर लेखक म्हणतो,– 'बघा, आहे की नाही आमचं पुणं जास्त सुसंस्कृत?' वरवर मिस्किल वाटणाऱ्या या प्रश्नामागे पुण्याच्या सांस्कृतिक अवनतीचे केवढे उपहासगर्भ सूचन आहे! अमेरिकेत आता हेरॉईन ॲडिक्शन हा दुय्यम प्रश्न समजला जातो, आता तिथे क्रॅक म्हणजे कोकिनचे व्यसन हा मुख्य प्रश्न होऊन बसला आहे, अशी माहिती मिळाल्यावर अवचट आपल्या मनातील प्रतिक्रिया नोंदवतात– 'आम्ही कितीही गाठायचं म्हटलं तरी हे अमेरिकन लेकाचे आपल्या पुढंच असतात!' ही प्रतिक्रिया मोठी बोलकी आहे. भारत आणि अमेरिका दोघांनाही एकाचवेळी टोला हाणणारे हे भाष्य आहे.

बऱ्या झालेल्या ॲडिक्टस्नी चालविलेल्या नॉरकॉटिक ॲनॉनिमस (N. A.) च्या मीटिंगमध्ये ठसविला जाणारा HALT हा शब्द व्यसनीच काय पण

सर्वसामान्य माणसांनाही खूप काही शिकविणारा आहे. H म्हणजे Hungry, A म्हणजे Angry, L म्हणजे Lonely, T म्हणजे Tired. आपण भुकेलेले असतो, रागावलेले असतो, एकटे असतो किंवा थकलेले असतो तेव्हा स्वतःला जपले पाहिजे तेव्हाच आपले व्यसन आपल्यावर कब्जा करू शकते !

झोपडपट्टीतल्या माणसांपासून मंत्र्याच्या मुलापर्यंत सर्व थरात हे व्यसन पसरलेले आहे, याची जाणीव या पुस्तकातून होते. प्रयत्नपूर्वक व्यसनमुक्त होऊन गर्दचे अड्डेच्या अड्डे उध्वस्त करणारा अंकल डिसोझा शेवटी पुनः दारूच्या व्यसनात अडकतो यासारख्या घटनांची वर्णने मन व्यथित करून टाकतात.

ड्रग ॲडिक्शन प्रसिद्धीच्या झोतात आल्यावर वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारी माणसे बिनबुडाची विधाने कशी ठोकून देतात याचे लेखकाने दिलेले उदाहरण आपल्या 'करियरिस्टस्'चे पितळ उघडे पाडणारे आहे. बालमानसोपचार केंद्रात काम करणाऱ्या एका बाईनी नुकतीच अशी माहिती प्रसिद्ध केली आहे की, १९६५ मधला मराठी दुसरीतला एक मुलगा चण्यामण्या बोरे खात असे. त्या बोरांवर पसरलेल्या मिठावर ब्राऊन शुगरचा नाजूक भुरा असे. लेखक सांगतो, ब्राऊन शुगर आपल्या देशात आली तीच जेमतेम पाच वर्षांपूर्वी ! !

डॉ. आनंद नाडकर्णी यांनी या पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना 'पुस्तक मिटण्यापूर्वी' या शीर्षकाखाली छापली आहे. त्यात व्यसने फैलावण्यामागच्या कारणांची चर्चा केली आहे. 'आत्ममग्न वृत्तीतून आलेली 'करियर' नावाची भयानक गोष्ट' हे मुलांच्या व्यसनीपणाचे कारण दिलेले आहे. श्रीमंत आणि मध्यमवर्गीय अशा दोन्ही थरातल्या मातापित्यांना अंतर्मुख व्हायला लावणारा हा विचार आहे. या प्रस्तावनेत खूप चांगले विचार मांडलेले आहेत. डॉ. नाडकर्णी स्वतः 'गर्द'च्या व्यसनाने पछाडलेल्यांसाठी अतिशय अवघड व बहुसंख्य डॉक्टरांना अप्रिय वाटेल असे काम करीत आहेत. त्यामुळे त्यांचे हे 'प्रचीतीचे बोलणे' फार मोलाचे आहे.

एका महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाकडे वाचकांचे लक्ष वळविण्याचे कार्य 'गर्द' या पुस्तकाने चांगले केले आहे हे यश महत्त्वाचे.

□ □

## श्रद्धांजली



मॉडर्न महाविद्यालयाच्या कनिष्ठ–वाणिज्य विभागातील अध्यापिका सौ. ज्योत्स्ना गोडबोले यांचे दि. २९ डिसेंबर १९८६ रोजी दुःखद निधन झाले.

त्या १९८३–८४ या शैक्षणिक वर्षात 'लोकल मॅनेजिंग कमिटीच्या' सदस्या होत्या. १९८२–८३ व १९८३–८४ या शैक्षणिक वर्षात 'ज्युनियर कॉलेज कमिटीच्या'ही सदस्या होत्या. यंदाच्या वर्षी बारावी वाणिज्य वर्गासाठी नव्यानेच सुरू केलेल्या 'स्कॉलर बॅच'च्या त्या प्रवर्तक होत्या, त्यांनी महाविद्यालयांच्या विविध समित्यांवर काम केले होते.

त्यांच्या दुःखद निधनाने, सुस्वभावी, कष्टाळू आणि अनुभवी अध्यापिका काळाच्या पडद्याआड गेली आहे.

महाविद्यालय त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

# अमली पदार्थांचे सेवन–एक व्यक्तिमत्त्व-विकृती

**प्रा. सौ. अमृता ओक**
(मानसशास्त्र–विभाग)

१९८६ हे नवीन वर्ष सुरू झाले आणि सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रात एक धक्कादायक बातमी वाचायला मिळाली. एका पाहणीत असे आढळून आले की, भारतातील जवळजवळ ५ लाख तरुण अमली पदार्थांच्या आधीन झाले आहेत. पुण्यासारख्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक शहरातदेखील जवळजवळ ५०,००० तरुण-व्यक्ती अशा आहेत, की ज्यांनी आयुष्यात एकदा तरी अमली पदार्थांची नशा केलेली आहे. हे तरुण कोणत्याही क्षणी व्यसनाधीन होऊ शकतील.

अमेरिकन मनोचिकित्सा संघटनेच्या वर्गीकरणानुसार अमली पदार्थांचे व्यसन ही एक व्यक्तिमत्व–विकृती आहे. ' मानसिक उद्दीपन करणाऱ्या औषधांवर मानसिक व शारीरिकदृष्टया अवलंबून राहणे म्हणजे औषधी व्यसनासक्ती होय.' मानसिक अवलंबित्वामध्ये, औषध घेण्यामुळे व्यक्तीच्या काळज्या दूर होतात व तिला मानसिक समाधान वाटते व त्यामुळे ती पुन्हा काळजी निर्माण झाल्यास औषध घेते. शारीरिक अवलंबित्वामध्ये व्यक्तीच्या शरीराची रचनाच अशा तऱ्हेने बदलते की विशिष्ट औषधी द्रव शरीरात गेले नाही तर अभावजन्य लक्षणे आढळून येतात.

अमेरिकन मनोचिकित्सा संघटनेने अशा प्रकारच्या औषधी द्रवांचे वर्गीकरण पाच प्रकारात केले आहे.

१) अफू व तद्जन्य द्रव्ये– हेरॉइन, मॉर्फीन, ब्राऊन शुगर.
२) शामके–– बार्बीच्युरेटस्, ब्रोमाईड, झोपेच्या गोळ्या.
३) उद्दीपके– कोकेन.
४) सौम्य शांतके– मेप्रोबॅमेटस्.
५) विभ्रम निर्माण करणारी औषधे– L. S. D. मारिजुआना, हशीश.

यांपैकी पहिल्या प्रकारातील द्रवांचे व्यसन भारतात मोठ्या प्रमाणात आढळते. भारतामध्ये अफूची शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. मुंबई शहर अफू आणि तद्जन्य पदार्थांच्या चोरट्या व्यापाराचे आंतरराष्ट्रीय केंद्र झालेले आहे. हेरॉईनपासून तयार केलेल्या ' ब्राऊन शुगर ' अथवा ' गर्द ' नावाच्या भेसळयुक्त द्रवाने भारतातील तरुण पिढीला ग्रासले आहे.

ह्या प्रकारची द्रव खाऊन, धूम्रपानाने अथवा शिरेमध्ये सुई टोचून शरीरात घेता येतात. ही द्रवे घेतल्यानंतर व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या गरजा मंदावतात, आराम वाटतो, सुखकारक भावना निर्माण होतात, व्यक्तीला कोणतेही कारण नसताना आनंद होतो. हे परिणाम साधारणतः ४ ते ६ तासांपर्यंत टिकून राहतात. आठ तासांच्या आत पुन्हा हे द्रव घेतले नाही तर घाम येणे, उलट्या व जुलाब होणे अशी अभावजन्य लक्षणे आढळून येतात. त्या द्रवांबाबत शरीराची सहनशीलता इतकी जलद गतीने वाढत जाते की, अपेक्षित परिणाम निर्माण होण्यासाठी पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात द्रव घ्यावे लागते. स्वतःच्या व्यसनासाठी लागणारा पैसा मिळवण्यासाठी व्यक्ती समाज, अमान्य वर्तन करू लागते उदा. अयोग्य संगतीत राहणे, खोटे बोलणे, चोरी करणे इ. व्यक्ती स्वतःच्या खाण्यापिण्याकडे दुर्लक्ष करते. त्यामुळे तिचा आहार समतोल व पूरक राहात नाही. रोगप्रतिकारकशक्ती

कमी होते व व्यक्ती निरनिराळ्या शारीरिक आजारांना बळी पडते.

ह्या व्यसनाधीनतेची काही ठळक वैशिष्टये सांगता येतात.

१) ज्यांचे शारीरिक परिपक्वन झालेले असले तरी भावनिकदृष्टया व सामाजिकदृष्टया अपरिपक्व अशा किशोरवयीन व्यक्ती ह्या व्यसनाला प्रामुख्याने बळी पडतात.

२) व्यसनाधीन व्यक्ती एका ठराविक प्रकारच्या पदार्थाची नशा न करता वेगवेगळ्या अमली पदार्थाची नशा करतात.

३) ह्या व्यक्ती आर्थिकदृष्टया पालकांवर अवलंबून असल्या तरीदेखील पालकांबद्दल त्यांच्या मनात अनादराची व शत्रुत्वाची भावना असते.

व्यक्ती व्यसनाधीन होण्यामागची अनेक कारणे सांगितली जातात. न्युरॉलॉजीतील आधुनिक संशोधनात असे आढळले की, मानवी शरीरात एण्डॉर्फिन नावाचा पदार्थ तयार होतो, त्यामुळे थकवा, वेदना दूर होतात. हे मॉर्फिनसारखेच असते. मेंदूतल्या पेशींमध्ये 'ओपियम रिसेप्टार्स' असतात, बाहेरून घेतलेल्या मॉर्फिन अथवा हेरॉईनमुळे हे रिसेप्टार्स ब्लॉक होतात व नवीन रिसेप्टार्स उघडले जातात. अशी रिसेप्टार्सची संख्या वाढतच जाते. जेव्हा हेरॉईन घेण्याचे थांबवले जाते तेव्हा हे सगळे रिसेप्टर्स उघडे पडून हेरॉईनसाठी आक्रांत करतात. जेव्हा परत हेरॉईन घेतले जाते तेव्हाच ही प्रतिक्रिया थांबते.

ह्या व्यसनाधीनतेमागील मानसिक अवलंबित्वाची कारणे शोधण्याचे प्रयत्न मानसशास्त्रज्ञांनी सुरू केले आहेत. त्यांच्या मते अनिर्बंधपणे वागण्याची लागलेली सवय नको ते धाडस करण्याची प्रवृत्ती यामुळे समाजविघातक प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तींमध्ये ह्या व्यसनाचे प्रमाण जास्त असते.

असुरक्षिततेची व अपुरेपणाची जाणीव, औदासीन्य, तणाव, जिव्हाळ्याचे मैत्रीसंबंध निर्माण करण्याची अक्षमता, भावनिक अपरिपक्वता इत्यादी व्यक्तित्वदोष असणाऱ्या लोकांमध्ये अशी अधीनता लवकर निर्माण होते.

खेळाडू, विद्यार्थी व कलाकार लोकांमध्ये असा गैरसमज आहे. की मादक द्रवाच्या सेवनामुळे अधिक कल्पना सुचतात, उत्साह वाढतो व थकवा दूर होतो. त्यामुळे ह्या लोकांमध्ये हे व्यसन पसरते.

डॉक्टर्स, नर्सेस्ट, केमिस्ट, पोलिस या व्यावसायिकांना ही द्रव्ये हाताळण्याची संधी वारंवार मिळते. हे द्रव घेतले असता नेमके कोणते अनुभव येतात अशी उत्सुकता त्यांना वाटते व त्यातूनच ते लोक ह्याच्या आधीन होतात.

मित्रांच्या आग्रहाखातर किशोरवयीन व्यक्तींमध्ये हे व्यसन पसरते.

ज्या समाजांमध्ये मादक द्रवपदार्थ घेणे फारसे निषिद्ध मानले जात नाही व सहजपणे उपलब्ध होऊ शकतात. अशा समाजातील व्यक्ती ह्या व्यसनांना लवकर बळी पडतात.

मानसशास्त्रज्ञांच्या मते, व्यसनाधीनता ही एक व्यक्तिमत्व विकृती आहे. ह्या लोकांमध्ये आढळणारे व्यक्तित्त्व घटक सामान्य माणसांच्या व्यक्तित्व घटकांपेक्षा निश्चितपणे वेगळे असतात.

ह्या व्यक्तींचा 'अहं' किंवा 'इगो' कमकुवत असतो. त्या सतत दिवास्वप्नात रममाण होणाऱ्या, गोंधळलेल्या, कमतरतेची जाणीव असणाऱ्या, अंतर्गत संघर्ष व बाह्य जग यांची हाताळणी करण्यास असमर्थ असणाऱ्या असतात.

पालकांचे मुलांकडे झालेले दुर्लक्ष, पालकांकडून मिळणाऱ्या प्रेमाचा व विश्वासाचा अभाव, कठोर शिक्षा, असमाधानकारक मैत्रीसंबंध, पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास आपण असमर्थ आहोत याची जाणीव ह्यामुळे ह्या लोकांची स्वतःबद्दलची कल्पना प्रतिकूल असते.

व्यसनाधीन लोकांना सतत चिंता करण्याची सौम्य मनोविकृती जडलेली असते. त्यांना वर्तनविषयक, शालेय व आरोग्यविषयक अनेक समस्यांनी ग्रासलेले असते. त्यांचे विरुद्ध–लिंगी व्यक्तींशी असणारे संबंध बिघडलेले असतात. त्यांची मातेशी जवळीक असते, मात्र वडील आणि अधिकारपदावरील व्यक्तींबद्दल त्यांच्या मनात द्वेषभावना असते.

एका संशोधनात असे आढळले की, ह्या व्यक्ती जीवनातील कोणत्याच क्षेत्रात समाधानी नसतात. आपले व्यसन विसरण्यासाठी त्या अशा सेवनापासून आनंद मिळविण्याचा प्रयत्न करतात.

व्यसनाधीन लोकांची आकांक्षांची पातळी सामान्य व्यक्तीपेक्षा खूपच कमी असते. कुटुंबियांचा फारसा विचार न करता स्वतःचे आरोग्य, अर्थार्जन व व्यक्ति-

गत मूल्यांवरच त्यांच्या आशा, आकांक्षा, चिंता व भीती ह्या केंद्रित झालेल्या असतात.

एका मानसशास्त्रज्ञाने अशा लोकांचे व्यक्तिचित्र रेखाटतांना म्हटले आहे, 'अशा व्यक्ती एकलकोंडया, दुसऱ्यांच्या सूचना न स्वीकारणाऱ्या, भावनिकदृष्टया अस्थिर, अवघडलेल्या मनस्थितीच्या, सामान्यांपेक्षा उच्च अथवा कमी बुद्धी असणाऱ्या, गुन्हेगारी कृत्यांमध्ये गुंतलेल्या, एखाद्या टोळीचे सभासदत्व टिकविण्यासाठी व त्याद्वारे स्वतःचे आधुनिकत्व सिद्ध करण्यासाठी झटणाऱ्या असतात.

एका संशोधनात असेही आढळले की, अशा लोकांच्या परंपरागत मूल्यांकडे पाहण्याच्या अभिवृत्ती आक्रमक व शत्रुत्वपूर्ण असतात. मात्र त्यांच्या व्यसनाधीनतेकडे पाहण्याच्या अभिवृत्ती अनुकूल असतात.

अशा व्यक्ती व्यक्तिगत अडचणी व मनःशारीरिक आजार ह्यांनी ग्रासलेल्या असतात.

व्यसनाधीन लोकांच्या कुटुंबांचा अभ्यास केला असता असे लक्षात आले की, अशा व्यक्ती समाजातील उच्चभ्रू श्रीमंत, सुशिक्षित व विभक्त कुटुंबातील असतात, कारण अशा कुटुंबातील पालकांच्या स्वतःच्या मुलांकडून फार उच्च दर्जाच्या अपेक्षा असतात, त्या पूर्ण न करू शकल्यामुळे अशी मुले स्वतःचा व कुटुंबाचा विनाश करणाऱ्या जीवनमार्गाकडे वळतात.

स्वतःच्या शारीरिक व मानसिक गरजांच्या पूर्तीसाठी विलंब लागण्यास तो सहन न होणे, अपयश सहन करण्याची शक्ती कमी असणे, सामाजिक शिष्टाचारांचे पालन न करणे, स्वार्थीपणा, उतावळेपणा, चिडखोरपणा, वरिष्ठांविषयी अनादर, जिव्हाळ्याचे संबंध टिकवून ठेवण्यातील अक्षमता ह्यासारख्या अनेक समाजविघातक प्रवृत्ती त्यांच्यात आढळतात.

कुटुंबात ज्यांचा जन्मक्रम पहिला अथवा शेवटचा असतो त्यांच्यावर आईवडिलांकडून अधिक अपेक्षा लादल्या जातात. त्यांना अधिक प्रमाणात मानसिक संघर्षांना तोंड द्यावे लागते, त्यामुळे ह्या जन्मक्रमावरील व्यक्तींमध्ये व्यसनाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले.

स्वतःच्या मुलांचे अतिसंरक्षण करणारी, त्यांच्यात नको इतका रस घेणारी माता, कुटुंबातील वडिलांची अनुपस्थिती, आई–वडिलांचे विकोपाला गेलेले संबंध, भावनिकदृष्टया तणावपूर्ण असे जन्मपूर्व व जन्मोत्तर वातावरण, मुलाबद्दलच्या पालकांच्या परस्परविरोधी अभिवृत्ती, ह्या कारणांमुळे मुलांना वाटू लागते, की आपण म्हणजे फार मोठया यंत्रणेचा नगण्य भाग आहोत, आपल्या आयुष्याला काहीही किंमत नाही. ह्या भावनेमुळे ते मादक पदार्थ घेऊ लागतात.

मादक द्रवांची तल्लफ भागविण्यासाठी वाटेल ते कृत्य करण्यास हे लोक मागेपुढे पाहात नाहीत. ते नुसता कायदा मोडत नाहीत तर ते कायदा स्वतःच्या हातात घेतात. उदा. वेश्या–व्यवसाय करणे, लहानमोठे गुन्हे करणे. इत्यादी.

व्यसनाधीन लोकांना ह्या व्यसनापासून मुक्त करण्याचे प्रयत्न फारच कमी प्रमाणात होतात. जे काही थोडेफार प्रयत्न होतात त्यांना फारसे यश येत नाही. बरेचसे रुग्ण उपचार अर्धवट सोडून देतात. जे रुग्ण सुशिक्षित असतात, ज्यांच्या महत्त्वाकांक्षा फारशा अवास्तव नसतात व ज्यांची स्वतःबद्दलची कल्पना तुलनेने अनुकूल असते तेच रुग्ण व्यसनापासून मुक्त होण्यात यशस्वी होऊ शकतात.

व्यसनाधीनतेसारख्या पुढील तंत्रांचा वापर करून उपचार करता येऊ शकतात.

प्रतिबंधात्मक उपचार – वर्तमानपत्रे, रेडिओ, टी. व्ही., प्रदर्शने, चर्चासत्रे ह्यासारख्या माध्यमांमधून समाजातील ज्या व्यक्ती व्यसनाधीन होण्याची शक्यता आहे अशांना मादक द्रवांच्या दुष्परिणामांची माहिती देणे, ज्यांना नुकतेच व्यसन लागले आहे अशांवर ताबडतोब उपचार करणे अथवा व्यसनमुक्त लोकांचे पुनर्वसन करणे यांचा यात समावेश होतो.

औषधोपचार – मादक द्रव घेण्याचे एकाकी थांबवल्यास अतिशय भयानक अभावजन्य लक्षणे निर्माण होतात, रुग्णाला आत्यंतिक यातना होऊन तो दगावण्याची शक्यता असते. अशावेळी त्या मादक द्रवांसारखेच परिणाम करणारी पण कमी धोकादायक औषधे देऊन रोग्याच्या यातना कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

मानसोपचार – मादक पदार्थांवरील मानसिक अवलंबित्व दूर करण्यासाठी हे उपचार उपयुक्त असतात. रुग्णाच्या भावनिक समस्या, संघर्ष सोडवण्याचा व व्यसनाधीनतेमागील कारणे दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

काही वेळा व्यसनी लोकांना एकत्र बोलावून त्यांना

स्वतःच्या अनुभवांची चर्चा करण्यास सांगितले जाते. ह्यालाच समूह मानसोपचार असे म्हणतात. अल्कोहोलिक अॅनॉनिम्स्ट (A. A.) सारख्या आंतरराष्ट्रीय संस्था ह्या उपचाराचा वापर करतात. ह्या उपचारामुळे रुग्णाचा आतमविश्वास वाढून, व्यसनमुक्त होण्याची प्रेरणा प्रबळ होण्यास मदत होते.

व्यसनी व्यक्ती मादक द्रव्याचे सेवन करत असताना, तिला क्लेषदायक अनुभव कृत्रिमरीत्या दिले जातात, उदा. मादक द्रवात उलटया व जुलाब होणारे औषध मिसळणे, मादक द्रव घेत असताना विजेचा शॉक देणे इ. यामुळे त्या व्यक्तीला त्या मादक द्रवाबद्दल घृणा वाटू लागते.

अमली पदार्थांच्या व्यसनाला वेळीच आळा घातला नाही तर भारताची तरुण पिढी धोक्यात येईल. हे व्यसन भारतात पसरविण्यामागे परकीय शक्तींचा हात असल्याचे बोलले जाते.

भारत सरकारने या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन अमली पदार्थांबाबत कठोर कायदा केला आहे, त्यानुसार अमली पदार्थ तयार करणे, त्यांचा साठा करणे, त्यांचा व्यापार करणे अथवा सेवन करणे ह्या प्रकारच्या गुन्ह्यासाठी कमीत कमी १० वर्षे सक्तमजुरी अथवा एक लाख रु. दंडाची शिक्षा दिली जाऊ शकते.

व्यसनाधीनतेने पिडीत लोकांवर उपचार करण्यासाठी सरकारी व खाजगी रुग्णालयांमध्ये खास विभाग उघडले जात आहेत, परंतु उपचार करणाऱ्या तज्ज्ञांची व रुग्णांसाठी असलेल्या खाटांची कमतरता पडते. अलिकडेच पुण्यातील केंद्रीय मानसिक आरोग्य संस्था, येरवडा येथे ह्या प्रकारच्या रुग्णांवर उपचार करण्याचे स्वतंत्र केंद्र उघडण्यात आले आहे. ह्या केंद्रासाठी प्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांनी १ लाख रु. ची देणगी दिलेली आहे. डॉ. अनिल अवचट ह्यांनी ह्या सामाजिक समस्येबाबत समाजातील लोकांना जागरूक करण्यासाठी 'गर्द' हे शास्त्रीय ज्ञानावर आधारित असे पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकामुळेच ह्या केंद्राच्या निर्मितीला चालना मिळाली.

व्यसनमुक्तीच्या ह्या उपचारांबरोबरच ह्या लोकांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलविणेही आवश्यक आहे. आज असे आढळून येते की, ह्या व्यसनातून मुक्त झाल्यानंतरही अशा व्यक्तीची समाज कुचेष्टा करतो त्यांना अर्थार्जनाचे साधन उपलब्ध होऊ देत नाही. ह्या त्रासाला कंटाळून व्यसनमुक्त व्यक्ती पुन्हा व्यसनाधीन होते.

सामाजिक प्रयत्नांबरोबरच प्रत्येक सुजाण नागरिकाने ह्या समस्येच्या निर्मूलनासाठी वैयक्तिक हातभारही लावला पाहिजे. स्वतःच्या कुटुंबातील, नात्यातील, मित्रपरिवारातील एखादी व्यक्ती ह्या व्यसनात अडकत नाही ना इकडे लक्ष पुरवणे, दुर्दैवाने अशी एखादी व्यक्ती आढळल्यास सुरुवातीच्या काळातच तिच्यावर योग्य ते उपचार करून घेणे, ती व्यक्ती व्यसनमुक्त झाल्यावर तिला चांगली वागणूक देणे, ह्यासारख्या छोटया छोटया कृतींमुळे आपण देखील समाजाला व देशाला अधःपतनापासून वाचवण्यास हातभार लावू शकू.

□ □

# ...आणि दिवस सुरू होतो

**कु. ज्योत्स्ना शिदीड.**
द्वि. व. वाणिज्य,

निद्रादेवीचा अंमल संपलेला असतो जाग येते आणि आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींची जराशी चाहूल लागते. घड्याळात पहाटेचे ५–१५ झालेले असतात. घड्याळाचे काटे पुढे पुढे वाटचाल करीत असतात, अशा वेळी घड्याळ बंद पडावं असं मनात येतं. नंतर लगेच शैलेश उठवायला येतो, धडाधड लाईट लावतो आणि म्हणतो. 'ज्योत्स्ना उठ, ती तिच्या शेजारी कोण झोपली आहे ? फरिदा...' प्रत्येकजण दुसरीला उठवून स्वतः मात्र ब्लँकेटमध्ये गुरफटून राहते कारण उबदार पांघरूणातून उठायला नकोच वाटते. शेवटी बेल आपले अस्तित्व दाखवते, रागारागाने खूप वेळ ओरडत बसते. मग तिचा असा काही राग येतो ! ५–४५ उठून मी कोण कोण उठल्या याचा कानोसा घेते, परत २–४ मिनिटं पडते. परत जी. डी. येतो आणि सांगतो, 'उठा, सगळ्यांनी, मॉडर्नचे वीसजण हवे आहेत. वाटलं तर तुम्ही व्यायाम करू नका, तुम्हाला व्यायामाला सुट्टी !' मग बोचऱ्या थंडीत, टाकीतील अपुऱ्या पाण्याने कसेबसे तोंड धुवून आणि आळसावलेल्या अवतारात, शाली लपेटंत, मॉडर्नचा क्यू शोधत, मोठ्या मुश्किलीने बऱ्याचशा नाराजीने जांभया देत उभे राहायचे. प्रार्थना म्हणण्यासाठी शब्द नाराजी दाखवतात. ओठ नुसतेच हलत असतात आणि डोळे समोरच्या डोंगराआडून फाकणाऱ्या उषःप्रभेकडे असतात. आजुबाजूला धुक्याचा अंमल असतो, असे वाटते हा पडदा दूर होऊच नये. धरणाचे रंगीत पाणी, आकाशातील रंगांची उधळण, वाटेवरून जाणारी एखादीच एस्. टी. अथवा बैलगाडी आणि काही–काही वाटेवरील मिचमिचणारे, पुसटसे अस्तित्व दाखवणारे दिवे ह्यांवरून दृष्टी हलवायला मन धजावतच नाही. 'मॉडर्नचे वीस आहेत का रे ? चौदाच दिसताहेत ! कुणीतरी मध्येच मन विचलित करतं. मग या गडबडीत रविकिरण डोंगराआडून सूर्याच्या आगमनाची वार्ता घेऊन येतात. चंद्राचे अस्तित्व पुसट होत जाते. पळून येण्यासाठी (अर्थात मुलींचे टॉकिंग अँड वॉकिंग) आम्हाला पिटाळण्यात येतं, आधी न पाठवायचे कबूल करूनसुद्धा ! मग तेजःपुंज भास्कराकडे कोण पाहतो ? कारण,

आमचा शिबीराचा दिवस सुरू होतो ना !

□ □

# गंगा तेरा पाणी अमृत !

**राजेंद्र पिंगळे**
द्वितीय वर्ष वाणिज्य

शीतत्वम्, स्वादुत्वम्. स्वच्छत्वम्, अत्यन्तरूच्यत्वम्,
पथ्यत्वम् ।
पावनत्वम्, पापहारित्वम्, तृष्णामोहध्वंसत्वम्,
प्रज्ञाधारित्वंच ॥
राजनिघष्टुः

वरील श्लोकामधून गंगा मातेची महती सिद्ध होते. हजारो वर्षाची परंपरा असलेली, भारतीयांच्या हृदयाचे हृदयस्थान असलेली भारताच्या विकासासाठी आपले सर्वस्व त्यागणारी हिमालयापासून निघून गंगासागराला मिळेपर्यंत आपल्या लाखो मुलांना 'सुजलाम् सुफलाम्' करणारी ही गंगामाता आज पूर्ण प्रदूषित झालेली आहे. ब्रह्मांड पुराणामध्ये पुढील १३ गोष्टी नदीच्या पाण्यात करणं वर्ज्य सांगितले आहे.

गंगा पुण्यजलां प्राप्य त्रियोदश विवर्जयेत्
शौचमाचमन सेकं निर्माल्यम् मल घर्षणम्

१) शौच २) आचमन ३) बाहेरील पाणी टाकणे ४) फूल आणि पाने ५) मैला सोडणे ६) गंगेच्या पाण्यामध्ये साबण लावणे ७) गंगेमध्ये स्नान करणे ८) गंगेच्या पाण्यात दान देणे आणि दक्षिणा घेणे ९) अश्लील वर्तन १०) अनुचित किंवा त्रुटीपूर्ण स्तुती किंवा मंत्रोच्चार ११) वस्त्र धुणे १२) पाण्याचा प्रवाह थांबविणे १३) प्रेत सोडणे.

कित्येक हजार वर्षापूर्वी आपल्या पूर्वजांनी गंगामैया प्रदूषित होऊ नये म्हणून श्लोकाद्वारे सामान्य व्यक्तींवर सामाजिक बंधने घातली होती; परंतु आज गंगेवर सिनेमा निघतो 'राम तेरी गंगा मैली' गंगा शुद्धीकरणासाठी अखिल भारतीय स्तरावर युद्धपातळीवर योजना आखावी लागते. 'Gange Action Plan' १९८५ साली गंगेच्या या प्रदुषणावरती मा. पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली 'गंगा प्रदूषण निर्मूलन समिती' स्थापन केली. या समितीचे घोषवाक्य आहे 'सागरापासून आकाशापर्यंत' म्हणजे गंगा सागरापासून गंगोत्रीपर्यंत गंगामातेची पूर्ण शुद्धता १९८६ सालच्या गंगाप्रदूषण अहवालाप्रमाणे.

१) गंगा नदीची एकूण लांबी २,५५२ कि. मी.

२) गंगेच्या पाण्यावर अवलंबून नसणारी लोकसंख्या १८ कोटी.

३) गंगेच्या पाण्यावर अवलंबून असणारे पशुधन २५ कोटी.

४) सुमारे १ लाख ५० हजार औद्योगिक कारखाने आपल्या कारखान्यातील रासायनिक टाकाऊ पदार्थ कोणतीही प्रक्रिया न करता गंगेमध्ये सोडतात.

५) गंगा नदीमध्ये सोडल्या जाणाऱ्या दरवर्षीच्या प्रेतांची संख्या ५५ हजार (सरासरी)

६) गंगा नदीमध्ये दरवर्षी सापडणारी हाडे असंख्य.

७) गंगा नदीवरती अवलंबून असणारी शहरे ६९२, २०० खेडी त्यांमधील २९ शहरे प्रथम दर्जाची. या २९ शहरातून ८३ टक्के गंगा नदीचे प्रदूषण होते. उरलेल्या सर्व शहरातून ९० टक्के सांडपाणी गंगेत सोडले जाते.

८) २६ टक्के सुपीक जमिनीचे उत्पादन गंगा-नदीच्या पाण्यावर आहे.

९) भारतातील एकूण पाण्याच्या २५ टक्के पाणी गंगानदी पुरविते.

ही झाली नुसती आकडेवारी. यावरून कल्पना येते आपण आपल्या आईच्या बाबतीत किती कृतघ्न आहोत.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून गंगानदीचे प्रदूपण.

**अ) रासायनिक प्रदूषण--**

८,८७,१३३ टन फॉस्फरस, ९१४२७ पोटॅशिअम इतकी द्रावणे पाण्यात सोडल्यामुळे २६.९ टक्के गंगा-नदीचे पाणी प्रदूषित होते. ५३.४ टक्के लहान खेडयां-मधून ४६.६ टक्के औद्योगिक क्षेत्रातून इतक्या सगळ्या प्रचंड प्रदूषणानुळे आंतरराष्ट्रीय जल परिषदेमध्ये ज्या गंगानदीचे पाणी शुद्ध कसे आहे, हा काही वर्षापूर्वी संशोधनाचा विषय होता तेच पाणी आता किती शुद्ध असेल ते वरील आकडेवारीवरून मिळते.

**ब) अनेक रोगांवर अपायकारक**

शुद्ध गंगेचे पाणी पूर्वी विषमज्वर, महारोग, त्वचा-रोग, पोलिओ. टी. बी. कावीळ. असे कितीतरी महा-भयानक रोग बरे होण्यास उपयोगी पडायचे, तेच पाणी आता हे रोग होण्यासाठी मदत करीत आहेत.

**क) हरिद्वार येथून होणारे गंगेचे प्रदूषण**

हरिद्वार येथून पुढील नाले गंगानदीस मिळतात. कसातील आकडे लीटर प्रती मिनीट आहेत.

१) भीमगोडा नाला ६२

२) कागडी मंदेर नाला १८०

३) ललिताराव नाला १०४

४) बूच्चा नाला १२००

५) कसाई मोहल्ला नाला २०,०००

**ड) कानपूर शहरातून होणारे गंगेचे प्रदूषण**

१) कानपूर शहरामध्ये एकूण १८ नाले आहेत. या नाल्यातून दरवर्षी सरासरी २७ कोटी लिटर प्रदूषित पाणी गंगेस मिळते.

२) कानपूरमध्ये एकूण ६० चर्मोद्योग आहेत. भारतात प्रसिद्ध असलेल्या कानपुरी चपलांमुळे गंगेमध्ये हाडे, मांस, शिंगे, रक्त आणि रंग कोणतीही प्रक्रिया न करता कायम जाऊन मिळत असतात.

**गंगा प्रदूषणावरील उपाययोजना**

१) गंगेच्या किनारी असलेले सर्व घाट स्वच्छ राखणे आणि कायम स्वरुपी स्वच्छतागृहे बांधणे.

२) गंगा नदीमध्ये मिसळणाऱ्या सर्व घाण नाल्यांचे एकत्रीकरण करून त्यावर प्रक्रिया करून ते शुद्ध झालेले पाणी शेतीस पुरविणे.

३) सर्व कारखान्यांना त्यांच्या कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या पाण्यावर सक्तीने प्रक्रिया करण्यासाठी भाग पाडणे. नियम न पाळणाऱ्यांवर कडक कायदेशीर उपाय-योजना करणे.

४) गंगा नदीमध्ये मृत व्यक्तींची प्रेते सोडण्यावर मनाई करणे.

५) ज्या व्यक्तीस संसर्गजन्य रोग झाले आहेत त्यास नदीत स्नान करू न देणे.

६) मासे आणि बेडूक यांची बेसुमार पकड थांबविणे.

वरील सर्व उपाययोजना जर आपण युद्ध पातळीवर अमलात आणल्या नाहीत तर अमृतदायिनी गंगा, विष-दायिनी होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

कोटयवधी भारतीयांच्या हृदयात मातेचे स्थान असणारी गंगामाता, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक अस-णारी गंगामाता जिला कोणी गंगामाता म्हणतात, कोणी गंगा मैय्या, कोणी गंगा अम्मा अशांच्या हृदयात पुन्हा एकदा शुद्ध स्वरूप घेऊन त्यांची मने गंगा जला-सारखी साफ करील आणि एक रस, एक संघ समाज निर्मितीचा निर्भेळ आनंद मिळेल आणि मग माझ्या-सारखे कोटयवधी पुन्हा एकदा म्हणू लागतील. 'गंगा तेरा पाणी अमृत.'

□ □

# ' बाई 'च्या निमित्ताने...

**राजश्री देशमुख**
तृ. व. वाणिज्य

पुस्तकांमधील साचेबंद प्रश्नांखेरीज विद्यार्थ्यांमध्ये इतर सामाजिक प्रश्नांबद्दल जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने बहुचर्चीत लघुचित्रपट ' बाई ' आणि त्याच्या दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांच्याशी चर्चा असा एक कार्यक्रम मॉडर्नच्या जागृती गटाने आयोजित केला.

ह्या लघुचित्रपटात समाजाच्या टीकेला धुडकावून, परिस्थितीला शरण न जाता, स्वतःचे कोलमडणारे घर सावरणाऱ्या आणि त्यास आकार देणाऱ्या स्त्रीचे चित्र रंगविले आहे. स्वतःवर सतत होणाऱ्या अन्यायास न जुमानता, अजूनही स्त्रीतील स्वत्व जागृत आहे आणि एखादी ठिणगी जरी पडली तरी ते नक्कीच प्रफुल्लीत होऊन अन्यायांवर मात करेल असा आशावादी विचार ह्या लघुचित्रपटात मांडला आहे. ह्यातून स्त्रीचे कर्तृत्व आणि शक्ती नक्कीच प्रबळ असून सर्व स्त्री जातीकडे समानतेने पाहावयास हवे असे क्रांतीकारी विचार ह्या लघुचित्रपटातून व्यक्त होतात.

ह्या लघुचित्रपटातील पहिल्या भागात, त्या बाईवर होणारे अन्याय, तिला सोसावी लागणारी मारहाण, नवरा व्यसनाधीन असल्याने तिची होणारी ओढाताण आणि त्यातून मुलांच्या बाबतीत होणारी आबाळ दाखविली आहे. तिच्या नादिष्ट नवऱ्यामुळे ती तिचे बाळ गमावते आणि हवालदिल होते. त्यावेळी इतर स्त्रियांनी केलेल्या सांत्वनातून आपणही त्यांच्याच इतिहासाची पुनरावृत्ती केली आहे हे तिला उमगते आणि ' कुठवर सोसायचं हे ?' ह्या प्रश्नाचे तिला उत्तर सापडते.

त्यानंतर मात्र अशा अन्यायांचा प्रतिकार करत, परिस्थितीवर तोडगे काढत जाणारी स्त्री, जेव्हा आपली मुलगी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेली पाहते, तेव्हा चिडते, पण लगेच स्वतःला सावरून ' अपयश ' यशाची पायरी आहे. तेव्हा अपयशाने खचून न जाता यशाची कास धर असा उपदेश करते. तर आपला मुलगा पुन्हा बुरसटलेल्या विचारांचा आधार घेत आहे हे लक्षात येताच त्यालाही सुनवायला ती कमी करीत नाही.

प्रत्येक स्त्रीमध्ये हिम्मत असते. फक्त ती जागृत व्हावयास हवी ! प्रत्येकास यश पूर्णपणे मिळतेच, असे गृहीत धरणे कदाचित बरोबर ठरणार नाही. उदा. ह्या लघुचित्रपटतील स्त्री आपल्या नवऱ्याची. प्रतिगामी मनोवृत्ती बदलू शकत नाही. असे असले तरी पण ती आपल्या मुलांना शिकवते व त्यांच्या जीवनाला नवीन दिशा देते.

झोपडपट्टी भागात संशोधन प्रकल्प करीत असताना आठ दलित स्त्रियांच्या जीवनाच्या सांगोपांग अभ्यासातून ह्या सत्यकथेची निर्मिती झाली. ह्या कथेत आठही दलित स्त्रियांचे जीवन अनुभव एकत्रित झाले आहेत. आपले विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कित्येक माध्यमे उपलब्ध आहेत. उदा. लेख लिहून प्रबोधन करणे. पण हे विचार ज्या स्त्रियांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे, त्या अल्पशिक्षित असल्याने चित्रपटासारखे दृक्‌श्राव्य माध्यमच त्यामागील हेतू साध्य करू शकेल. जरी ते महागडे असले तरीही जास्त परिणामकारक होऊ शकणारे माध्यम आहे व त्याचाच वापर करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला. हा चित्रपट अतिशय परिणामकारक असून यातील दृश्ये, पार्श्वसंगीत

आणि भूमिका ह्यांचा केवळ मेळच नव्हे तर, ते दृश्य डोळ्यांसमोर साकारण्याची व मनःपटलावर कोरली जाण्याची क्षमता त्यात आहे.

हा लघुचित्रपट तयार करीत असताना आलेले अनुभव भावे यांनी अतिशय रंगवून सांगितले आणि ते सांगताना ज्यांना आपण मागासलेल्या विचारांचे ठरवतो ते किती पुढारलेल्या विचारांचे असू शकतात, ह्याकडेही त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

'बाई' ह्या लघुचित्रपटाच्या अनुषंगाने चर्चाही आयोजित केली गेली. ह्या चर्चेत मध्यमवर्गीय स्त्री आणि दलित स्त्री, यांची स्थिती, त्यांच्यात व्हावयास हवी असलेली क्रांती, त्याचे परिणाम, आणि त्यातून होणारा संघर्ष यावर कित्येकांनी आपले विचार मांडले. सुमित्रा भावे यांच्यामते स्वातंत्र्य म्हटले की, संघर्ष हा अटळ असतो, पण दीर्घ मुदतीत त्याचा परिणाम केवळ चांगलाच होईल; स्वतःच्या घरावर, परिसरावर, आणि समाजावरही ! अर्थात त्या स्वातंत्र्याची किंमत म्हणून काही तात्कालिक किंमत स्त्रीस द्यावी लागेल आणि ती म्हणजे 'सुखाचा आणि सुरक्षिततेचा त्याग करण्याची तयारी' ही होय.

खरोखरच ह्या लघुचित्रपटातील बाई प्रतीकात्मक होती. आणि तिने सर्वांच्याच विचारांना चालना दिली.

□ □

---

### विद्यार्थी - प्राध्यापक कलाकारांनी सादर केलेले

# 'करायला गेलो एक'

यावर्षी प्राध्यापक आणि काही विद्यार्थी कलाकारांनी 'करायला गेलो एक' ह्या नाटकाचा प्रयोग दि. १२ फेब्रुवारी १९८७ रोजी 'भरत नाट्य मंदिर' पुणे येथे सादर केला. या नाटकातील कलाकार पुढीलप्रमाणे :—

| | | |
|---|---|---|
| लेखक | : | कै. बाबुराव गोखले |
| दिग्दर्शक | : | श्री. अनंत जोशी |
| सहदिग्दर्शक | : | श्री. दत्ता लिमये |
| सहाय्य | : | श्रीपादराज आमले, अनिरुद्ध खुटवड, संजय तागुंदे, अजित टेंबे. |

**कलावंत**

| | | |
|---|---|---|
| शंखनाद | : | जगदीश चिंचोरे |
| ममीसाहेब | : | निर्मला मोने |
| मामासाहेब | : | जयंत जोर्वेकर |
| नूतन | : | कु. मेघना देशपांडे |
| नितीन | : | अतुल देशपांडे |
| झारासिंग | : | अनिल वनकळस |
| झेलम | : | गौरी पाटील |
| हरिभाऊ हर्षे | : | दत्ता लिमये |
| पोस्टमन | : | राजीव कुलकर्णी |

# ' आभाळाचे गाणे '

**कोजागिरी श्री. कुलकर्णी**
१२ वी शास्त्र

" यज्ञ घडावा, सदा अलौकिक ।
स्वरहृदयातून उमटो सात्विक ।
जगन्नियंता म्हणो तथास्तु ।
तम दुरितांचे विरणे, आभाळाचे गाणे ।।"

रवींद्र भट यांचे 'आभाळाचे गाणे' हे पुस्तक आकर्षक आहे. मुखपृष्ठावर सर्वत्र पसरलेले निळे सुंदर आकाश व एका टेकडावर उभे राहून आकाशाला कवेत घेऊ इच्छिणारी, त्यासाठी धडपडणारी एक व्यक्ती !

पुस्तकाला ' प्रस्तावना ' म्हणावी अशी नाही. पण आभाळाचे गाणे हीच एक अभिनव प्रस्तावना केल्याचे जाणवते. या गाण्यातच कथानकाच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेचे मनोगत स्पष्ट उभे राहते. आचार व विचार यांनी हे व्यक्तिमत्त्व आभाळाएवढे असणार याची कल्पना येते. या कादंबरीत ' तीन पर्व ' आहेत. एका पिढीने दुसऱ्या पिढीकडे आभाळाच्या गाण्याचा वारसा संक्रमित केला आहे आणि या संक्रमण काळातील वळणावर प्रत्येक पर्व निर्माण झाले. तीन भाग पाडून तीन पिढ्यांची कथा येथे सांगितली आहे. बदलत्या समाजाचे भान लेखकाने सुंदर सांभाळले आहे.

वाई आणि परिसर यांच्या पार्श्वभूमीवरील या कथानकात, पार्श्वभूमीचा वापर अतिशय कल्पकतेने करून घेतला आहे; म्हणूनच वातावरण निर्मितीत, लेखक पुरेसे यशस्वी झाले आहेत. एका स्वाभिमानी माणसाची कथा. एक ताठ, आभाळ कवेत घेण्याचे सामर्थ्य असणारा माणूस, आपली विधवा बहीण व सहधर्मचारिणी यांच्यासह कोकण सोडतो. भाऊबंदकी व वाटणी यांच्यातच गुरफटलेल्या या कूपमंडकांपासून, तो वेगळा होऊ पहातो. माणुसकीच्या ओलाव्याने त्याची जडणघडण झाली आहे. म्हणूनच बहिणीचा मोठ्या भावाकडून होणारा अपमान तो सहन करू शकत नाही आणि ' सर्वस्व ' वाटणारे ते वैभव मागे सारून, नेसत्या वस्त्रानिशी, बायको व बहीण यांची जबाबदारी खांद्यावर घेऊन घराबाहेर पडतो. उभा प्रवास पायी करावा लागतो तरीही स्वाभिमानाने जगण्याची जिद्द धरतो. त्या परिसरातील निसर्गावर व माणसांवर अलोट प्रेम करतो.

कोकण सोडताना होणाऱ्या यातना व तरीही त्या नजरेआड करण्याचा मनाचा प्रयत्न यांचा सुंदर संघर्ष या कथानकाच्या सुरुवातीलाच आविष्कृत झाला आहे. आकर्षक सुरुवात, ओघाने येणारे घटना, व्यक्तिरेखा यामुळे पुस्तक निश्चितच वाचनीय झाले आहे. स्वच्छ पाण्याची निखळ धार वाहात राहावी तसे कथानक ओघवते आहे. ते अधिक प्रभावीपणे मांडले आहे. कोकणास्थांच्या स्वभावाचे बारकावे रेखीवपणे रेखाटले आहेतच, पण वाई व परिसरही लेखकाने इतक्या तपशिलाने वर्णिला आहे की कथानकातील पात्रांपाठोपाठ आपणही धोम, मेणवली, आसगाव, गणकेश्वर, कृष्णामाईचे विशाल पात्र येथे संचार करून येतो. लेखकाची वर्णनशैली इतकी जबरदस्त आहे की प्रसंग व वास्तू डोळ्यांसमोर साकारतात. दामोदरपंत, सावित्री, गोदाक्का देशावरच्या वाटेला लागतात तो प्रवास, कृष्णामाईचा उत्सव असे कितीतरी प्रसंग ! नदीचा उत्सव जितका सावित्रीला आश्चर्यचकित करतो

तितकाच वाचकांनाही ! साऱ्या गावानेच नव्हे तर पंचक्रोशीने एकत्र येऊन मातेचे पूजन करून कृतकृत्य व्हावें, तिच्या ऋणात राहावे हे अभिनवच. प्रवचनकाराच्या निमित्ताने कृष्णामाईसाठी वापरलेली विशेषणे मनात घर करतात. आणि वाचता वाचता वाचकही त्यावर ताल धरतो. असे असूनही ही वर्णने कंटाळवाणी झाली नाहीत. ओघवत्या व गतिमान भाषाशैलीतील ही वर्णने कथेतील व्यक्तिमत्त्वाचे पैलू गडद करून दाखवणारी असल्याने वाचत राहावीत असे वाटते.

धार्मिक कार्यांचा लेखकाने सांगितलेला अर्थही हृद्य वाटतो. 'देवीचा गोंधळ' इतका विशेषणात्मक मांडला आहे की, आजच्या 'नास्तिक पिढीला सश्रद्ध बनवण्याचे सामर्थ्य त्यात आहे. वाईच्या गणपतीपुढे वाचक दामोदरपंतांसारखाच नतमस्तक होतो. सारे 'म्हणणे' येते हे सांगताना सर्व स्तोत्रांचा अर्थ वाचकांपर्यंत पोचवण्यास लेखक विसरले नाहीत.

भाषा साधी, सोपी असली तरी 'सुसंस्कारित' आहे व त्यातूनच लेखकाचे व्यक्तिमत्त्व साकारते. रूद्र, अथर्वशीर्ष, ज्ञानेश्वरी, गीता, संध्या यांसारख्या गोष्टी लेखकाने मूळातून आत्मसात केल्याचे स्पष्ट जाणवते.

रचनेचे सौंदर्य हा असाच लक्षणीय मुद्दा ठिकठिकाणी आढळतो. दामोदरपंत श्रीमंत होते असे न सांगता, 'वैभवाच्या सर्व वाटा पंतांच्या वाड्याच्या प्रवेशद्वाराशी मिळत होत्या.' 'जेव्हा सारं जग झोपी गेलेलं असतं तेव्हा संयमी जागा असतो.' अशी कित्येक वाक्ये पानापानागणिक आढळतात.

दामोदर–सावित्री, सदाशिव (अप्पा) – जानकी व गजानन अशा तीन पिढ्या यात साकारतात. काळाची गरज प्रत्येक पिढीने डोळसपणे ओळखली आहे. दामोदरपंतांनी सावकारी केली, पण पंचक्रोशीतील शेतकरी आपलेसे केले. लूट, धाक नाही, हेवेदावे पिळवणूक नाही. जमिनी घशात घालण्याची वृत्ती नाही म्हणूनच प्रेम, जिव्हाळा आहे. गरीब रयतेचे हित करण्याची या 'आभाळाची' वृत्ती आहे.

दुसऱ्या पर्वात, सदाशिवाने–दामोदरपंतांच्या मुलाने, गावात शाळा सुरू केली. हरिजनवस्तीत राबता ठेवला. गोऱ्या साहेबाच्या अन्यायाचे वर्णन अडाणी माणसांना समजेलसे केले. यमुना–अप्पांची बहीण. हीपण गोदाक्का सारखीच माघारी आलेली. पण काळानुसार तिचे जग विस्तृत झाले. तिच्या नशिबी आलवण नाही. अप्पांच्या ओटीवर महारापोरांची शाळा भरते. त्यांना यमुना शिकवते, स्वच्छता, देशभक्ती व प्रामाणिकपणा. तिलाही त्यामुळे अटक होते. तुरुंगवासातील कष्ट व कदान्नाने ती मरण पावते, पुढे ४२ ची चळवळ भरात येते, स्वातंत्र्यही मिळते आणि गांधींची हत्या होते. त्यात रक्तमांसाचे खतपाणी घालून वाढवलेले आसगाव आणि अनेकांना जीवनदायी ठरलेला अप्पांचा वाडा आगीच्या भक्ष्यस्थानी पाडला जातो. अप्पा विषण्ण होतात. पंचवार्षिक योजना आखल्या जाऊन हा सारा परिसर धरणाखाली जातो. तेव्हाची लोकांची परिस्थिती व नव्याला सामोरे जाण्याची अप्पांची वृत्ती म्हणून तेथे धरणे उभी राहातात व समृद्धीचे नवे पर्व सुरू होते.

तिसऱ्या पर्वात गजानन–अप्पांचा मुलगा मॅट्रिक होतो. पुण्यात शिक्षण घेतो, तेथेच बस्तान बसवतो जिमखान्यावर घर बांधतो. लग्न होते, मुले होतात. अप्पा प्रत्येक वेळी येतात पण खरी ओढ आसगावची व गणकेश्वराची. म्हणूनच तुफान पावसात, रुद्राचा जयघोष करीत अप्पा गणकेश्वराच्या चरणी लीन होतात.

या संपूर्ण कादंबरीभर अडाणी समाजाची अहोरात्र चिंता, समाजभिमुखता, नम्रता, कृतज्ञता आणि माणुसकी हे गुण तिन्ही पिढ्यांमध्ये दिसतात. खूप मोठ्या कालावधीत हे कथानक घडले असूनही व्यक्तिरेखा स्पष्ट, ठाशीव आहेत.

यातील तिन्ही पिढ्यातील हे 'कर्ते' घराण्याचा ठेवा जतन करावा तसे 'आभाळाचे गाणे' जपतात व गीता भागवतासारखे मनात घोळवतात. एका ध्येयासक्त घराण्याचा हा ज्वलंत इतिहास आहे. परंतु एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, लेखकाला हे कथाबीज मिळाले नसून, अनुभवातून स्फुरले नाही ना असे वाटते. कारण लेखक स्वतःच्या त्या (वाईच्या) परिसरावर अलोट प्रेम करीत असावेसे वाटतात. पुण्यात काय किंवा परदेशात काय, त्यांचे मन रमत नाही असे वाटते.

आणि फिरून फिरून 'आठव' येतो वाईचा धोमचा आणि आसगावचा !

□ □

# गुलाम

**स्वप्नगंधा दिवेकर**
११ वी शास्त्र

रात्री ८–९ चा सुमार असेल. रस्त्यावर गर्दी चालूच होती. इतक्यात...

...इतक्यात एकच हलकल्लोळ माजला. घराघरात ढणढणणारे टी. व्ही., टेपरेकॉर्डर एकदम बंद पडले.

...शी ! ऽऽ आता ' चित्रहार ' कसं बघणार ?

...उकडून जीव जातोय नाही ?

...बाई ग ! आता मला उद्या चुरगळलेलाच ड्रेस घालून जावं लागणार !

...आता कसा करून देऊ मी तुम्हाला मँगोजूस ?

एक ना अनेक उद्गार ! मात्र नैराश्यानेच भरलेले. काही केल्या कोणाही ' गुलामाचे ' आवाजच बंद व्हायला तयार नाहीत. हो ! प्रसंग तसा बाकाच होता आणि तो एकदमच सगळ्या गुलामांवर गुदरला होता. ' लाईट ' गेले होते.

मला माहीत आहे, तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवणार नाही. पण मी म्हणत आहे, त्यात काहीही खोटं नाहीये, आपण सगळे एकजात ' गुलाम ' आहोत.

गुलाम ! पूर्वी निग्रोंना गुलाम म्हणत ! त्यांना वाळीत टाकलं जाई. पण आज कोण आणि कोणाला गुलाम करणार ? कारण आज सगळेच गुलाम आहोत. त्यांना राबावं नाही लागत मालकांच्या घरी ! पण त्यांच्या तालावर नाचावं मात्र लागतं.

माहीत आहे, आपण कुणाचे गुलाम आहोत ? आपण, आपणच निर्माण केलेल्या साधनांचे गुलाम आहोत. पंखे, टी. व्ही., फ्रीज, रेडिओ, इस्त्री, टोस्टर, वॉशिंग मशिन, विडिओ, कूलर .आणि कितीतरी.

आणि त्याचमुळे ' मालक ' चिडल्यामुळे रडायची वेळ आली सगळ्यांवर.

बुधवारचा दिवस ! ' चित्रहार 'सारखे मनोरंजक (!! ??) कार्यक्रम ! भर मे चा मध्य. उन्हाळ्याच्या सुट्टीचा ' मूड ' ! सुर्यास्त होऊन दीडदोन तास झाले. तरी उकडायचे थांबले नव्हते. परंतु तशातच गार वाऱ्याचे झोत, (अर्थातच पंख्यातून आलेले) शरीराचा थकवा दूर करत होते. टेपरेकॉर्डवरील संगीत आनंदमय वातावरण निर्माण करत होते. प्रत्येकजण आपापल्या कामात व्यग्र होते. ताई घाईघाईत कपड्यांना 'इस्त्री करत होती. सगळ्यांच्या खास फर्माईशमुळे आई ' मँगोजूस ' करायच्या नादात होती आणि इतक्यात...

खरंच या गोष्टींखेरीज आपलं पानसुद्धा हलत नाही. पण पूर्वीच्या काळातले लोक ' आपल्यासारखे ' नव्हते. गार पाण्याने केलेली आंघोळ चालायची. कंदिलाच्या प्रकाशात, त्यांची सगळी कामं व्हायची. त्यावेळी कपड्यांचे आकर्षण नव्हतेच. ' टेप ' केलेल्या रागदारीपेक्षा हे लोक मैफिलींना जात.

याउलट आपण सगळे ! मी मान्य करते. यंत्र म्हणजे आजच्या युगातील देव, दैत्य आणि जादूगारही. पण त्याच्या आहारी किती जायचं हे शेवटी कोणी ठरवायचं ? आपणच ना ? सक्काळी सक्काळी पाणी तापवण्यापासून ते रात्रीच्या कूलरपर्यंतची सवय आपल्या रक्तात भिनली आहे. मोलकरणीची मिजास कशाला ? त्यापेक्षा वॉशिंग मशिनच छान. ' जातं ' तर दूरच राहिलं आता, पण साधं गिरणीतून दळण आणणंही आपल्याला ' कष्टाचं ' झाल्यानं त्याचीही यंत्रं आली. हल्ली माठातल्या पाण्यापेक्षा फ्रीजमधलं थंडगार पाणी व बर्फच आपल्याला ' तृप्त ' करतात. ई ऽऽ तुमच्याकडे साधा टी. व्ही. ही नाही ?

म्हणजे गुलाम होणं, ही आपला समाज प्रतिष्ठाच मानतोय.

ए ताई ! उठ ना ! माझी तंद्री भंग झाली. पुण्यमित्र म्हणत होता, ' ए बघ ना ' दिवे ' आले ! चित्रहार बघायला नाही येणार ?' काहीही न बोलता मी टी. व्ही. समोर जाऊन बसले. एक गुलाम दुसरं करू तरी काय शकतो म्हणा ! □ □

# कॉलेजजीवन... कालचे अन् आजचे !

**वर्षा दीक्षित**
प्रथम वर्ष वाणिज्य सी

कॉलेजजीवन... मनाचा एक कप्पा अगदी ओनरशिपने आपण कॉलेजजीवनाला दिलेला असतो.

सहाजिकच आजचे कॉलेजजीवन किती अन् कसं बदलले आहे हे बघण्याची उत्सुकता कालच्या कॉलेज विद्यार्थीना असते अन् आपले आईबाबा कॉलेजात असताना आपल्यासारखेच वागत असतील का ? असा प्रश्न आजच्या कॉलेज विद्यार्थ्याला पडतो.

'आमच्या वेळेस असं नव्हतं' हे वाक्य प्रत्येक पिढी आपल्या पुढच्या पिढीला सुनावते अन् पुढची पिढी 'जाऊ दे, जनरेशन गॅप आहे' असं म्हणून सोडून देते.

खरंच कालचं कॉलेजजीवन कसं असेल ? अनेक कथा–कादंबऱ्यांतून आपल्याला ते दिसते, अन् कॉलेजजीवन ही तर हिंदी चित्रपटवाल्यांची पिढीजात मालमत्ता, अगदी दोन्हीचे साताजन्मांचं नातं !

त्यातूनच आपल्याला समजू शकते की, आँखो ही आँखो में इशारा कैसे किया जाता है ? किंवा कॉलेज गॅदरिंगमध्ये आर्ततेने आपल्या मेहबूबाला कशी साद घालावी इ. इ. असो.

आठवणी ज्याच्यामागे दडलेल्या असतात असा, जाने कहाँ गये वो दिन ? प्रश्न मनात येतो अन् एक एक आठवणी डोळ्यासमोर येतात.

ते वाङ्मय मंडळ, त्या वादस्पर्धा, स्नेहसंमेलने, त्या सहली, अभ्याससहली, निवडणुका, प्रेमप्रकरणे, केलेली नाटकं, किंवा पास झालो असे कळले तो सुखाचा क्षण इ. सर्व काही 'कॉलेजजीवन' हा शब्द उच्चारताच आपल्या मनात येते मग एखाद्या माजी कॉलेज सुंदरीला आपल्या रुपाकडे (तेव्हाच्या !) पाहून वडिलांनी एस्. एन्. डी. टी. लाच जा असं सांगितल्यावर झालेला मनाचा हिरमोड आठवतो. तर कोणाला 'प्रेम करणं हा गुन्हा आहे का नैसर्गिक प्रवृत्ती !' अशा गहन विषयावर वादस्पर्धेत तळमळीने विचार मांडल्यावर मिळालेली कोणाची तरी पुसटशी दाद याद येते.

कॉलेजात असताना आपली जीभ भलतीच तेज असते, खाण्याच्याबाबतीत अन् बडबडण्याच्याबाबतीतसुद्धा.

पूर्वी खवय्येपणाची सीमा म्हणजे स्वीटहोममधली साबुदाण्याची खिचडीवर जायफळयुक्त कॉफी फारफार तर बेडेकरांची मिसळ अन् क्वचित कधी तरी कँपातलं काही तरी...

पण आता, खैबरला सिल्व्हर ज्युबिली आईस्क्रिम काय क्लास मिळतं; किंवा तू बोरावकेचे चिकन कितीदा खाल्ले आहेस ? असले उद्‌गार सर्रास कानी पडतात.

आमच्या तीर्थरुपांच्या पिढीतील पोरं व्यायाम करायची तर हल्लीची पोरं 'फिटनेस'साठी हेल्थ क्लब जॉईन करतात.

पूर्वी पर्वतीवरून कॉलेज विद्यार्थ्यांना पुण्याचे विहंगम दृश्य पहायला मिळायचे आता फर्ग्युसन हिलवरून 'सिनरी किती क्यूट' दिसते.

मागची पिढी स्नोपावडरवर समाधानी असायची. हल्लीच्या पिढीसाठी जसा फॅमिली डॉक्टर असतो तशी फॅमिली ब्युटीशियन असते.

पूर्वी कपडालत्ता व्यवस्थित असे, सध्याचा तुम्हाला कॅज्युअलवेअर हा प्रकार माहीत आहे का ? बॅगी,

लुझर्स, विंडचिटर्स, जर्किन्स, स्टोनवॉश, खादीसिल्क, इ. प्रकार तेव्हा कुठे होते ?

टेरिनचा शर्ट, वुलनकोट, गॅबर्डीनची पँट, व्यवस्थित तेल वगैरे लावून पाडलेला भांग अशी वेशभूषा असली की हा कॉलेजकुमार दिसतोय असं लगेच ओळखू यायचे. आता बॅगी, रफ स्टोनवॉश शर्ट अन् शाम्पू केलेली जुल्फं म्हणजे कॉलेज स्टुडंट !

पूर्वी गल्लीतल्या शिंप्याने शिवलेला शर्ट व्यवस्थित बसायचा. आता यूऽनो ? आता 'मॅनशुअर', 'रिगल' शिवाय कोणाला व्यवस्थित फिटींगच जमत नाही.

पूर्वी गल्लीगल्लीत लेडीज स्पेशालिस्ट्स् असायचे आता 'लिबर्टी', वास्ते यांच्याशिवाय कोणीच छान (सुपर्ब) स्टीचिंग करू शकत नाही.

मागच्या पिढीत प्राध्यापकांशी नम्रतेने वागण्याची प्रथा होती असे ऐकिवात आहे. आता What is Namrata ? 'O' politeness ! असे सोप्या भाषेत सांगितल्यावर लक्षात येते.

माजी कॉलेज युवकयुवतींनी 'Come ना' वगैरे असे उद्‌गार कधी काढले नसतील पण आता 'O. k. बाबा' ! अशा तऱ्हेचे उद्‌गार सर्रास ऐकू येतात.

पूर्वी सायकलवरून कॉलेजला जाणे ही चैन होती. आता ओरिजिनल होंडा नाही– निदान हीरो-होंडा तरी असावी अशी सर्वांची अपेक्षा व मागणी असते.

तेव्हा वडिलांच्यासमोर सुपारी खायची भीती वाटायची असे अनेकजण सांगतात. आताचा रवी आपल्या पपांना सिगारेट ऑफर करतो. सर्व गोष्टी बदलत आहेत, कायम आहे फक्त उत्साह !

पूर्वीचे विद्यार्थी पु. लं चे फॅन होते; आता त्यांची जागा व पु. काळे, सुहास शिरवळकर यांनी घेतली आहे. पेरीमॅसनसुद्धा बरेचजण वाचतात.

तेव्हा एल्वीन प्रिस्लेची क्रेझ होती. आता मायकेल जॅक्सन पॉप्युलर आहे. तेव्हा दिलीपकुमार अगदी फॉर्मात होता आता सध्या अमुक एकजणच फॉर्मात आहे असे नाही.

एक महत्त्वाचा फरक म्हणजे पूर्वी आपल्या मित्र-मैत्रिणी (सहाध्यायी) ना अनेक वचनाने संबोधले जाई आता एकेरी नावाने बोलले जाते.

आणखी एक गोष्ट तेव्हा भारतात टी. व्ही. नव्हता त्यामुळे टीव्हीवेडे कॉलेजविद्यार्थी तेव्हा नव्हते.

तेव्हासुद्धा व्यसने होती, पण आता त्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे अन् 'मनात आले ते केले' अशी वृत्ती आता वाढीस लागली आहे. सारासार विचार करण्याची वृत्ती आता क्वचित असते. आजच्या कॉलेज-विद्यार्थ्यांमध्ये पाश्चात्यांच्या अनुकरणामुळे स्वैराचार बळावला आहे. आपली संस्कृती, धर्म आदी विषयीचा आदर कमी होत आहे.

स्वैराचारीवृत्ती, व्यसने ही आपणच निर्धाराने आपल्यापासून दूर ठेऊ शकतो आणि एक राहिलेच, अलीकडच्या काळात शास्त्रीय संगीताविषयीची आवड कॉलेज विद्यार्थ्यांमध्ये एकदम वाढीस लागली आहे असे दिसते. कारण पूर्वीही सवाई गंधर्व संगीत महोत्सव पुण्यात व्हायचा. अजूनसुद्धा होतो, तेव्हासुद्धा कॉलेज-विद्यार्थी त्याला गर्दी करत, पण तेव्हा संगीत ऐकण्यासाठी गर्दी असे. आता हा महोत्सव दृकश्राव्य असतो. अशा समजुतीने कॉलेजातली पोरं (आणि पोरीसुद्धा) शाली फलकारत, च्युईंगम, बडिशेप इ. चघळत, 'Hownice' अशी दाद देत रात्री जागवतात.

आजचा कॉलेजयुवक तसा अगदीच वाया गेलेला नाही असे कुठली दुर्घटना वगैरे घडली की, मदतीसाठी युवक पुढे असतात यावरून दिसून येते.

उद्याचे कॉलेजजीवन निश्चित वेगळे असेल. तेव्हा आमची पिढी पुढच्या पिढीला म्हणेल 'आमच्यावेळी नव्हतं असलं काही !'

□ □

# असा मी तसा मी
# कसा मी कळेना

**उमा गोविंद दातार**
११ वी सी

लहानपणी आपण सर्वांनी बाळकोबा सांगकामेची गोष्ट ऐकली आहे. बाळकोबाला आई सांगते की मावशी देईल ते डब्यात घालून आण. त्याप्रमाणे बाळकोबा मावशीने दिलेलं कुत्र्याचं पिल्लू डब्यात घालून आणतो अन् ते मरतं. बाळकोबाला आई रागवते. सारे हसतात. पण बाळकोबाला प्रश्न पडतो की, 'आईनं सांगितलं तसं वागूनही आपल्याला सारे का हसतात? आपलं काय चुकलं?'

पण पुष्कळदा आपली स्थितीही अगदी बाळकोबासारखीच होते. याचं अगदी सर्वांच्या परिचयाचं उदाहरण म्हणजे, महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर आता स्वतःचे निर्णय घ्यायला शिका असं आई वडील सांगतात. मग एखादा ऐच्छिक विषय आपण निवडतो आणि घरी आपला निर्णय सांगतो. तो ऐकून सगळ्यांचे चेहरे उतरतात. कारण त्यांच्या मते आपण कोणता तरी तिसराच विषय घेणं योग्य असतं! आपण जेव्हा सांगतो की, तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही निर्णय घेतला तेव्हा अनेक प्रकारची उपरोधिक बोलणी ऐकावी लागतात. आपल्याही मनात बाळकोबासारखेच प्रश्न निर्माण होतात. आपलं काय चुकलं ते कळतच नाही. मग वाटू लागतं की, आत्ता स्वतःचा निर्णय घेणारा 'मी' योग्य की शाळेतला आईवडिलांच्या सल्ल्याशिवाय काहीही निर्णय न घेणारा मी बरोबर? आणि मग आपण आपल्या मनाचं खरं रूप किंवा 'कसा मी' चा शोध घेऊ लागतो.

मला असं वाटतं की, आत्मपरीक्षणातून जाणवणारे आपण म्हणजे 'असा मी' आणि दुसऱ्यांना त्यांच्या निरीक्षणातून आपण 'तसा मी' ही मनाची किंवा 'मी'ची दोन रूपं आरशातील प्रतिमांसारखी एकमेकांच्या विरुद्ध असतात. याचं साधं उदाहरण म्हणजे आपण काही वेळा आपल्याला योग्य वाटेल ते विचार करून करतो. तेव्हा असा मीच्या दृष्टीने ते योग्य, पण लोकांच्या दृष्टीने 'तसा मी' हट्टीपणा करतो. अशा या एकमेकांच्या विरुद्ध प्रतिमा.

या दोन 'मी'मध्ये तफावत कायम असते. फक्त प्रत्येक वेळी त्यांच्यातील जो श्रेष्ठ अधिक ठरेल त्याच्या अमलाखाली आपण वावरतो. वरील उदाहरणात असा मी श्रेष्ठ ठरला. या उलट रविवारी आपल्याला जरा ताणून द्यावीशी वाटते. पण आपल्याला सारे आळशी म्हणतील अशा विचाराने आपण चटकन उठून कामाला लागतो. या ठिकाणी 'तसा मी' म्हणजे लोकांच्या मनातील प्रतिमा श्रेष्ठ ठरते.

पण गंमत अशी आहे की, आपला 'असा मी' बहुरुप्यासारखा रोज नवीन रूप धारण करतो. त्यामुळे आपण चक्रावून जातो. ह्या असा मीची ही रूपं कवी विंदा करंदीकर फार सुंदर वर्णन करतात. ते म्हणतात—

काही वेळा स्वतःला सृष्टीचा घटक मानून मी जगतो. त्यावेळी इतरांनाही जगण्याचा हक्क आहे हे पटतं. पण हाच मी वेळ पडली तर स्वार्थाकरिता कुणाला या जगातून उठवायलाही कमी करत नाही.

सागरासारखी गर्जना करून कधी कधी 'मी'साऱ्या संकटांवर मात करतो. आणि हाच मी काही वेळा इतका भित्रा होतो की, एखाद्या सत्याची तो स्वतःलाही कबुली देऊ शकत नाही. वास्तवापासून दूर जाऊ पाहातो.

जेव्हा सारी सुखं हात जोडून उभी असतात तेव्हा 'मी' आनंदात असतो. पण जेव्हा दुःख, दारिद्र्य त्याला घेरतात तेव्हा तो इतका केविलवाणा होतो की तो परमेश्वराजवळ मृत्यूची भीक मागतो.

ही झाली असा मीची रूपं, पण तसा मी सुद्धा सतत बदलत असतो. याचं कारण म्हणजे बघणाऱ्यांचे अनुभव बदलतात. त्यांचे दृष्टिकोन बदलतात. आणि प्रत्येक वेळी ते आपल्याकडे वेगळ्या चष्म्यातून पाहतात.

यामुळे 'असा मी' व 'तसा मी' यांच्यात सतत स्पर्धा चालू असते. पण बहुतेकदा 'तसा मी' विजयी ठरतो. कारण पुष्कळ वेळा 'असा मी'ला आपली बाजू योग्य आहे माहीत असतं. पण 'तसा मी' विरुद्ध आवाज उठवण्याची ताकद सर्वसामान्य माणसाच्या असामीला नसते. त्यामुळे आगतिकपणे तो तसा मीचे वर्चस्व मान्य करतो. स्वतःचं अस्तित्व विसरतो. एक चाकोरीबद्ध जीवन जगू लागतो. पण कधी तरी असा मी जागा होतो. त्याला जाणवतं की तसा मी पायाखाली आपला बळी देऊन एक हीन जीवन जगण्यात अर्थ नाही. तो म्हणतो, 'शंभर दिवस शेळीचं जीवन जगण्यापेक्षा मला एक दिवस वाघाचं जीवन जगू द्या.'

पण प्रत्येकाला वाघ होणं जमत नाही आणि शेळी म्हणून जगवत नाही. त्यातूनच कसा मीचा शोध घेणं अधिकाधिक अवघड होतं. कारण रोजच्या अनुभवातून आपण बदलतो, इतर बदलतात. कालचा मी आज नसतो, आजचा मी उद्या नसतो. मग 'मी कसा' या व्यवहारी अपूर्णांकाचं उत्तर कधी सापडेल काय? म्हणूनच कवि विंदा करंदीकर म्हणतात,

असा मी...तसा मी...कसा मी कळेना.
स्वतःच्या घरी दूरचा पाहुणा मी!

□ □

## अश्विन पुंडलीक आंतर–महाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धा

अश्विन पुंडलीक आंतर–महाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धेमध्ये १९८६–८७ चे पारितोषिक पुणे येथील अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. योगिनी शरद मुळे यांना मिळाले. त्यांची 'अनंताची वाटचाल' ही कविता सर्वोत्कृष्ट ठरली. अहमदनगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. जयंत कुलकर्णी यांची 'सावल्यांचे वेड' ही कविता उल्लेखनीय ठरली.

१९८६–८७ च्या स्पर्धेकरिता २० महाविद्यालयांतील ४९ स्पर्धकांनी ९२ कविता सादर केल्या होत्या. पारितोषिकपात्र कवितेची निवड करण्याचे काम प्रा. सीताराम रायकर, डॉ. वि. भा. देशपांडे व प्रा. विजय जोशी यांनी केले. महाविद्यालयाच्या कला मंडळाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात कु. मुळे यांना पारितोषिक देण्यात आले.

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्याधर पुंडलीक यांचा मुलगा कै. अश्विन पुंडलीक याच्या स्मरणार्थ मॉडर्न महाविद्यालय ही स्पर्धा अयोजित करते.

**डॉ. द. दि. पुंडे**
संयोजक, अश्विन पुंडलीक काव्यलेखन स्पर्धा

# तत्त्वनिष्ठ !

**एच. के. दांगट**
तृतीय वर्ष विज्ञान

उन्हं झुकली, सावल्या जरा भराभरा वाढायला लागल्या तसा मास्तर उठला. सावकाश बाहेर येऊन तंबाखूची पिंक थुंकून टाकली. चूळ भरली. घड्याळात पाहिले. आयला, आज जरा टाईमच झाला असं रोजच्यासारखं पुटपुटत एका पोराला बेल द्यायला सांगितली.

ठाण ठाण ठाण–ठणाणाणा–

मैदानावर एकच गडबड उडून राहिली. विटीदांडूनी आपापल्या जागा शोधल्या. गोट्या गुपचूप खिशात जाऊन बसल्या. चड्डया वर ओढत सर्वजण वर्गात जाऊन बसले.

'जयंता, चाल लवकर, मधाच बेल झालीय.'

'जाऊ की सावकाश रोजच्यावाणी, काय एवढी घाई.'

'तसं नाय लेका, तू पडतो मोठ्याचा तुझा राग आमच्यावरबी निघायचा. पयली–दुसरीला नवीन बाई आल्यापासनं मास्तर पार बदलून गेलाय. कवा लाडात येऊन गोष्टी सांगत्यात तर कवा धपाधप झोडपीत्यात.'

तशी शाळा म्हणजे काय फार मोठी नाही. वाडीच्या मारुतीच्या देवळाला खेटून बांधलेला मोठा हॉल चौथीपर्यंतचे वर्ग त्यातच बसणार अर्ध्या भागात पहिली दुसरी व राहिलेल्यात तिसरी चौथी. आतापर्यंत एकच मास्तर. पण आता पहिली दुसरीला नवीन बाई आली होती. तसा मास्तर खरोखरच बदलला होता. कधी तिसरीच्या मुलांना सरळ व्याजाची गणितं देऊन चक्रवाढीच्या दराने धोपटायचा तर कधी चौथीच्या पोरांना तिसरीच्या कविता मोकळ्या आवाजात गाऊन दाखवायचा.

आज सूर्यमाला शिकवायला घेतली होती.

'हं, तर मुलांनो एस्टीत बसल्यावर काय होतं?'

बराच वेळ गपगार बसल्यावर एक उभं राह्लिं.

'गुर्जी आमी बैलगाडीत बसतो.'

गधड्या, मी एस्टीतलं विचारतोय.'

तेवढ्यात दुसरं सांगायला उठलं.

'गुर्जी एस्टीत बसल्यावर कंडक्टर येतो आन पैसे घेतो.'

'पैसे घेईल नाही तर फुकाट न्यायला तुझा आजा आहे काय तो. मी विचारतोय झाडांचं अन् घरांचं काय होतं आजूबाजूच्या?'

'ते जाग्यावरच राहतात अन् एस्टी निघून जाते.'

'अरे पळते एस्टी, पण आपल्याला वाटतं झाडंच पळत्यात' गुरूजी समजावणीच्या सुरात म्हणाले.

'अँहँ, झाडं कशी पळतील. तुमीच तर परवा म्हणाले का झाडांना चालता येत नाही.'

आता मात्र मास्तर पुरते वैतागले. चांगल्या दणदणीत आवाजात त्यांनी झाडं चालत नाहीत पण पळतात कशी हे समजावून सांगितले.

'सूर्य आणी पृथ्वीचं तसंच आहे पृथ्वी सूर्याभोवती फिरते पण आपल्याला सूर्यच पृथ्वीभोवती फिरताना दिसतो,'

एवढं झाल्यावर त्यांनी गॅलिलिओने हा शोध कसा लावला. धर्मगुरूंनी त्याला शिक्षा दिली. मग त्याने माघार घेऊन आपले म्हणणे चूक मानले हे सर्व

सांगितले व एकवार बाईकडे पाहून म्हणाले.

'इथं मात्र गॅलिलिओ चुकला. अरे प्राण गेला तरी बेहतर पण तत्त्व सोडायचे नाही. माणसाने तत्त्वासाठी प्राणाची पर्वा करू नये व सत्याची कास धरावी.'

० ० ०

'नाही त्याचं काय हाय, साहेबराव, तुमच्यावर विश्वास आहेच, पण म्हटलं एकदा आठवण करून द्यावी.'

'पाहा, म्हणजे श्रीपतराव, ही वळख का आमची. आवो एवढं पंचायत समितीला तुमच्या पाठीशी उभं राह्यलो, आता फॅक्टरीची आठवण पायजेच कशाला. आरे शंकर दोन चहा आणायला सांग.'

साहेबराव, तसा दाबदार माणूस पाटीलकीचे दिवस गेले पण अंगात मुरलेली उतरत नव्हती. गाव सोडून आता मळ्यात, वाडीत राहात होते. तीस एकराचा हिरवागार तुकडा.

नवं दुमजली कांक्रीटच घर उभं होतं. शाळेपेक्षा तालमीत जास्त घुमल्याणं आता डाव्या हाताचा अंगठा कायम उपयोगात यायचा. पाटीलकीचा फेटा सोडून सोसायट्या, समित्या, पंचायती यांच वारं टोपीबरोबर घुसलं होतं तेवढ्याकरता वाडीत शाळा काढली होती. येत्या दहा वर्षात हायस्कूल आणि पंधरा वर्षातलं कॉलेज त्यांच्या डोक्यात तरारून उभं राहायचं. सभा, सत्कार, भाषणं समदं. पण आता एवढ्यात काहीच नव्हतं. कवा तरी शाळेत जायचं. मास्तरवर आवाज टाकायचा, मास्तरणी म्होरं रुबाब करायचा, पण संधी काही येत नव्हती.

'बरं साहेबराव मी निघतो. लक्ष असू द्या. आन हे जर कमी पडलं तर सांगा.'

अंगठा अन आनखी एक बोट चाळवीत श्रीपतराव म्हणाले.

'हे काय सांगणं झालं. आवो सूर्य एक टाईम प्रिथ्वी-भवती फिरायचा थांबल पर आमी तुमची पाठ सोडनार नाय.'

'श्रीपतराव गेल्यावर जवळच बसलेला जयंता बाच्या जवळ बसत म्हणाला.

'अण्णा, सूर्य नाही पृथ्वीभोवती फिरत, पृथ्वीच सूर्याभोवती फिरते.'

'शिकवा आम्हाला, काय वाट्टल ते सांगतोय.'

'खोटं नाय अण्णा, मास्तरच काल म्हणत व्हते.'

'काय? मास्तरनी शिकावलं हे.'

'व्हय व्हय कालच झालं.'

० ० ०

'रामराम. साहेबराव, कसं काय येणं केलंत. पायऱ्यावर दाणदाण पाय आपटलेलं पाहून मास्तर म्हणाले.

'तसं नाय. यावं लागलं आम्हाला.'

साहेबरावाची गुर्मी पाहून मास्तर चरकलेच.

'पोरांना काय उलटंपालटं सांगताय, म्हणं प्रिथ्वी सूर्याभोवती फिरते.'

'हो मग बरोबरच आहे'—मास्तर.

'बरोबर, काय बरोबर, धडधडीत सकाळच्या वक्ताला उगून संध्याकाळचा मावळायला जातो, आन म्हणे.'

'तसं नाही, त्याचं काय आहे'—

'गप, मला शिकवतोस व्हय. आधी लेंग्याची नाडी आवळ, आन मंग मला शिकव.'

साहेबरावांचा पारा चढलेला पाहून मास्तर जागीच थिजला. नरमाईच्या सुरात म्हणाला,

'नाय पण खरं तेच—'

'पुन्हा उलटं फिरून बोलतुयास, पाहायचाय का हिसका.'

साहेबरावांच्या मुठी आवळलेल्या पाहून मास्तरची गाळण उडाली. आता एवढ्या पोरांसमोर आन बाईसमोर तमाशा टाळायचा-तर एकच मार्ग शिल्लक होता.

'नाय, नाय तुम्ही म्हणता तेच खरं हाय.'

'काय?'

'सूर्यच पृथ्वीभोवती फिरतोय.'

'आस्सं, कसं गुमान राहायचं सोडून नाय तेच बरळतोय.' बाईकडं एक रुबाबदार दृष्टिकोन टाकून साहेबराव चालता झाला.

मास्तर डोके गच्च आवळून खुर्चीत बसले. बसल्या-बरोबर त्यांना आठवलं,

'आरे, प्राण गेला तरी बेहत्तर, पण माणसाने तत्त्व सोडू नये.'

आपण गॅलिलिओला उगाचंच दोष दिला व पोरांना तत्त्वनिष्ठेच्या फालतू गोष्टी सांगितल्या याबद्दल मास्तर मनात खात बसले.

□ □

# डॉ. होमी भाभा : प्रगतीशील भारताचे एक शिल्पकार

**प्रतिभा घावटे**
११ वी, कला अ

आपल्या वाढत्या वयानुसार जगाची ओळख करून देणारे क्षितिज वाढत जाते व आपल्या ज्ञानात अधिकाधिक भर पडत जाते. या ज्ञानलालसेतून काही व्यक्तींबद्दल आपल्या मनात आपुलकी निर्माण होते. राष्ट्राच्या जीवनात सुखाबरोबर दुःखाचेही काही प्रसंग येतात. उदाहरणार्थ, सन १९६६ मध्ये भारतामध्ये काही महत्त्वपूर्ण लक्षात राहण्यासारख्या घटना घडल्या. दिनांक १२ जानेवारी १९६६ या दिवशी स्वतंत्र भारताचे पंतप्रधान लाल बदादुर शास्त्री यांचे निधन झाले, आणि लगेच दि. २४ जानेवारीला एअर इंडियाचे बोईंग ७०७—कांचन गंगा हे विमान जिनिव्हा इथे उतरविण्यापूर्वीच आल्सच्या पर्वतश्रेणीवर आदळले व ११७ प्रवासी मृत्यू पावले. या दुर्भाग्य व्यक्तीत होते भारताचे जगप्रसिद्ध व महनीय वैज्ञानिक डॉ. होमी जहांगीर भाभा, भारताच्या अणुशक्तीमंडळाचे अध्यक्ष. त्यांच्या या अकाली निधनामुळे भारतीय आधुनिक विज्ञान शास्त्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली.

आंतरराष्ट्रीय अणुशक्ती—क्षेत्रात डॉ. भाभांमुळे भारतास फार मोठे स्थान प्राप्त झाले व अणुसंशोधनात भारताची फार मोठी प्रगती झाली. अणुशक्तीचा उपयोग शांततेसाठी व विकासासाठी करावा असे त्यांचे मत होते. 'शांतीसाठी अणू' या शास्त्रज्ञांच्या जागतिक संस्थेचे ते अध्यक्ष होते.

डॉ. भाभांनी केलेल्या अनेक महत्त्वपूर्ण कामगिऱ्यांपैकी त्यांचा विश्व किरणांविषयी केलेला 'फवाऱ्याचा सिद्धांत' महत्त्वाचा होय. त्यांनी या संशोधनातच भिन्न प्रकारच्या अणुघटकांबद्दल एक सिद्धांत मांडला. यामुळे आईन्स्टाईनच्या 'सापेक्षवादाला' एक नवा आधार उपलब्ध झाला. यामुळे डॉ. भाभा हे मोठे गणिततज्ञ होते हे जगाला दिसले. त्यांना वयाच्या अवघ्या ३१ व्या वर्षी 'ब्रिटिश रॉयल सोसायटीची फेलोशिप' देण्यात आली होती.

सैद्धान्तिक—औपपत्तिक शास्त्रांबरोबरच शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीनेच भारताचे व भारतीय जनतेचे राहणीमान उंचावेल हे लक्षात घेऊन त्यांनी व्यक्तिगत संशोधनाकडे पाठ फिरवली व 'आधुनिक भारत' घडविण्यासाठी आपल्या ज्ञान व अनुभवाचा उपयोग करण्याचे प्रयत्न सुरू केले. संशोधन व तंत्रज्ञ यासाठी पाश्चिमात्य राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागू नये, यासाठी त्यांनी भारतातच वैज्ञानिक संस्था निर्माण करण्यास पुढाकार घेतला. 'टाटा मौलिक संशोधन संस्था' आजच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या संस्थेची स्थापना केली. आज ही संस्था आधुनिक भारताचे विज्ञानमंदिर बनले आहे.

आधुनिक भारताचे शिल्पकार व आधुनिक विज्ञान—दृष्टी असलेले माजी व पहिले पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डॉ. भाभांच्या कर्तृत्वास खूप वाव दिला. त्यांनी स्वतः त्यात रस घेतला. 'स्वायत्त अणुशक्ती मंडळ' स्थापन करून त्याचे अध्यक्षस्थान डॉ. भाभांना दिले. योजना व संघटन कौशल्याच्या साह्याने त्यांनी आपल्या राष्ट्रांच्या प्रगतीचा ध्वज उंचावला.

डॉ. भाभांनी अविरत श्रम करून भारतात मुंबईजवळ तुर्भे (ट्रॉम्बे) येथे चार वर्षांत तीन अणुभट्ट्या उभारल्या.

डॉ. होमी हे शिस्तीचे भोक्ते होते. इतक्या दिगंत

कीर्तीचे डॉक्टर भाभा आपल्या शास्त्रज्ञ सहकाऱ्यांशी प्रेमाने, सहानुभूतीपूर्वक व मानवी मूल्ये जोपासून वागत.

डॉ. भाभा जहांगीर भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ मध्ये एका प्रगत, घरंदाज पारशी कुटुंबात झाला. ते लहानपणापासून कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांचे संशोधनात्मक शिक्षण इंग्लंड येथे झाले. तेथे विविध छात्रवृत्त्या संपादन करून जागतिक कीर्तीच्या संशोधकांच्या सहवासात गणित व विज्ञानाच्या शाखेत ही प्रगती केली. प्रथम केम्ब्रिज विद्यापीठात ते विद्युत व चुंबक विज्ञानाचे प्राध्यापक होते. तेथे ते विश्वकिरणांवरील सशोधनाविषयी व्याख्याने देत. परंतु वैयक्तिक प्रलोभनाला बळी न पडता मातृभूमीचे ऋण फेडण्यासाठी हीच कर्मभूमी म्हणून स्वीकारली.

डॉ. भाभा हे निसर्गप्रेमी होते. त्यांचे वृक्षांवरील प्रेम पाहून परदेशी शास्त्रज्ञांनीही त्यांचे कौतुक केले होते. ते एक नाणावलेले चित्रकार व संगीत–शास्त्रात निपुण होते. ते म्हणत, 'मी संशोधक झालो नसतो तर सारे जीवन संगीत-साधनेत व्यतीत केले असते.'

अशा या महान शास्त्रज्ञाला, वैभवाच्या अति उंच शिखरावर असताना, वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी काळाने निघृणपणे आपल्यातून हिरावून नेले. त्यांनी अजून किती महत्त्वपूर्ण कामगिरी केली असती ! ही भावना अजूनही प्रत्येक भारतीयाची कायम राहणार आहे.

जगाच्या वैज्ञानिक क्षेत्रात डॉ. भाभांनी आधुनिक प्रगतीशील भारतातील वैज्ञानिक प्रगतींचा पाया भक्कम मजबूत करून जगात भारताला मानाचे स्थान मिळवून दिले. त्यांच्या कर्तबगारीच्या प्रकाशाच्या झोतात आपण –नवोदित पिढीने–अशीच कर्तबगारी करण्याच्या दिशेने पाऊल ठेवायला नको का ?

□ □



# विद्यार्थी-शिक्षक परस्परसंबंध

**मेघना देशपांडे**
द्वितीय वर्ष शास्त्र

'प्रत्येक माणूस हा आजन्म विद्यार्थीच असतो' हे जरी खरे असले, तरी जीवनाच्या एका विशिष्ट टप्प्यापर्यंत त्याला शिक्षकाची आवश्यकता असतेच. लहान मूल पाहिले पाऊल टाकते, ते मातेचा हात धरूनच. शब्दोच्चार करायला शिकते, ते मातेच्या साहाय्यानेच. या दृष्टीने माता ही त्याची पहिली गुरू! परंतु तिच्या ज्ञानाला मर्यादा असल्यामुळे मुलाला शिकवण्यासाठी ज्ञानी व्यक्तीची जरुरी असते.

प्राचीन भारतात ज्या वेळी वर्णाश्रमव्यवस्था अस्तित्वात होती, त्यावेळी ब्रह्मचर्याश्रमात आचार्यांच्या घरी राहून विद्यार्थी विद्यार्जन करीत असत. राजपुत्र असो वा सर्वसामान्य मुलगा, प्रत्येकाला वयाच्या आठव्या वर्षापासून गुरुगृही राहून, गुरूची सेवा करून, कष्ट करून विद्या प्राप्त करून घ्यावी लागायची. गुरुसान्निध्यात सतत राहिल्याने आचार्यांबद्दल मनात आदर असायचा. त्याचप्रमाणे आचार्यांचा रोष आपल्यावर ओढावला, तर विद्येपासून आपण वंचित होऊ, ही भीती असायची आणि विद्या प्राप्त केली नाही, तर समाजात आपल्याला मानाचे स्थान नाही, ही जाणीवही असायची. गुरू-शिष्य संबंध हे पिता-पुत्राप्रमाणे असायचे. अथर्ववेद, स्मृतीग्रंथ यामध्ये गुरूचा उल्लेख 'अध्यात्मिक पिता' असा केलेला आढळतो. तमसो मा ज्योतिर्गमय हे केवळ गुरूच्या साहाय्यानेच शक्य होणार, ही जाणीव असल्याने विद्याप्राप्ती हेच ध्येय असायचे. विद्यादानाची आत्यंतिक तळमळ असणारा आचार्यवर्ग आणि तितक्याच आत्मीयतेने विद्या आत्मसात करण्यासाठी धडपडणारा विद्यार्थी वर्ग! द्रोणाचार्य-एकलव्य, शुक्राचार्य-कच, सांदिपनी-कृष्ण अशा अनेक गुरुशिष्य जोड्या अजरामर ठरल्या आहेत.

परंतु कालौघात ही आश्रमव्यवस्था हळूहळू बदलू लागली. लोकसंख्या जसजशी वाढू लागली, तशी गुरूगृही राहून विद्या मिळवण्याची पद्धत बंद पडली. पाठशाळेचे रूपांतर शाळेत झाले. इंग्रजांच्या राजवटीत तर शिक्षणाचे स्वरूपच पार बदलून गेले. त्यांच्या राजवटीला पोषक असे कारकून निर्माण करणारी शिक्षण पद्धती त्यांनी अमलात आणली. आणि निर्भिडपणे स्वतःची उपजिविका करण्यास मदत करणाऱ्या विद्येची जागा लाचार, पोटार्थी बाजारी शिक्षणाने घेतली. आमचे दुर्दैव, की स्वातंत्र्य मिळवून ४० वर्षे होत आली तरी थोड्याफार फरकाने तीच शिक्षणपद्धती आम्ही चालू ठेवली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षकवर्ग हा ब्रिटिशांच्या कडक शिस्तीत तयार झालेला असल्याने 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम' हे तत्त्व अंमलात आणणारा होता. विद्यार्थ्यांशी सरळ प्रेमाने बोलायचे असते, हे मुळी त्यांना माहीतच नव्हते. तरीही स्वतःजवळ असलेले ज्ञान विद्यार्थ्यांना द्यायचो तळमळ मात्र निश्चित होती. विद्यार्थ्यांनी खूप शिकावे, वाचन करावे, मोठे नाव कमवावे अशी इच्छा होती. हुशार विद्यार्थ्यांचा त्यांना अभिमान असे. त्या काळात शिक्षक हा मानाचा पेशा मानला जाई सांपत्तिक दृष्ट्या कमजोर असूनही समाजात शिक्षकाला मान असे. उत्तम शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आदर असे.

स्वातंत्र्यानंतर ही परिस्थिती झपाट्याने बदलली.

आमच्याच लोकांच्या हाती सत्ता आणि प्रयोगच प्रयोग सुरू झाले. इंग्रजी शिक्षणाचा खेळखंडोबा तर सर्वश्रुतच आहे. अशा दिशाहीन परिस्थितीत शिक्षक-विद्यार्थी संबंध पार बदलूनच गेले. वर्गात वाढणारी विद्यार्थ्यांची बेसुमार संख्या ! त्यामुळे वैयक्तिक लक्ष देणे अशक्य झाले. विषयांच्या खिचडीमुळे आणि शालेय पातळीवर विषयांच्या निवडीचे स्वातंत्र्य नसल्याने कोणताच विषय विद्यार्थ्यांना आकलन होईनासा झाला आणि यातूनच गाईड्स, प्रायव्हेट क्लासेस यांची निर्मिती झाली. पूर्वीच्या फॅमिली डॉक्टरांची जागा जशी स्पेशलाइज्ड डॉक्टरांनी घेतली, त्याचप्रमाणे स्पेशलाइज्ड प्राध्यापक विद्या वाटू लागले. 'विद्यादान हे पवित्र दान आहे.' ही कल्पनाच आज चेष्टेचा विषय बनली आहे. पोटार्थी शिक्षक वर्ग हा शिक्षणसंस्थेतील एक कारकून वर्ग बनला आहे. अभ्यासेतर गोष्टींच्या नावाखाली अवास्तव गोष्टींना दिल्या जाणाऱ्या महत्त्वामुळे मूळ विद्येकडेच दुर्लक्ष होत आहे. जयंत्या मयंत्या आणि धार्मिक उत्सव यांच्या जोडीला संप, बंद. यामुळे वर्षातील अभ्यासाचे दिवस थोडे, सुट्टया जास्त अशी स्थिती आहे. मग उरलेल्या वेळात वर्षाचा अभ्यासक्रम मुलांच्या डोक्यात कोंबायचा, नोटस्च्या सहाय्याने मुलांनी तो पाठ करायचा. आणि पास व्हायचा प्रयत्न करायचा. कारण शिक्षण घेण्याची तळमळ मुलांमध्ये निर्माण केलीच जात नाही. हवी आहे पदवी, ती नोकरी मिळवण्यासाठी ! येनकेन माध्यमेन ग्रॅज्युएटचा शिक्का बसला की आयुष्याची इतिकर्तव्यता झाली. जीवनातील धकाधकी, स्पर्धा, पुढच्या क्षणाची नसलेली खात्री अशा परिस्थितीत वि याच्या मूळ गाभ्यापर्यंत जाऊन सखोल अभ्यास करावा, असे विद्यार्थ्यांना वाटतच नाही, तेवढा वेळही नाही. असा अभ्यास करणारा एखादा विद्यार्थी असला, तर त्याचो चेष्टाच होते, कौतुक नाही. आणि शिक्षकही उद्या असा विद्यार्थी आपल्या ज्ञानाच्या मर्यादा बाहेर काढेल अशा भीतीने त्याच्या difficulties सोडवण्याऐवजी त्याला उडवून लावतात, 'शिष्यात् इच्छेत् पराजयम्' ही भावनाच नष्ट झाली आहे.

या सगळ्याच्या जोडीला शिक्षकवर्ग आता राजकारणाचा खेळ खेळू लागला आहे. प्रत्येक संस्थेत असलेले गट, त्यांच्यातील हेवेदावे, मत्सर, मान्यामान्या विद्यार्थ्यांना हाताशी धरून एकमेकांचे पाय ओढण्याची वृत्ती ! राजकारणी लोकसुद्धा बरे. कारण ते तेवढा एकच खेळ खेळतात !

राजकारण, शिक्षणसंस्थेत चालणारे प्रयोग, भरमसाठ खर्च करूनही नोकरीची नसलेली शाश्वती, यामुळे जीवनात येणारे वैफल्य. या सर्वांचा परिणाम होतो, विद्यार्थ्यांचा क्षोभ कोणत्या तरी मार्गाने बाहेर पडण्यात मग होते जाळपोळ, लुटालूट, कॉलेजच्या, विद्यापीठाच्या बिल्डिंगची नासधूस ! पोलीस-हस्तक्षेप होतो, वाटाघाटी होतात, तडजोड होते. सारे काही शांत होते. पण ही शांतता वरवरची असते, पाण्यावर येणाऱ्या तवंगासारखी—हा तवंग दूर केला, तर खाली असते गढूळ पाणी, विद्यार्थी शिक्षकांच्या परस्परांविषयीच्या आकसांनी, किल्मिषांनी बरबटलेले !

मग ही परिस्थिती कधी बदलणारच नाही का ? शिक्षक—विद्यार्थी परस्परसंबंध कसे आहेत, यावर ऊहापोह होत आहेत, त्यापेक्षा ते संबंध बदलण्यासाठी सर्वांनी झटले पाहिजे. त्या दृष्टीनेच विचार करण्याची गरज आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरिक असतो. हक्कांची मागणी करताना कर्तव्यांची जाणीव ठेवायला जर विद्यार्थी वर्ग शिकला आणि शिक्षणाचा बाजार मांडून स्वतःची भूक भागवण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करणारा शिक्षकवर्ग जर अंतर्मुख झाला, तर हे संबंध बदलतील आणि विसाव्या शतकातही गुरूदेवांचे शांतिनिकेतन सर्वत्र नांदू लागेल.

□ □

# लोकशाहीचे विडंबन

**राजाराम संभाजीराव दिवेकर**
तृतीय वर्ष शास्त्र

लोकशाही ही केवळ एक शासकीय व्यवस्था नव्हे तर ती एक सहजीवनाची पद्धती आहे. सामुहिक अनुभावी अभिव्यक्ती आहे. आपल्याच हक्कांबाबत नव्हे तर इतरांच्या हक्कांबाबतही आदरभाव बाळगणे हे लोकशाहीनिष्ठ व्यक्तींकडून अपेक्षित आहे. लोकशाही ही न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वावर उभी आहे. ही तत्त्वे लोकांच्या दैनंदिन जीवनात व सामाजिक व्यवहारात जोपर्यंत (बिंबित व) प्रतिबिंबित होत नाहीत तोपर्यंत लोकशाही समाज निर्माण झाला असे म्हणता येणार नाही.

लोकशाहीचा अंगीकार केलेला आणि करीत असतानाच आज समाजात क्षणोक्षणी ज्या अनिष्ट प्रवृत्ती उदयास येवून लोकशाहीला विकृत स्वरूप देण्यास कारणीभूत होत आहेत त्याचीही दखल घेणे फार आवश्यक आहे. लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिमत्त्वाची प्रतिष्ठा ही मूल्ये शिरोधार्थ मानली जात असल्यामुळे, प्रत्येक व्यक्तीला काही हक्क व अधिकार प्राप्त झाले आहेत. त्या अधिकारांच्या सुरक्षिततेची हमीही प्राप्त झाली आहे. परंतु त्या अधिकारांच्या उपभोगासाठी आवश्यक असलेली कर्तव्याची जाणीव लोकांमध्ये निर्माण झाली नाही. शिस्तपालन व कष्ट करण्याची वृत्ती लोकांमधून कमी कमी होत आहे. शिक्षणाची संधी व स्वातंत्र्य सर्वांना मिळाले आहे, परंतु अभ्यास करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये वाढत आहे काय ? आमचा शिक्षकवर्ग अधिकारांबद्दल व प्रतिष्ठेबद्दल–जागृत झाला आहे. परंतु अध्यापनकार्याबद्दल निष्ठा व विद्यार्थ्यांच्या विकासाची तळमळ किती शिक्षकात व किती प्रमाणात आढळते ? इतरही क्षेत्रात हाच प्रकार !

कमीत कमी काम व जास्तीत जास्त लाभ हे आज आमच्या जीवनाचे आदर्श सूत्र ठरू पाहत आहे. हक्क आणि अधिकार तरी योग्य व न्याय्य असावेत ना ? परंतु त्याही बाबतीत कोणताही विवेक आढळून येत नाही. वर्गातील उपस्थितीचे प्रमाण कमी असले तरी परीक्षेला बसू द्या, अभ्यासक्रम सोपा करा, प्रश्नपत्रिका कठीण काढू नका, नापास विद्यार्थ्यांना पास करा, 'कॉपी' करू द्या ह्या मागण्यांना न्याय्य म्हणता येईल काय ? हे हक्क वा अधिकार आहेत काय ? परंतु अशा प्रकारच्या मागण्यांची पूर्तीही आंदोलनाने होत आहेत. आजच्या या लोकशाहीच्या काळात आंदोलने, मोर्चे, घेराव, उपोषणे हे प्रकार नित्याचेच होऊन बसले आहेत. दुर्दैवाने आमच्या शासनयंत्रणेचा कारभारही असा काही ढिला व गलथानपणाचा आहे. (उदा. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींचा खून–तोही अंगरक्षकाकडून – की लोकांच्या न्याय्य मागण्यांची पूर्तीही आंदोलनाशिवाय होऊच नये. जोवर आंदोलने नाहीत, तोवर शासन त्या मागण्यांचा विचार करायला तयार नाही असाही खाक्या पडला आहे. शासन व अधिकारी दडपण आणले तरच काम करतात याची लोकांना जाणीव झाल्यामुळे अन्याय मागण्यांसाठी, स्वार्थ पूर्तीसाठीही आंदोलने करून व शासनावर दडपण आणून लोक आपला कार्यभाग साधून घेत आहेत.) आमचे लोकाभिमुख सरकार लोकांच्या दडपणाला वेळोवेळी बळी पडत आहे. असेही दुष्टचक्र

कोणालाच थांबवायची गरज वाटत नाही. विद्यार्थी संघटनापासून तो मोठमोठ्या सामाजिक व राजकीय संघटना आज याच मार्गाचे सर्रास अनुकरण करीत आहेत. लोकमत आणि लोकशक्तीचे दडपण शासन, विद्यार्थी, शिक्षणसंस्था वा अधिकारी यांच्याकडून आपल्या कोणत्याही मागण्या मंजूर करून घेणे व आपल्या स्वार्थाला व हितसंबंधांना अनुकूल असे बदल शासन, विद्यापीठ वा शिक्षणसंस्था आणि शिक्षणखाते यांनी सादर केलेल्या धोरणात आणि नियमात घडवून आणणे हाच जर लोकशाहीला अभिप्रेत असलेला अर्थ असेल तर ती खरी लोकशाही नसून, लोकशाहीची विकृती होय असेच म्हणावे लागेल.

अशा प्रकारच्या अनिष्ट प्रवृत्तीमुळे खऱ्या लोकशाही मूल्यांचा कसा ऱ्हास होत आहे, लोकशाहीचे कसे विडंबन होत आहे, याचीही जाणीव सर्व समाजाने करून द्यावी. केवळ बहुमतावर नव्हे, तर गुणवत्ता, विद्वत्ता, नीतिमत्ता, चारित्र्य या गुणांनी संपन्न अशा नेतृत्वावर अधिष्ठित अशी लोकशाही निर्माण करण्याची प्रेरणा व क्षमता नव्या पिढीत निर्माण झालीच पाहिजे तरच लोकशाहीच्या उज्ज्वल भवितव्याची आशा करता येईल.

□ □

---

**उल्लेखनीय कविता :**

## सावल्यांचे बंड

कधीतरी सावल्यांनीच
बंड करून उठले पाहिजे
मुठीमधले वादळ वणवे
रस्त्यावरती आणले पाहिजे ।।
कातरलेल्या आकृत्यांची
साचेबद्ध कात टाकून
आकाशातल्या चंद्राला अन्
उगवणाऱ्या सूर्यालाही
सवाल एक सुसला पाहिजे ।। १ ।।
दिवस रात्र काबाडकष्ट
फिरणाऱ्याच्या मागून फिरणे
इच्छेनुरूप त्रयस्थांच्या
आकार आपला बदलत राहणे
सारे आकार टाकून देऊन
एकच आकृती जपली पाहिजे ।। २ ।।
झाडे, वेली, पाने–फुले
साऱ्यांचेच एक दुःख
माणसांच्याच सावलीला
विश्वासाचे असतात अर्थ !
आणि यांची सावली केवळ ठरते
रिकामपणाचा एक छंद ।। ३ ।।
म्हणूनच वेड्या सावल्यांनीही
माया उगीच लावू नाही
बदलणाऱ्या मातुसंगे
काया आपली बदलू नाही
मनामधले ज्वालामुखी
पेटून आता उठले पाहिजे ।। ४ ।।
ओळखीचीच पाऊलवाट
मध्यान्हीला अनोळखी होते
छाया पडतात अंगावरती
पालीसारखे झटकून टाकते
असल्या पाऊलवाटेचीही
सलगी आता सोडली पाहिजे ।। ५ ।।
बदलणाऱ्या सावल्यांनीही
आपलीच सावली जपली पाहिजे
कधीतरी सावल्यांनीच
बंड करून उठले पाहिजे ।। ६ ।।

**–जयंत कुलकर्णी**
पेमराज सारंग कॉलेज, अहमदनगर

# जपानचा ज्युदोचा अनुभव

**राजेंद्र वामनराव यादव**
द्वितीय वर्ष कला

जपान हा आपली पूर्वापार वैशिष्टये व पौर्वात्य संस्कृती कायम ठेऊन सर्व बाबतीत प्रगतीचे शिखर गाठणारा देश म्हणून प्रसिद्ध आहे. युरोप आणि अमेरिकेसारख्या प्रगतीशील देशांना थोडयाच कालावधीत हादरा देणारा अशिया खंडातील हा एकमेव देश अशिया खंडाचे भूषण समजला जातो. हा देश पाहाण्याची संधी मला इतक्या लवकर मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो. १ ऑक्टोबर १९८६ रोजी महाराष्ट्र रिजन ज्युदो असो. ची टीम नितीन कानिटकर आणि राजीव देव यांनी जेव्हा जाहीर केली, तेव्हा त्यात माझे नाव पाहून आनंद गगनात मावेना, माझ्या आजवरच्या कष्टाची ही पावतीच होती. जपानला जाण्यापूर्वी मी जपानबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकल्या होत्या आणि बरीच स्वप्ने रंगवली होती. माझ्या अडीच महिन्याच्या वास्तव्यात मला जपान कसा दिसला ?

जपानी माणसाचे पहिले वैशिष्टय म्हणजे माणुसकी, त्याचा अनुभव जपानला पोहोचल्यावरच आला. 'नरीता' विमानतळावरून ट्रेनने आम्ही आमच्या निवासस्थानाच्या शोधार्थ निघालो होतो. तसे आम्हाला भारतातच कसे जायचे याबद्दल सूचना दिल्या होत्या. तरी आम्ही ट्रेनमध्ये एका तरुणाला पत्ता विचारला त्याला इंग्लिश काहीच येत नव्हते. मात्र त्याला आम्ही जो पत्ता शोधत होतो तो पत्ता माहिती होता आणि आम्हाला तिथे जायचे आहे एवढे तो समजला. तो स्वत: आमच्याबरोबर स्टेशनवर उतरून तेथून आम्हाला पत्ता दाखविण्यासाठी आमच्याबरोबर चालत आला. आमची उतरण्याची जेथे सोय केली होती. त्या मालकाला उठवून त्याने आमची व्यवस्था झाल्यावरच आमची रजा घेतली त्यावेळी रात्रीचा एक वाजला होता आणि बाहेर कडाक्याची थंडी पडली होती. त्यानंतरही असे अनेक प्रसंग आम्हाला अनुभवायला मिळाले. दुसऱ्याला मदत करणे हे आपले पहिले कर्तव्य आहे. असे इथले लोक समजतात. नम्रता हा गुण जपानी लोकांच्या रोमारोमांत भिनलेला आहे. जगातील इतके कुठलेही लोक नम्र असतील असे मला वाटत नाही. आमच्या ६८ दिवसांच्या वास्तव्यात आम्ही कधीही भांडणे, मारामारी, दमदाटी, धक्काबुक्की असे प्रकार पाहिले नाहीत. रस्त्यावरून तुमच्या मागून एखादी कार आली तर तो कारवाला तुम्हाला त्रास होईल म्हणून हॉर्नसुद्धा वाजवत नाही. रस्त्यावर क्वचित् हॉर्न ऐकायला मिळायचे. दुकानात तुम्ही एखादी वस्तू खरेदी केली की दुकानदार चार–चार वेळा अभिवादन करून तुमचे आभार मानेल. जपानमध्ये कमरेतून चार–चार वेळा वाकून अभिवादन करण्याची फार प्रथा आहे. आम्ही जेथे ज्युदोचे शिक्षण घेतले. तिथले गुरुही आमच्यावर कधी चिडलेले, रागावलेले असे मला आठवत नाही. भारतीयांनी जपानी लोकांचा नम्रता हा एकच गुण जरी घेतला तरी भारतात पुष्कळ फरक पडेल यात शंका नाही. जपानी लोकांचा तिसरा आणि महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांची कष्टाळू वृत्ती. जपानी लोक नेहमी कामाची पूर्व आखणी करतात. आज इतके काम संपवायचे, उद्या इतके काम संपवायचे

परवा इतके... एकदा ठरवले की ते काम अर्धवट हे कधीच सोडणार नाहीत. काय वाटेल ते झाले तरी ठरलेले काम पूर्ण करूनच ते लोक घरी जातात. नुसतेच काम पूर्ण करीत नाहीत तर त्या कामात सफाई असते. प्रामाणिकपणा असतो. मग ती सरकारी नोकरी असो किंवा खाजगी धंदा असो. आमच्या घरासमोर एकदा रस्त्याचे काम चालले होते. नेमका त्या दिवशी पाऊस आला. पाऊस आला म्हणून लोकांनी काम थांबविले नाही. तेवढा रस्ता पूर्ण करूनच ते लोक गेले, प्रामाणिकपणा आणि कष्टाळू वृत्ती यामुळेच जपान हा जगातील सर्वात मोठा औद्योगिक देश बनला आहे. जपानमधील स्वच्छता ही वाखाणण्यासारखी आहे. येथे रस्ता साफ करायला सरकारी माणसें नसतात. प्रत्येकजण आपापल्या घरासमोरील जागा साफ करतात. घरातील कचरा व्यवस्थित बांधून तो कचऱ्याच्या ठिकाणी नेऊन ठेवतात. इथली कचऱ्याची गाडीही लांबून पाहिली तर कचऱ्याची गाडी आहे हे सांगूनसुद्धा पटणार नाही. इतकी स्वच्छ असते. रस्त्यावर लोक वाटेल तिथे कधीही कचरा टाकताना आढळत नाहीत. म्हणून टोकियोत नेहमी स्वच्छ, चकचकीत आणि प्रसन्न वातावरण असते. जपानमध्ये अनेक ठिकाणी माणसाऐवजी मशिनचा वापर केलेला आढळतो. रेल्वे स्टेशन हे त्याचे महत्त्वाचे उदाहरण. येथे आपल्याला तिकीट पाहिजे असेल तर मशीनमध्ये पैसे टाकायचे आणि आपल्याला जेथे जायचे, त्या ठिकाणी जायला जेवढे पैसे लागतील ते बटन दाबायचे. आपले तिकीट आणि उरलेले पैसे आपोआप बाहेर येतात. तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी Coin operating machines असतात. पैसे टाकले आणि बटन दाबले की पाहिजे ती वस्तू आणि उरलेले पैसे बाहेर येतात. त्यामुळे कुणाची चूक होण्याची आणि कुणाशी वाद घालण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जपान हा जगातील सर्वात महाग देश आहे. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही गोष्ट खरेदी करताना आम्ही चार चार वेळा विचार करायचो, पण नंतर महागाईसुद्धा आमच्या अंगवळणी पडली होती. इथे साधी कटिंग करायची म्हटले तरी ३००० येन (२४० रु.) बुटाला पॉलीश ५०० येन (४० रु.) दूध लिटरला ३०० येन (१६ रु.) तांदूळ ४० रु. किलो असे भाव आहेत. इथल्या लोकांना त्या प्रमाणात पगार मिळत असल्याने त्यांना महागाई जाणवत नाही. मात्र बाहेरच्या देशातील (अगदी अमेरिकेतीलसुद्धा) लोकांना जपान हा देश फारच महाग वाटतो. जपानमध्ये इंग्लिशचा वापर खूप कमी आहे. अगदी सुटा-बुटातील माणसाला आणि स्वतःची गाडी असणाऱ्याला साधे तोडके-मोडके इंग्लिशसुद्धा येत नाही. तरीही ते लोक त्रासून जात नाहीत. समजून घेण्याचा प्रयत्न करतात. येथील एकूण पिढी मात्र इंग्लीश शिकायला फार उत्सुक आहे, त्यामुळे इंग्रजी भाषा शिकविण्याचे क्लासेस येथे उत्तम चालतात.

ज्यूदो या खेळाचा शोध जपानमध्ये लागला. जपानी लोक जपानी भाषा, जपानी संस्कृती, जपान देश यावर जितके प्रेम करतात तितकेच प्रेम ते ज्युदो या जपानी खेळावर करतात. जपानमध्ये शाळेपासूनच मुलांना ज्युदोचे प्रशिक्षण दिले जाते. त्यातून काही खेळाडू हा खेळ पुढे चालू ठेवतात त्यामुळे जपान हे ज्युदोचे माहेरघर बनले आहे. येथे एकाहून एक चांगले खेळाडू आणि प्रशिक्षक आहेत. टोकियोची कोदोकान ही आंतरराष्ट्रीय ज्युदो संस्था म्हणून प्रसिद्ध आहे. येथे सुमारे ५०० खेळाडू (ज्युदोपटू) रोज सराव करतात. कोदोकान ही आठ मजली भव्य इमारत असून तिथे बाहेरच्या देशातील खेळाडूंसाठी होस्टेलही आहे. या कोदोकानमध्ये आठ वर्षापासून साठ वर्षांपर्यंतचे लोक रोज खेळत असतात.

जपानमध्ये पोलिसांना सक्तीचे ज्युदो प्रशिक्षण आहे. त्यामुळे जपानचे पोलीस खाते खूपच कार्यक्षम बनले आहे, असा येथील पोलिसांचा दावा आहे. सर्व पोलीस अंगयष्टीने मजबूत दिसतात. भारतातील पोलिसांनाही असे प्रशिक्षण दिल्यास गुन्हेगारांवर वचक बसेल. मात्र एक गोष्ट शेवटी नाकारता येत नाही आणि ती म्हणजे भारतात ज्युदो ह्या क्षेत्रात जपानची बरोबरी करायला अजून ५० वर्षे तरी नक्की लागतील.

जपानबद्दल जितके लिहावे तितके थोडेच आहे. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते, की आयुष्यात एकदा तरी जपान देश पाहून यावाच !

□ □

# सद्यः परिस्थिती : राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक

**संध्या रांगणेकर**
एम्. कॉम्. प्रथम वर्ष

कोणत्याही गोष्टीचे स्वरूप कायम तेच ते टिकणारे नसते. त्यामध्ये कालांतराने बदल घडतच असतो. अर्थातच त्या गोष्टीत बदल घडवत असते सभोवतालची बदलणारी परिस्थिती. म्हणजेच परिस्थितीच जेथे बदलते तेथे इतर गोष्टींचे काय ?

पूर्वी असलेली परिस्थिती आज असेलच असे नाही. लोक सांगतात म्हणून तशी परिस्थिती असेल असे मानून घ्यायचे. आज राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीत अमुलाग्र बदल झालेला आहे. पूर्वीच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीचे चित्र आज पूर्णपणे पुसून गेले आहे. आणि त्या ठिकाणी नवीनच चित्र रेखाटले गेले आहे.

पूर्वीच्या काळी युवक राजकारणांत उडया घेत परंतु त्या मागचा उद्देश देशाला परदास्याच्या बेडीतून मुक्त करणे व देशाची मुक्तता करणे व एकात्मता वाढविणे हा होता. ह्या युवकांनी स्वातंत्र्याचे आंदोलन थांबविले पण राजकारणाचा गदारोळ मात्र कधीच थांबला नाही. आज जो उठतो तो राजकारणात शिरतो पण ज्याला इतर काही जमत नाही त्याला राजकारण जमेल असे थोडेच आहे ? पक्षोपपक्षांची उपटसुंभ वृत्ती आणि सत्ताकांक्षी पुढाऱ्यांचे डावपेच यांपुढे नवीन येणाऱ्याचा टिकाव लागणेही कठीणच ! तरीदेखील जो तो उठतो आणि आपला स्वतंत्र पक्ष स्थापन करू पाहतो आहे. ज्याला त्याला खुर्ची आणि सत्ता प्यारी आहे. देशाचे हीत नंतर.

अर्थात आधीच एक बलवान पक्ष दबा धरून बसलेला आहे याची त्यांना जाणीव नाही. 'अंधेरेमे एक चिंगारी अटल बिहारी' 'एकच पर्याय जनता पक्ष' ह्यासारख्या जनहितवादी घोषणा देऊन देखील आज जनता पक्षाची काय दयनीय स्थिती आहे. शरद पवारांनी फुटीर वृत्तीने काँग्रेस एस हा पक्ष स्थापन केला परंतु आपला टिकाव लागत नाही असे दिसताच ते आपल्या माहेरी ( काँग्रेस आयमध्ये ) परतले. अर्थातच त्यांना मुख्यमंत्रीपद मिळेल ही आशा आहे.

राजकीय नेते आपल्याला सत्ता मिळेपर्यंत सामान्य जनतेला अनेक गोष्टी करण्याची आश्वासने देतात. पण एकदा का सत्ता हातात आली की दिलेल्या आश्वासनांना मूठमाती देतात. सुधारणा करण्याचा खर्च सरकारला पेलवत नाही. पण त्याच ठिकाणी ह्या राजकीय नेत्यांना भेट द्यावयाची असेल तर तेथे ते येण्याच्या व्यवस्थेचा खर्च लाख किंवा कोटीच्या घरात गेला तरीही त्यांची व्यवस्था चोख व्हायला हवी. प्रत्येकजण स्वत:पुरते जग मानून चालत आहे. राजकारणात शिरून राज्य करावयाचे म्हटले तर सत्तेसाठी न झगडता स्वतःच्या देशहितासाठी झगडले पाहिजे.

पूर्वीपेक्षा आजचा समाज फारच सुधारला आहे. पूर्वीचे जातीय मतभेद, पूर्वापार चालत आलेल्या रूढी व परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न आजचा समाज करीत आहे. परंतु त्याची समूळ नष्टता अजून झालेली नाही. समाजात स्त्री आणि पुरुष आज समान पातळीवर आहेत 'चूल आणि मूल' एवढेच मर्यादित असलेले स्त्रियांचे क्षेत्र बऱ्याच प्रमाणात विस्तारलेले आहे, पण त्याच-

बरोबर स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर बळावत चालले आहे. इतर बाबतीत पुरुषां-प्रमाणे वागणारी स्त्री स्वतःवर होणाऱ्या अत्याचारां-बाबत काही करण्यास असमर्थ ठरत आहे.

'हुंडाबळी' हे तर आजच्या समाजाचे सूत्रच बनले आहे. त्यामुळे स्वतःच्या मुली म्हणजे बापाच्या डोक्या-वर संकटच झाले आहे. मुली कितीही शिकल्या आणि त्यांनी नोकरी केली तरी हुंडा आईवडिलांच्या डोक्या-वर बसतोच आहे. आई वडिलांची हुंडा देण्यास असमर्थतता म्हणजे एका मुलीचा बळी. जो तो उठतो तो नोकरीवाली बायको मागतो. स्वतःच्या बायकोचे पोट भरण्याइतकी हिम्मत आजच्या तरुणांत नाही उलट तिच्या जिवावर ऐष–आरामात राहण्याचा तो प्रयत्न करतो.

अन्न, वस्त्र, निवारा ह्या समाजाच्या तीन गरजा त्यादेखील समाजातील लोकांना पूर्ण करता येत नाहीत. समाजातील बेकारीचे वाढते प्रमाण तरुणांस चोरी–मारी करण्यास प्रवृत्त करते. एकीकडे वाढणारी बेकारी आणि दुसरीकडे वाढती लोकसंख्या. नोकरी मिळत नाही मग कोणत्या तरी मार्गाने पैसा मिळवायलाच हवा. सहाजिकच पैसा मिळविण्याचे इतर मार्ग शोधले जाऊन वापरले जात आहेत. चित्रपट व्यवसाय हा एक समाजावर प्रभाव पाडणारा प्रभावी व्यवसाय आहे. समाजात घडणाऱ्या गोष्टींचे अनुकरण चित्रपटात केले जाते हा समज चुकीचा आहे. उलट चित्रपटातील प्रत्येक गोष्टींचे अनुकरण समाज करीत आहे मुले मोठी झाली की आपल्याला जन्म देणाऱ्या आपल्या जन्मदात्यांची म्हातारपणीची जबाबदारी आपल्यावर आहे हे पूर्णतः विसरतात. हे जन्मदाते त्यांच्या म्हातारपणी मुलांना डोईजड होतात. असे करीत असताना ते स्वतःच्या मुलांनाही धडे घालून देतात आणि आपणही केव्हातरी म्हातारे होणार आहोत हे विसरुन जातात.

जागेची समस्या तर आज इतकी भेडसावत आहे की छोटेसे घर घ्यायचे किंवा बांधायचे म्हटले तर त्याची आयुष्यभरची पुंजी खर्च करावी लागते. अशा या जागेच्या प्रश्नामुळे झोपडपट्ट्यांचे प्रमाण वाढत आहे.

धूम्रपानाची समस्या आजच्या समाजात मोठ्या प्रमाणावर फोफावत आहे. आबालांपासून वृध्दापर्यंत सर्वच धूम्रपानाच्या आधीन झाले आहेत. आजची वाढती महागाई त्यांना इतर बाबतीत त्रासदायक वाटत असली तरी धुम्रपानाच्या बाबतीत मात्र वाढत्या महागाईचा आणि स्वतःजवळील पैशाचा ते कधी विचार देखील करीत नाहीत. स्वतःजवळ पैसा असो नसो उसने पैसे घेऊन प्रत्येकजण आपली धूम्रपानाची हौस नव्हे तर सवय भागवून घेत असतात. हजारात एखादा या व्यसनापासून मुक्त असलेला आढळतो. पण इतर समाजाकडून त्याचे अनुकरण न होता ते त्यालाही आपल्या जाळ्यात ओढू पाहतात. समाजाची उन्नती होण्याऐवजी अवनतीच होत चालली आहे.

जातीभेद, काही रूढी परंपरा, अंधश्रद्धा यांचे पाहिजे तेवढे निर्मूलन आजच्या समाजाकडून झालेले नाही. दुसऱ्याला 'मानव ही एकच जात आहे' जाती-भेद करू नका असे उपदेश करणारा समाजसुधारक स्वतःला ह्या जातीभेदापासून कधीच मुक्त करून घेत नाही. त्याचप्रमाणे आम्ही जुन्या बुरसटेल्या विचारांच्या रूढी परंपरा मानीत नाही असा म्हणणारा समाज अजूनदेखील मूल होत नाही म्हणून देवाला नवस करणे नोकरी लागली, बढती मिळाली असता सत्यनारायणाची पूजा करणे, रोज सकाळी आंघोळ करून देखील सोवळे नेसून देवाची पूजा करणे, दुसऱ्याच्या ओल्यावरून जाताना पाणी टाकून जाणे यांसारख्या गोष्टी साग्र-संगीत पार पाडतात. जरी आजचा समाज काहीवेळा अंधःश्रद्धांवर विश्वास ठेवत नसला तरी महत्त्वाच्या कामासाठी बाहेर पडल्यावर मांजर आडवे गेले तर माणूस पाच पावले मागे जातो, तसे न केल्यास त्याच्या मनाला ती रुखरुख लागूनच राहते आणि जर ते काम झाले नाही तर तो बिचारा अंधःश्रद्धेवर विश्वास ठेवून मांजराला दोषी ठरवतो. तसेच बाहेर गावाला जाताना देवाच्या पाया पडणे, परीक्षेला जाताना तोंडात तुळशीचे पान धरणे इत्यादी प्रकार आजही समाजात दिसून येतात.

समाजाने चांगली सुधारणा केली असेल तर ती शिक्षणाच्या बाबतीत. आज पूर्वीसारखे असाक्षरतेचे प्रमाण जास्त नाही, खेडोपाडीही शाळा आहेत. शैक्ष-णिक परिस्थिती जरी सुधारली असली म्हणजे साक्षर-तेचे प्रमाण जरी वाढत असले तरी शैक्षणिक पद्धती मात्र फारच विचित्र प्रकारची आहे मुलांचे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविणे हे शिक्षकांचे खरे कर्तव्य पण ह्या कर्तव्याचे पालन अगदी मोजक्या शिक्षकांकडून होते. आपला व्यवसायच तो आहे म्हणण्यापेक्षा आपले पोट

त्यावर अवलंबून आहे म्हणून शाळेत जायचे एवढे आजच्या शिक्षकांना माहीत आहे.

बुद्धी असो वा नसो आज प्रत्येकजण कॉलेजचे शिक्षण पूर्ण करू शकतो. अर्थात त्यात अवघड असे काहीच राहिलेले नाही. कारण टेस्ट दिली नाही तरी रिटेस्ट असतेच. ५ मार्क्स अॅटेंडन्ससाठी राखून ठेवलेले असतात. शैक्षणिक क्षेत्रात कॉपी हा एक महाभयंकर प्रकार झालेला आहे आणि त्यामुळेच आज लाखो. विद्यार्थी सहजगत्या पदव्या घेऊ शकतात. एखाद्या विद्यार्थ्याने कॉपी केली तरी त्याबाबतची कारवाई तेवढ्यापुरतीच केली जाते. त्याबाबतीत व्हायला पाहिजे तेवढ्या कडक स्वरूपात कारवाई होऊ शकत नाही.

शाळा कॉलेजात दिले जाणारे शिक्षण विद्यार्थ्यास पुढील आयुष्यात उपयोगी पडत नाही. शाळेत किंवा कॉलेजमध्ये शिकवले जाणारे विषय परीक्षेपुरतेच त्यांच्याकडून तयार केले जातात आणि परीक्षा झाली की त्यांचा आणि त्या विषयांचा जणू काही संबंधच नसतो, म्हणूनच आज पदव्या घेतलेले लाखो विद्यार्थी बेकार आहेत. कारण आपण गेलेल्या आयुष्यात काय शिकलो याची त्यांना पूर्ण शिक्षित झाल्यावर कल्पना देखील नसते. विद्यार्थ्यांना व्यवसायभिमुख शिक्षण द्यायला हवे आहे पण दिले जात नाही आणि म्हणूनच बेकारी वाढतच चालली आहे. कारण नोकरी मिळत नाही म्हणून प्रत्येकजण हात जोडून बसतात आणि वाढणाऱ्या बेकारीत अजूनच भर घालतात.

आज साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी शिक्षण घेऊन तरी शेवटी विद्यार्थ्यांच्या पदरात काय पडते तर आयुष्यातील २०–२२ वर्ष शिक्षणासाठी खर्च करून बेकारीची निराशाच ना !

ही आजची स्थिती पुढे अजून काय बदल घडणार आहेत याची आज कल्पना करणे सुद्धा शक्य होत नाही. आजचे युग संगणकमय होत चालले आहे. संगणकाचा वापर जर सर्वत्र होऊ लागला तर आजच्या या शिक्षणाला काहीच अर्थ राहणार नाही. ज्याला संगणकाची माहिती त्याला नोकरी अशी स्थिती होऊन बेकारी अधिकच वाढेल.

□ □

## माथ्यावरचे आकाश

**मुकुंद मोरेश्वर पंत**
द्वितीय वर्ष, कला

माझ्या मायेचे काठोकाठ तुडुंब भरलेले अंतर
यात तुझे अनंत अपराध
गेले आहेत... सहजच विरून
अन् मी झाले आहे
'माथ्यावरचे आकाश'
असून नसल्यासारखे
नसून असल्यासारखे !

□

या स्त्री मुक्तीच्या काळात
त्यांची सारी सूक्तं मान्य असूनही
पुढ्यात बसलेला तू...
बंधू, पती, की... पुत्र
दिसत नाही नीटसं
नितळ पाण्याच्याच डोळ्यात
बनला आहे जाडसर पडदा,
पण यापैकी कोणीही असलास तरी–

# पाण्यावरचं घर !

**प्रा. संजीवनी राहाणे**
( वाणिज्य विभाग )

लहानपणी पाण्यावरच्या तरंगत्या घरांविषयी वाचलं की खूप कुतूहल वाटायचं! कसं असेल त्या लोकांचं आयुष्य? चोहोकडे पाणीच पाणी! आणि पाण्यावरून वाहत येणारं झुळझुळ वारं!

सारखं वाटायचं, फार नाहीतरी निदान एक दिवस तरी असं आयुष्य जगायला मिळावं! नाहीच तर... निदान स्वप्नात तरी दिसावं की आल्लाउद्दीनचा जादूचा दिवा मला मिळालाय आणि पाण्यावर तरंगणारं असं जीवन मला जगायला मिळालंय!

पण छे! मनातले मांडे मनातच राहिले. फार काय अगदी पदवीधर होईपर्यंत मुंबईत चौपाटी आणि समुद्र बघायचं माझं स्वप्नही मनातल्या मनात विरून गेलं!

पण त्यानंतर लवकरच मला समुद्रावरचं आयुष्य अनुभवायची संधी आयती चालून आली. माझे यजमान 'मर्चंट नेव्ही' मध्ये असल्यामुळे! त्यांचं जहाज तांबड्या समुद्रात असल्यामुळे मी मुंबईहून एडनला जाऊन जहाजावर जायचं ठरलं.

मी एडनला पोहोचले आणि विमानतळावरून बंदराच्या धक्क्यावर पोहोचले ती वेळ होती संध्याकाळची! गाडीतून खाली उतरल्या उतरल्या मी जे दृष्य पाहिलं ते माझ्या मनःपटलावर इतकं कोरलं गेलंय, की ते कधीच अस्पष्ट होणार नाही किंवा पुसलं जाणार नाही.

समोर खळाळणारा समुद्र–बोचरी आणि खारी हवा आणि अस्ताला जाताजाता सूर्यदेवानं आकाशात केलेली सोनेरी तांबूस रंगाची पखरण, त्या सुंदर रंगीत आकाशाचं समुद्रावर पडलेलं प्रतिबिंब–समुद्राचा मूळचा निळसर पांढरट रंग आणि त्यात तांबूस केशरी रंगाचे धागे गुंफले गेल्यामुळे समुद्रावर आलेली एक अलौकिक रंगछटा-आणि दुसऱ्या बाजूनं चंद्र थोडासा वर आलेला. जणू काही डोकावून हे अलौकिक चित्र पहाण्यासाठी! मधूनच माशांनी उड्या मारल्यामुळे निर्माण होणारे क्षणभंगुर तरंग आणि त्यांच्याबरोबर बदलत जाणाऱ्या पाण्याच्या रंगछटा– आणि हा सगळा देखावा खळाळणाऱ्या लाटांचा आवाज आणि दूरवर साद घालणाऱ्या 'सीगल'चा आवाज अशा दुहेरी संगीताने भरून गेला होता.

माझंच काय पण दुसऱ्या कोणाचंही असं रंगमय आणि नादमय स्वागत, कोणत्याही रंगसंगतीने आणि कोणत्याही सनईनं केलं नसेल!

जहाजावर जाण्यासाठी छोट्या होडीत बसताना क्षणभर पावलांना समुद्राच्या पाण्याचा निसटता स्पर्श झाला आणि लाट फुटून परत मागे जाताना मला पायाला धरून समुद्र ओढून तर नेत नाही ना असा विचार डोक्यात चमकून गेला. आणि बोटीवर राहणारे लोक, थोडे दिवस जमिनीवर राहिले की, 'दरिया बुला है' असं का म्हणतात त्याचा जणू शोध मला लागला.

जहाजावर पोहोचण्यापूर्वीच मी अशी भारल्यासारखी झाले होते. निसर्गाच्या बदलत्या रूपांकडे

बघताना मोहीत झाले होते आणि जहाजावर पोहोचल्यावर, तिथल्या लोकांना भेटल्यावर तर माझा आनंद द्विगुणित झाला. ते जहाज म्हणजे वीस-पंचवीस जणाचं एखादं एकत्र कुटुंब असावं ना, तसं वाटलं. प्रत्येक माणूस आपापल्या कुटुंबियांपासून मित्रमंडळींपासून हजारो कोस दूर आलेला ! आणि त्याच्याही पुढे जावून, आपल्याच सारखी भावनिक अवस्था सगळ्यांचीच आहे ह्याची एक जागृत जाणीव प्रत्येकाच्या वागण्याबोलण्यात जाणवत होती, डोळ्यात उमटत होती. मला तर वाटत होतं की, मला व माझ्या यजमानांना एकत्र बघून, बाकीच्या सगळ्यांचे चेहरे, आपण आपल्या बायकामुलांपासून लांब आहोत ह्या एकलेपणाच्या भावनेने झाकाळून जातील. पण प्रत्यक्षात मात्र मला फारच वेगळा अनुभव आला. त्यांना एकटेपणाची जाणीव होणं हे स्वाभाविक आहे. मनुष्यस्वभावात बसणारं आहे. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती जाणीव कोणाच्याही चेहऱ्यावर मला वाचता आली नाही आणि लांबून आलेल्या पाहुण्याचं ज्या उत्साहानं आणि आपुलकीनं स्वागत होतं तितक्याच आत्मियतेनं आणि उत्साहानं त्या लोकांनी माझं स्वागत केलं आणि मला आपलंसं केलं.

जहाजावरच्या माझ्या वास्तव्यात मला मनुष्यस्वभावाचे अनेक पैलू पाहायला मिळाले. अगदी प्रकर्षानं जाणवलेली एक गोष्टम्हणजे 'तक्रारीच्या सुराचा अभाव' माझी एक मैत्रीण, मजेनं तक्रारीचा सूर कायम जिभेवर आणि पर्यायाने चेहऱ्यावर मिरवणाऱ्या लोकांना 'कुरकुरीत' म्हणते. अशी कुरकुरीत व्यक्तिमत्त्वाचा एकही माणूस तिथं नव्हता. जे काही आहे त्याच्यात पूर्ण आनंदात व खेळीमेळीनं राहायचं. जे नाही त्याचं दुःख नाही, त्याचा साधा उल्लेखही वर्ज्य, ही खिलाडू आणि आनंदी वृत्ती त्यांच्या नसानसात भरलेली!

काही व्यवस्थापकीय अडचणींमुळे आमचे जहाज साठ दिवस एकाच जागी नांगर टाकून खळाळणाऱ्या समुद्रावर हेलकावे खात उभं होतं. अगदी स्थितप्रज्ञासारखं ! ना प्रवासाचा खेद ना एका जागी थांबण्याची खंत ! साहजिकच जहाजावर काही खाद्यपदार्थांची कमतरता वाटायला लागली. पण त्याच्यावर प्रतिक्रिया काय ? सगळ्यांनी सकाळी उठून गळ काढले आणि मासे पकडायला सुरुवात ! त्यात परत कोण जास्त मासे पकडतो ह्याची स्पर्धा !

दुधाची पावडर थोडी थोडी वापरायची असं ठरलं तर सगळेजण काळा चहा मिटक्या मारत पीत होते आणि चेहऱ्यावरच्या हावभावावरून वाटावं की काय अमृत पीत आहेत.

एक दिवस संध्याकाळी—'एअर कंडिशनिंग प्लॅन्ट'-मध्ये काही तरी बिघाड झाला तर पाच मिनिटाच्या आत आपापले पलंग घेऊन सर्वजण डेकवर हजर ! मोकळी हवा, आकाशातील ताऱ्यांची संगत, 'सूऽऽऽ' अशा वाऱ्याच्या आणि 'डुबुक-डुबुक' अशा माशांच्या संगीतात सगळेजण निद्राधीन झाले. माणूस निसर्गाशी किती झटकन तादात्म्य पावतो, एकरूप होतो ह्याचं दर्शन मला झालं.

माझा माणसाच्या चांगलेपणावर 'माणूसपणावर' दृढ विश्वास आहे. जहाजावर राहून हा विश्वास अजूनच भक्कम झाला. मला तर वाटतं की, या सगळ्याचं मूळ सापडेल माणसाच्या स्वभावतच ! छोट्या छोट्या सोयी मिळत असतात तोपर्यंत त्याची किंमत कळत नाहीत. मिळाल्या नाहीत की त्याची किंमत कळते आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे एक ठराविक अवस्था ओलांडल्यावर माणसाला अडचणींचीही सवय होते. ह्या छोट्या छोट्या सोयी असतील तर दुधात साखरच ! पण नसतील तरी तसं फारसं काही बिघडत नाही. ह्याची जाणीव माणसाला होचे.

एकमेकांची पैशांची नड भागवणं, कोणाच्या घरी काही अडचण असेल तर त्यासाठी आपली रजा पुढंमागं करायला सहज तयार होणं हे तर सहाजिकच ! 'आपण त्याच्यात काही विशेष करतोय.' अशी भावना कोणाचीही नसते. एक तीळ सातजणांनी वाटून खावा तसं आनंद-दुःख, सोयी-गैरसोयी सगळेजण वाटून घेतात, अगदी आपणहून ! तिथे कोणी गरीब नसतो, श्रीमंत नसतो, सगळेजण फक्त एका जहाजावरचे असतात.

ह्याचा अर्थ जहाजावर अगदी रामराज्य असतं. भांडणं, वादविवाद अजिबात होत नाहीत असं मात्र नाही.

एकदा चतुर्थश्रेणीच्या दोन कामगारात कशावरून तरी वाद झाला. वादाचा मुद्दा अगदीच क्षुल्लक होता. पण वादामध्ये एकमेकांचे स्वाभिमान दुखावले गेले आणि त्याचे पर्यवसान मारामारीत झाले.

पण मजेची गोष्ट म्हणजे दोन तासांच्या अवधीत दोघांनाही आपली चूक समजून आली. दोघांनी एकमेकांची माफी मागितली. प्रकरणावर पडदा पडला.

दुसऱ्या दिवशी कॅप्टननं त्यांच्यातल्या एकाला सहज विचारलं, 'डोक्याला काल लागलं का?' तर झटकन उत्तर आलं, 'पाय घसरून जिन्यावरून पडलो.'

माझ्या डोळ्यासमोर छोटासा शाळकरी मुलगा उभा राहिला–भावाशी, मित्राशी मजेत मारामारी करणार आणि आईबाबांना मात्र त्याचा पत्ता नाही.

एकदा असंच दोघांचं भांडण झालं आणि रागाच्या भरात एकानं दुसऱ्याला डेकवरून समुद्रात फेकून दिलं. आम्ही सात–आठजण डेकवर उभे! एकदम तंग वातावरण निर्माण झालं जहाजावर!–सगळ्यांना काळजी, हा आता वर येऊन काय करणार! पण हे सगळं काही क्षणच! समुद्रात पडलेल्या त्या माणसाच्या विनोदी वृत्तीचं मला अजूनही कौतुक वाटतं. आम्ही सगळे पाण्याकडे बघतोय! आधी त्याचा एक हात वर आला. त्याच्यात त्याचा चष्मा आणि सिगारेटची पेटी! नंतर त्याचं डोकं वर आलं आणि हा माणूस त्या स्थितीत वर बघून ओरडला, 'अरे, कोणीतरी मदत करा, माझ्या सिगारेट भिजताहेत!

एक दिवस दुपारी आम्ही सगळे कॅप्टनच्या खोलीत गप्पा मारत होतो आणि बाहेर जरासा गोंधळ ऐकू आला आणि चतुर्थश्रेणीतला एक कामगार दार जोरात उघडून वाऱ्याच्या गतीनं आत शिरला. चेहरा एकदम बावरलेला आणि मला बघून गप्प झाला. काय झालं काही सांगायला तयार नाही. शेवटी कॅप्टन खोलीतून बाहेर गेला आणि हसत हसत परत आला. त्या कामगाराच्या खोलीत खूप मोठा उंदीर आला होता आणि त्याला घाबरून तो कॅप्टनकडे आला होता, पण अनपेक्षितपणे मला समोर बघून त्याला हे सांगायची लाज वाटत होती की तो उंदराला घाबरला आहे.

एक ना दोन–असे अनेक अनुभव माणसाच्या नवीन नवीन पैलूंचं दर्शन घडवणारे! पण विचार करायला लागलं की लगेच जाणवते ती एकच गोष्ट,–समुद्रावर असो नाहीतर जमिनीवर–माणूस हा शेवटी माणूसच असतो.–त्याचं हे माणूसपण त्याच्या आशा, आकांक्षा, खिलाडूवृत्ती, आनंदी, सुखी राहण्यासाठी धडपड, कुतूहल, भीती, संकोच, स्वाभिमान अशा निरनिराळ्या सूत्रात गुंफलं गेलेलं असतं! त्या जोडीलाच निसर्गही माणसाला माणसाचं 'माणूसपण' टिकवून ठेवण्यासाठी मदत करत असतो. अप्रत्यक्षपणे शिकवण देत असतो.

समुद्रावर पाहिलेलं असंच एक दृश्य माझ्या मनावर कायमचा ठसा उमटवून गेलंय!

डॉल्फिन मासे हे माझ्यासाठी एक फार मोठं आकर्षण होतं. त्यांचा मेंदू माणसाच्या मेंदूपेक्षाही तल्लख असतो, शिवाय हे मासे म्हणजे मानवाचे मित्र समजले जातात. समुद्रात पडलेल्या माणसाचं शार्कपासून संरक्षण करण्याची जबाबदारी ह्या माशांनी स्वीकारली आहे. निसर्गाची अजब किमया म्हणजे हे मासे एकदम टोळीने येतात आणि बोटीशी खेळताना, वर उड्या मारताना त्यांचा चेहरा हसल्यासारखा दिसतो.

मी अशीच एकटी संध्याकाळी डेकवर उभी होते. आकाशाचे आणि समुद्राचे बदलणारे रंग न्याहळत होते! समुद्र तसा शांत होता आणि मला जवळच काही डॉल्फिन्स दिसले. तितक्यात सीगलचा एक मोठा थवा समोरून आला आणि डॉल्फिन माशांच्या जवळ समुद्रावर उतरला आणि फार जिगरी दोस्तांनी खूप दिवसांनी एकमेकाला भेटावं तसे सीगल डॉल्फिन्सशी खेळत होते.

मी ते दृष्य बघताना इतकी हरवून गेले होते की, कॅमेरा आणायचं भानही राहिलं नाही.

पाण्यात राहणारे डॉल्फिन, आकाशात विहार करणारे सीगल, त्यांचं राहण्याचं ठिकाण वेगळं, जीवन वेगळं. खरं तर मासे हे पक्षांचे खाद्य. पण त्यांचे एकत्र येऊन मनसोक्त खेळणं मला बरच काही सांगून गेलं! ... पाण्यावरच्या किंवा तरंगत्या घरात राहण्याचा अनुभव अनेक गोष्टी शिकवून गेला! ......

□

# घात

**सिद्धार्थ ओव्हाळ**
तृतीय वर्ष वाणिज्य

नोकरीसाठी सदा वणवण भटकत होता. पण कुठे त्याचा कौल लागतच नव्हता. कधीकधी तर त्याला असे वाटायचे की जीव द्यावा एकदाचा. पण त्याला जगायचं होतं, ते त्याच्या आजारी बापाला बरं करण्यासाठी, बहिणीचे हात पिवळे करण्यासाठी, धाकटया भावाला शिकवण्यासाठी.

तसं सदाला लिहिता–वाचता येत होतं. परंतु असं असूनही त्याला नोकरी मिळत नव्हती. बरं, वशिला लावायचा म्हटलं तर चांर पैशाची कमतरता. दिवसें-दिवस सदा काळजीनं खालावत चालला होता. बहीण धुण्या-भांड्याचं काम करीत दुपार-संध्याकाळ अर्धपोटी मारून नेत होती. रोजंदारीवर काम करून धाकटा शाळेला जात होता व मिळणाऱ्या दोन–चार रुपयात दोन–चार घासाला मदत करत होता. थोरला भाऊ रामा लगीन झाल्यापासून बायकूच्या खुळापायी वेगळा राहात होता. परंतु जन्मदात्या पित्याकडे एकही दिवस येऊन चौकशी करीत नव्हता.

बापाच्या दवा–पाण्यासाठी सदा काहीतरी करून थोडं का होईना वाईट बोलणं ऐकत होता. पण बापापायी तो ते करत होता. व दवा–पाणी पुरवीत होता. असं करून त्याच्यावर कर्ज झालं होतं. परंतु सदा डगमगला नव्हता. कारण त्याला आशा होती की कधीतरी आज ना उद्या आपून कामाला लागणार. दुकानदाराच्या हातापाया पडून धान्य उधार घेत होता. जागजागी आर्ज भरीत होता. पण त्याच्या पदरात निराशाच पडत होती. परंतु असं असलं तरी निराशेला आशेची किनार असतीच. उदा. जर आपून एखाद्याच्या दारात सारखं–सारखं गेलो तर तो बिचारा वैतागून एकदा तरी आपल्याला पावणारच. तसंच सदाच्या बाबतीत घडलं. त्याच्या घरापली-कडचा माणूस कलेक्टर कचेरीत हपिसर व्हता. दोन-चा्र वेळा सदानं आपलं गाऱ्हाणं त्याच्या पुढं मांडलं व्हतं. तवा, एकदा बिचाऱ्याला घाम फुटला. त्यानं चिठ्ठीवर काय तरी काळं क्यालं आन सदाला दुसऱ्या दिवसापासून डबा घीवून बोलावलं. सदानी तिथंच चिठ्ठी वाचली आन त्याचं मन आनंदून गेलं.

सदानी त्याच दिवशी महिन्याचं रासान वाण्याकडून उधार घेतलं. बहिणीला परकर, पोलक्यासाठी उधार कपडा घ्यातला. तो त्या दिवशी लय खुशीत होता.

आख्खा महिना सदा कामाला गेला होता. आज त्याचा पगार व्हता. दुपारच्याला काय नसल्याचं बहिणीनं सांगितलं. सदा तसा ताडकन उठला. वाण्या-कडं गेला. नाय व्हय करता करता त्यानी दुपारची सोय केली व तो उपाशीपोटी कामाला गेला.

म्हातारा बाप पोराचा पह्यलाच पगार पाहायला मिळन ह्या आनंदात खुशीत व्हता. दुपारी तिन्ही माय–ल्याकरं जेवली. तिकडं सदा फक्त पोटभर पाणी प्याला.

संध्याकाळ झाली होती. म्हातारा घरातून उठून बाहेर अंगणात पोराची वाट बघत बसला व्हता. बहीण चूल सारवून, भावाची वाट बघत व्हती. धाकटा पडल्या–पडल्या झोपी गेला व्हता.

तेवढयात तो पलिकडच्या घरात राहणारा हापिसर हातात पेढयाचा पुडा घेऊन उभा राह्यला. म्हातारा

दचाकला. अचानक हापिसर आपल्या घरी कसा? तो गडबडला. दोन्ही हात जोडीत हापिसरला रामराम केला व पोतं अंथरूण बसायला सांगितलं. हापिसर उभाच. पण म्हाताऱ्याला कळाना काय झालं. म्हाताऱ्यानी बोलायला सुरुवात केली, 'बरं का सायब, आक्षी सख्ख्याभावापरमानी तुमी मह्या पोराला कामाला लावलं. परमेसर तुमचा येल मांडवाला नील.' हापिसरचं डोळं भरून आलं व्हतं. म्हाताऱ्यानी ताडलं. 'आवो पर, म्या यावढा बोलतोय तरी तुमी गपच? काय झालं ते तरीं सांगा.'

हापिसर आवंढा गिळून सांगू सागला, 'कसं सांगू मी, मला...आज सदाचा पगार असल्यामुळं तो आनंदात काम करत होता. संध्याकाळी पगार घेतला. तुमच्या सर्वांसाठी गोड तोंड करावं म्हणून हे पेढे घेतले. आणि...आणि तुमचं औषध घेण्यासाठी रस्त्यापलिकडे असणाऱ्या औषधाच्या दुकानात जात असताना अचानक मागनं येणाऱ्या गाडीची त्याला जोरात धडक बसली. आणि सदा...' एवढं बोलत असताना म्हातारा जोरात ओरडला, 'न्हाय न्हाय, आसं कसं व्हईन. मला त्याचा पगार बघायचा ना?' म्हातारा रडत होता. बहीण – धाकटा दोघंही गळ्यात पडून रडत होती.

'घात क्याला काय रं पोरा? घात क्याला? तुला आमी जड झालो व्हतो, नाय का? घात झाला सायेब, घात झाला.' म्हातारा ऊर बडवीत होता. हापिसर भावा–बहिणीला धीर देत होता.

□ □

---

# मी कोण आहे?

**पुष्कर महाजन**
तृतीय वर्ष वाणिज्य

एक शाश्वत प्रश्न कोऽहं?
मी आहे एक कलाकार...
वाट्याला आलेली भूमिका नेकीने निभावणारा
जगाच्या रंगमंचावरील एक पात्र
पडदा पडला की जीवनाचा रंग पुसणारा ॥
मी आहे एक पांथस्थ
कुणाची साथ न मागता एकाकी चालणारा
ध्रुवाची दिशा खरी खोटी न जाणताही
ध्येयाचा जप करीत जिद्दीने चालणारा ॥
मी आहे एक गतानुगतिक...
जन्माला आलो म्हणून जगत रहाणारा
मृत्युपर्यंतच्या सरळ रेषेवर
बिंदू–बिंदूंनी मार्ग क्रमणारा ॥
मी आहे एक गुन्हेगार...
माझ्यातला पशु हळूवारपणे कुरवाळणारा
सभ्यतेचा बुरखा जतन करून
धर्माच्या, भाषेच्या नावाने रक्तपात करणारा ॥
मी आहे का एक माणूस?
दुसऱ्याच्या दु:खाने दु:खी होणारा?
दुसऱ्याच्या आनंदाने पुलकित होणारा
पशूकोटीचे कवच फोडून
ब्रह्मांडाला गवसणी घालणारा?

# समान नागरी कायदा

जया मुथा
१२ वी कला

'समान नागरी कायदा' प्रत्येक नागरिकाला सारखा कायदा कितीही आरश्यासारखी स्वच्छ, निर्विवाद अशी गोष्ट आहे, मग आता याच्यावर मतभेद होण्याचे अजिबातच कारण उरत नाही. तरीही आज भारतात यांसाठी मोर्चे निघताहेत, दंगेधोपे होताहेत ही खरोखरी दु:खाची गोष्ट म्हणावी लागेल. किंबहुना या सारखी दु:खाची गोष्ट नाही.

एक देश, एक संविधान, समान नागरी कायदा यात गैर काही असण्याचा मुद्दाच येत नाही. जगाच्या पाठीवरच्या एखाद्या तरी देशाचे नाव मला सांगा जिथे दोन कायदे आहेत. देशात धर्म अनेक असू शकतात, पण राष्ट्रात घटना आणि कायदे सर्वांना सारखे असले पाहिजेत. समानता विचारात हवी, देशात एकाच गुन्ह्यासाठी दोन कायदे आहेत ? मग भारतातच असे का ? भारतातील धर्मांना कुणाचा वशिला तर नाही ना ? सर्व धर्म समान असा शासनाने व राज्यकर्त्यांनी संदेश द्यायचा पण प्रत्यक्षात मात्र प्रत्येक धर्माला वेगळा कायदा हा न्याय कोठला ? प्रत्येक लोकनियुक्त खासदार आमदार, मंत्री आपापल्या धर्माच्या मोर्चाचे नेतृत्व करायला पुढे सरसावतात. हे योग्य आहे का ? अशा मंत्र्यांनी, आमदारांनी, खासदारांनीं आधी राजीनामे द्यावेत आणि नंतर आपल्या व्यक्तिगत धर्माचा झेंडा हाती घ्यावा हा संकेत त्यांना माहीत नाही का ?

अहो भारताच्या राज्यघटनेत स्पष्ट म्हटले आहे, भारत हे एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. मग भारतात असे काहूर माजण्याचे कारण काय ? कारण एक आणि एकच आहे. शासनाचे बोटचेपे धोरण ! ! एकदा राज्यकर्ते म्हणतात, 'भारतातील व्यक्ती मग ती स्त्री असो वा पुरुष असो भारतीय घटनेप्रमाणे तिला सर्व अधिकार मिळतील आणि दुसरीकडे अल्पसंख्यांकाना अवास्तव सवलती वाटण्यात येतात. अल्पसंख्याकांचा आणि राज्यकर्त्यांचा हा व्यापार कुठे चालतो तर या भारतात ज्या ठिकाणी भारताचे घटनाकार म्हणतात, 'अल्पसंख्याकांच्या हितासाठी कायदे जरूर करावेत पण याचा अर्थ अल्पसंख्यांकांनी घटनेशी विसंगत कायदे, चालीरीती रूढ कराव्या असा होत नाही. अशाने देशात एकात्मता मुळीच राहणार नाही आणि म्हणूनच सरकारने आता तरी डोळे उघडावेत. अल्पसंख्यांकांना दिलेल्या अवास्तव सवलती रद्द करून बहुसंख्यांकांचे वर्चस्वही नष्ट करावे आणि प्रत्येक व्यक्तीला एका भारतीय माणसाचा दर्जा द्यावा. त्यामुळेच भारतातील जातीय वाद आणि धर्मांधता नष्ट होण्याची शक्यता आहे.

प्रत्येक व्यक्तीला भारतीय माणसाचा दर्जा द्यावा म्हणजेच समान नागरी कायदा अमलात आणावा असे म्हणण्यास हरकत नाही. पण हा समान नागरी कायदा करण्यापूर्वी कितीतरी दोष टाळावे लागतील. एक तर समान नागरी कायद्यासाठी जर हिंदू सांप्रदायिक तत्त्व पेटून उठत असेल तर इतरांच्या दृष्टीने समान नागरी कायदा म्हणजे हिंदू कायदाच आहे असा समज होणे स्वाभाविकच आहे. दोन सांप्रदायिक तत्वांच्या टणत्कारातून सांप्रदायिकताच जन्म घेते म्हणूनच सांप्रदायिकतेचा बीमोड केवळ इहवादी तत्त्वेच करू शकतात इहवादी समाजरचनेसाठी सार्वजनिक जीवनातील राज्य

कारभारातील त्रुटी दूर करून विधायक पाऊल टाकणे आणि सांप्रदायिक तत्वांशी संघर्ष करीत त्यांचा हस्तक्षेप नाकारीत जाणे-यातून निर्माण होणारे वातावरण शेवटी समान नागरी कायदा घडवून आणू शकेल. सांप्रदायिक तत्त्वांच्या लढतीतून निष्पन्न होणारा समान नागरी कायदा हा मूलतत्त्व गमावलेला आणि लोकाधार नसलेला कायदा असेल याचे भान ठेवणे अत्यावश्यक आहे.

या देशात सर्वांसाठी एकच मानवधर्म असेल, एकच न्याय असेल हिंदूसाठी वेगळा न्याय आणि मुसलमानांसाठी वेगळा न्याय येथे दिला जाणार नाही असे शासनाने ठामपणे सांगण्याची वेळ तर आलीच आहे पण त्याचबरोबर इतर दृष्टिकोनांतूनही विचार करण्याची आवश्यकता आहे. एका देशातील सर्व नागरिकांना समान नागरी कायदा असलाच पाहिजे याबद्दल दुमत संभवतच नाही. जर देशाची फाळणी झाली त्याचवेळी स्वतंत्र भारतात समान नागरी कायदा केला असता तर तो सर्वांनीच मान्य केला असता आणि आज आपल्याला भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांनी डोके वरच काढले नसते. पण आता परिस्थिती बदलली आहे. सद्य:स्थितीत समान नागरी कायद्याची खूप घाई करूनही उपयोगी नाही. भारतीय समाजात जागृती होऊन त्यांच्याकडून समान नागरी कायद्याची मागणी होईल अशी उपाययोजना केली पाहिजे तसे वातावरण निर्माण केले पाहिजे. कोणतीही मागणी ही समाजाच्या तळागाळातून व्हावी लागते. चार–दोन नेत्यांच्या भाषणाने ती मान्य होणे योग्य नाही. म्हणूनच सध्या तरी कोणत्याही धर्माच्या वैयक्तिक हस्तक्षेपण शासनाचे धोरण समजण्याजोगे आहे. पंतप्रधान राजीव गांधी एकविसाव्या शतकाची स्वप्ने पहाताहेत, पण गेल्या काही वर्षात देशात वाढीला लागलेला जातीयवाद, धार्मिक सनातनीपणा लक्षात घेता भारतीय समाजाची पीछेहाट होते आहे. धर्माचरण हा खाजगी जीवनाचा भाग न रहाता सामाजिक जीवनावर त्याचे परिणाम होताहेत. सार्वजनिक जीवनावर किंवा राज्यकारभारातही भाविकतेचे प्रतिबिंब दिसून येते. शासकीय योजना, सरकारी प्रसिद्धी माध्यमे, कार्यक्रम, सार्वजनिक स्थळे सर्वत्र हिंदू मानसिकताच काम करताना दिसून येते. इहवाद कोठेच दृष्टिपथाला पडत नाही. म्हणूनच आज भारतीय समाजाचे मानसिक दारिद्र्य हटविण्यासाठी, भारतीय समाज सर्वांबरोबर येण्यासाठी, भारत एक निरोगी राष्ट्र बनण्यासाठी भारतात समान नागरी कायदा होणे अत्यावश्यक आहे, नव्हे अनिवार्य आहे.

पण स्वातंत्र्यानंतर ( ३८ वर्षानंतर ) आज १९८६ मध्येच जो तो समान नागरी कायदा पाहिजे अशी मागणी करतो आहे याचे कारण काय ? या कारणाविषयी थोडे लिहिल्याशिवाय आत्ताचा समान नागरी कायदा हा विषय पूर्ण होणार नाही. १९७५ साली वयाची साठी उलटल्यावर एका स्त्रीला शहाबानोला तिचा नवरा महमदखान तलाक देतो. त्यानंतर ही स्त्री पोटगी हक्कासाठी न्यायालयाकडे धाव घेते आणि १० वर्षानंतर सुप्रीम कोर्टात तिला १८९ रु. २० पैसे महिना पोटगी मंजूर होते. त्यानंतर देशभरातून सुमारे आठ हजार अर्ज पोटगी हक्कासाठी न्यायालयात दाखल होतात. या स्त्रीचा अनेक ठिकाणी सत्कार होतो आणि मग अचानकच या शहाबानोला आपल्या धर्मग्रंथाची शरियतची आठवण येते आणि ती आपला निर्णय मागे घेते पण सुप्रीम कोर्ट मात्र आपला निकाल मागे घेत नाही. शहाबानोचा निर्णय शरियतच्या विरोधी आहे किंवा नाही याचा विचार करण्याचा प्रश्नच भारतात येत नाही. कारण भारताची राज्यघटना म्हणजे कोणत्याही धर्माचा वैयक्तिक धर्मग्रंथ नाही. भारतीय नागरिकाने भारतातील कोर्टात दावा दाखल केल्यावर त्याचा निर्णयही भारतीय कायद्याप्रमाणेच लागणार, कोणत्याही धर्मग्रंथाच्या कायद्यांना धरून लागणार नाही.

आणि प्रत्येकजण जरी आम्ही आपल्या धर्मग्रंथाप्रमाणे वागणार असे म्हणत असला तरी ते निव्वळ अवडंबर आहे. प्रत्येक धर्म आपल्या सोयीप्रमाणे कधी धर्माचा तर कधी राज्यघटनेचा आश्रय घेताहेत. पाहिजे तिथे भारतीय राज्यघटना आणि पाहिजे तिथे स्वत:चा धर्मग्रंथ असा दुहेरी फायदा ते घेताहेत. म्हणूनच प्रत्येक भारतीय नागरिकाला एकाच कायद्याने वागण्यास न्यायसंस्थेने भाग पाडले पाहिजे. आता शहाबानो प्रकरणाच्या संबंधाने विचार केला तर मुस्लिमांनी ' पर्सनल लॉ ' वेगळा मागताना ' क्रिमिनल लॉ ' सुद्धा ' शरियत ' नुसारच मागितला पाहिजे. या सर्व गोष्टींना अनुसरून आता सुप्रीम कोर्टाचा निकाल अत्यंत उचित असा आहे असे मला वाटते.

'हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हिंदुस्थान' अशा पाकधार्जिण्या घोषणा थांबविण्यासाठी (खोटचा ठरविण्यासाठी) समान नागरी कायदा करण्याचे ठोस पाऊल हे उचललेच पाहिजे.

'भारतातील प्रत्येक मूर्ती फोडू, सगळा भारत इस्लाममय करू' अगर 'हमारे मुस्लीम पर्सनल लॉ को हाथ लगे तो लाशों की ढेर लगायेंगे और खून की नदियाँ बहायेंगे' अशी विखारी भाषणे काही मुस्लीम करतात, तसेच तलाक मुक्ती मोर्चात सामील होणारांनी 'इस्लाम सोडून चालते व्हावे' अशी उर्मट देशद्रोही भाषणे करणेही योग्य नाही कारण यामुळे राष्ट्रीय एकात्मता राहणार नाही.

समान नागरी कायदा केला गेला, तरी तो बळेच लादला जाणार नाही, जनतेच्या बहुमताने तो केला जाईल मात्र या देशाच्या घटनेत, कायद्यात प्रतिगामी स्वरूपाचे आणि नागरिकात भेद करणारे बदलही करण्यात येणार नाहीत, हे सांगण्याची वेळ आता आली आहे. समान नागरी कायदा केला तर त्याची योग्य रीतीने अंमलबजावणी होणेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे.

समान नागरी कायदा करण्याबाबत शासन आता काय भूमिका घेते आहे यावरच पंतप्रधान राजीव गांधींची कसोटी लागणार आहे. त्यांच्या जोडीने सर्वच राजकीय पक्षांची कसोटी लागणार आहे. परंतु अंतिमत: समान परिवर्तनाचे कार्य समाजानेच करावयाचे असते. न्यायालयीन निवाड्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी समाजच करू शकतो. म्हणूनच भारतीय समाजाने आपण विशिष्ट धर्माचे असलो तरी विशिष्ट राष्ट्राचे आहोत हे आधी लक्षात ठेवावे आणि आपली धर्मपरंपरा पुढे चालविताना आपला धर्म आपल्या राष्ट्राच्या मूळावर येऊ देऊ नये.

□ □



# ' यः क्रियावान् स पंडितः '

**प्रा. मनोहर कुलकर्णी**
(इतिहास विभाग)

' ईश्वराने अद्‌भुत गुणांचा वर्षाव त्यांच्या वर (म्हणजे रियासतकर सरदेसाई) फारसा केलेला नाही. ईश्वरी गुणांच्या बळावर मोठे होणे, ही गोष्ट सुसाध्य असते. पण तसे गुण जवळ नसतानाही केवळ कर्मयोगाच्या बळावर मोठेपणास चढणे ही बहादुरीची गोष्ट मानली पाहिजे. ह्या समर्पक शब्दात थोर इतिहासकार त्र्यं. शं. शेजवलकर ह्यांनी रियासतकर गोविंद सखाराम सरदेसाई ह्यांच्या प्रचंड कार्याचा गौरव केला. कोणताही निकष लावून रियासतकारांचे कार्य मोजले तरी त्यांचे वर्णन केवळ ' प्रचंड 'च होईल. आपल्या ' मुसलमानी रियासती 'चे प्रकाशन त्यांनी इ. स. १८९८ मध्ये केले. त्यानंतर इ. स. १९०२ ते १९३२ या काळात त्यानी ' मराठी रियासती 'चे आठ खंड प्रकाशित केले. या मालिकेचा शेवट त्यांनी ' ब्रिटिश रियासती 'ने केला. मुसलमान व ब्रिटिश रियासतीचे प्रत्येकी दोन-दोन खंड आहेत. रियासतींची पृष्ठसंख्या ६,५०० एवढी आहे. इ. स. १९४६ ते ४८ ह्या काळात रियासतकारांनी मराठी आणि इतर साधनांच्या साहाय्याने ' मराठ्यांचा इतिहास ' इंग्रजीतून ' New History of the Marathas ' या नावाने तीन खंडांत प्रसिद्ध केला. त्याची पृष्ठसंख्या १५०० आहे. मराठ्यांच्या इतिहासावर इतके विस्तृत व ' प्रचंड ' लेखन करणारा त्यांच्यासारखा इतिहासकार आजवर झालेला नाही. केवळ रियासतींचे लेखन न करता सरदेसाईंनी इ. स. १९३० ते १९३४ या चार वर्षात प्रचंड उद्योग करून पेशवे दप्तराचे ४५ खंड प्रसिद्ध केले. त्याच्या बरोबरच सर जदुनाथ सरकारांना ' पुना रेसिडेंसी करस्पॉन्डस् ' च्या संपादन कामी साहाय्य केले. महादजी शिंद्याचे चरित्र संपादित केले आणि मराठ्यांच्या वंशावळीचा एक ग्रंथही प्रसिद्ध केला.

' मराठ्यांचा इतिहास ' हा एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून आजतागायत एक चर्चेचा, वादाचा, परस्पर विरोधी अन्वयार्थांचा विषय बनलेला आहे. त्यासाठी आपली सर्व हयात घालविणारे ' इतिहासाचार्य ' ' इतिहासमार्तंड ', ' थोर इतिहासकार ' ह्यांची एक भव्य, उज्ज्वल अशी परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. त्यापैकी बहुतेकांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती प्रकाशित करण्याचा उद्योग केला. ही प्रकाशित साधने एक सलग असा इतिहास वाचकांसमोर मांडण्यास अपुरी होती. सर्व उपलब्ध साधनांचा योग्य उपयोग करून एक-सलग असा मराठ्यांचा इतिहास लिहिणेही त्याबरोबर आवश्यक होते. हे कार्य इतिहासाची साधने प्रकाशित करताना रियासतकारांनी हाती घेतले. नवीन साधने प्रकाशित होत असताना, रियासती प्रसिद्ध होताच त्यामधील काही भाग पुन्हा लिहिण्याची आवश्यकता जाणवणे स्वभाविकच आहे. ह्या जाणिवेमधूनच रियासती पुनर्लेखन हा सातत्याने करावा लागणारा उद्योग बनला. रियासतीच्या एकूण चाळीसाहून जास्त आवृत्या काढताना त्यांनी उपलब्ध सर्व साधनांचा, साहित्याचा तर विचार केला आहेच पण अभ्यासक, वाचक ह्यांच्याकडून आलेल्या सूचनांचाही जरूर विचार केला आहे. आपल्या आत्मचरित्रात– ' माझी संसारयात्रा '–त्यांनी आपल्या जीवनाचे ब्रीद वाक्य म्हणून जे दिले आहे

त्यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते– ' Desire to improve at every moment and in every detail is the strongest urge for life's fulfillment ' (पान नं ८३) स्वाभाविकपणेच त्यांच्या आत्मचरित्रात पुढे पान नं १३९ ते म्हणतात...

' हिंदुस्थानच्या समग्र भागांतील, अनेक लहान मोठ्या व्यक्तींस पत्रे लिहून नानाविध माहिती मी मागविली आणि बहुतेकांनी ती मला संतोषाने पुरविली ह्याबद्दल मला ह्या सर्व माणसांचे फार मोठे उपकार वाटतात. ह्या उपकारांची फेडही मी तितक्याच तत्परतेने केली आहे... त्यात कितीही श्रम पडले तरी कधी कंटाळा मानला नाही... सन १९०० साली मराठ्यांचा इतिहास किती तुटपुंजा होता आणि आज त्याला भरीव रूप कसे आले आहे ह्या विचार माझ्या निरनिराळ्या आवृत्यांतून नजरेस आला म्हणजे ह्या महनीय कामांत माझाही थोडा बहुत हातभार लागला ह्याबद्दल मला कृतकृत्यता वाटते... इतिहास विषयांत लोकांच्या गरजा काय आहेत हे समजून घेण्यात मी कधी हयगय केली नाही. ह्या विषय मी देशोन्नतीकरिता लिहीत आहे, त्यापासून राष्ट्राला भावी कर्तव्याची स्फूर्ती मिळाली पाहिजे, केवळ दोषाविष्करणाने लोकांची नाउमेद होऊ नये हा उद्देश मी आपल्या विवेचनांत सदैव दृष्टीपुढे ठेवीत आलो. ह्याचा अर्थ मी असत्य इतिहास सांगतो असा नव्हे. बाप मुलांस धीर देत असतो, त्यांस पराक्रमोत्सुक बनवितो, ते काम राष्टाकरिता इतिहासकाराला करावयाचे असते.'

आत्मचरित्रातील वरील परिच्छेदावरून रियासतकारांची आपले लिखाण करण्यामागील भूमिका स्पष्ट होते. नव्या आवृत्या काढून आपल्या रियासती अद्ययावत करण्यामध्ये त्यांना एकच जाणीव होती... ते म्हणतात ' प्रसिद्ध झालेल्या कृतीतील दोष लोकांनीं दाखविले म्हणजे मी विव्हळ होऊन केव्हा चुका दुरुस्त करीन अशी उत्कंठा लागे. लोकांच्या मनांत चुकीचे ग्रह उत्पन्न करण्याचा मला बिलकुल हक्क नाही. ते मी पाप समजतो. त्यापेक्षा गप्प बसणे बरे. माझ्या लेखांवर विसंबून लोक त्यांचा उपयोग करतात ह्यास्तव झालेल्या चुकांची सुधारणाही मी शक्य तितक्या त्वरेने करीत आलो आहे.'

रियासतकारांच्या ह्या ' देशोन्नतीकरिता ' लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाची महती आजही आपल्याला सदोदित जाणवते. त्यांनी घेतलेल्या मेहनतीची, कष्टाची कल्पना त्यांच्या प्रचंड कामावरून येऊ शकते. त्यांनी हे कार्य अखेरपर्यंत केले. मृत्यूपूर्वी त्यांनी रियासतीच्या नव्या आवृत्या काढण्याचे काम चालूच ठेवले होते. त्यांच्या संग्रहात ह्याचे दाखले आजही अभ्यासकास पहावयास मिळतात. दुर्दैवाचा भाग असा की त्यांची समकालीन विद्वान, विचारवंत, इतिहास–लेखक टीकाकार इ. कडून योग्य ती नोंद घेतली गेली नाही. त्यांना त्यांच्या हयातीत अनेक मानसन्मान, पदव्या देण्याचे औपचारिक समारंभ झाले. त्यांना ' संकलनकार ' ' गोष्टीरुपी इतिहास लिहिणारे ' 'उष्टे खाणारे' ' जदुनाथ सरकारांचे लेखनिक ' इत्यादी बोचणी देणाऱ्या शब्दांनी संबोधण्यात येई. इतिहास लेखनाच्या व अभ्यासकाच्या दृष्टीने भाग्याची व सुदैवाची एक गोष्ट म्हणजे स्वतः रियासतकार त्यामुळे कधीही नाउमेद, निरुत्साही झाले नाहीत. उलट ते जास्तच आपल्या कार्यात स्वतःला झोकून देवू लागले. त्यांचा स्वभाव व वृत्ती ह्यांचे प्रतिक म्हणजे त्यांचे वास्तव्य त्याच्या जोडीला दुर्दैवाने त्यांच्या घरगुती कौटुंबिक जीवनातही त्यांना पुत्र–आणि पत्नी निधन ही दुःखे होती. आर्थिक स्थिती ही बेताचीच होती. जीवनातील उमेदीची वर्षे बडोद्याच्या नरेशांकडे ' शिक्षकी ' चाकरी करण्यात गेली. त्यामुळे चाकरीच्या मनोवृत्तीचा स्वभाव त्यांच्या ठायी निर्माण झाला. यातूनच ते ' आपले काम भले आणि आपण भले ' अशा वृत्तीचे बनले असावेत. आक्रमकपणाने व हेकटपणाने माझेच म्हणणे खरे अशा स्वभावाचे ते नव्हते.

त्यांच्या स्वभावाचे, त्यांनीच केलेले स्पष्टीकरण पाहण्यासारखे आहे... ' एकदा विषयात पाऊल टाकले म्हणजे त्यामुळे पुष्कळदा वादही खेळण्याचा प्रसंग येतो. उगाच एखाद्याची निंदा करावी हे माझ्या बुद्धीत नाही. गुणगौरव मी मुक्त कंठाने करीत आलो आहे. दोषाविष्करण सुद्धा सत्य न सोडता हळुवार भावनेने जखमेवर डाग न पडेल अशा वृत्तीने मी करीत असतो. उद्योग सातत्य व मनाचे भलेपण हे गुण मी आपला तोल सांभाळून कृतीत आणले असे मला वाटते. मी आपले दोष सुधारण्याची संधी कधी वाया दवडली नाही. क्रमशः क्षमशः अशी उंछवकवृत्ती माझ्या ठिकाणी बाणलेली आहे. ' ( माझी संसारयात्रा पान नं. १४१)

रियासतकार सरदेसाईनी ' मराठ्यांचा इतिहास

एक सलग आपल्या रियासतीमध्ये मांडणे ' एवढीच पण भक्कम बैठक ठेवली आहे. कालानुक्रमे व व्यक्तिपरत्वे घडलेल्या घटना सत्यकथन पद्धतीने मांडत जाणे. केवळ राजकीय घडामोडी सांगण्यावर भर आहे हे निश्चित. त्याबरोबर इतरही अनेक बाबी त्यानी ओघाने लिहिल्या आहेत पण त्या ओझरता उल्लेख अशाच प्रकारच्या आहेत. राजनैतिक संबंध, प्रशासन, आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक जीवन ह्यांचा विस्तृत आढावा रियासतीमध्ये फारसा आढळत नाही. एक सलग असा इतिहास लिहिताना रियासतकारांनी मराठ्यांच्या इतिहासातील एक अंत:प्रवाह दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'थोर विभूति याच राष्ट्राची बहुमोल संपत्ती होत' असे ते मानतात त्यामुळे त्यांनी रियासतीची मांडणी व्यक्तीपरत्वे केलेली आहे. रियासतीमध्ये त्यांनी कोणाही व्यक्तीचे मूल्यमापन, योग्यता ऐतिहासिक कार्य इ. टीकात्मक स्वरूपाचे लेखन केलेले नाही. टाळाटाळ करण्याच्या प्रकारामधून असे झालेले नसावे. काही टीकाकार म्हणतात त्याप्रमाणे हे त्यांना जमत नव्हते कारण ते 'संकलनकार' होते असेही नाही. वास्तविक त्यांना सर जदुनाथ सरकारांच्याकडून त्याबाबत सूचनाही दिल्याचे आढळले. पण त्यांनी रियासती लेखनामध्ये आपली भूमिका स्पष्टपणे घेतलेली आहे व त्या भूमिकेशी व स्वत:शी ते प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करतात. असे टीकात्मक लेखन करण्याबाबत त्यांना इतिहासाचार्य राजवाडे ह्यांचा 'सबूरीने घ्या' हा सल्ला योग्य वाटला असावा; न जाणो !

पेशवे दप्तरातील कागद पत्रांची छापण्यासाठी छाननी व निवड करताना रियासतकारांनी जे कागद बाजूला काढून ठेवले आहेत त्यात प्रामुख्याने हिशेबाचे ताळेबंद, न्याय निवाडे इ. चा समावेश आहे. त्या कागदांचे त्यांना महत्त्व कळले नव्हते किंवा तोही एक इतिहासच आहे हे त्यांना मान्य नव्हते हे म्हणणे अयोग्य आहे. मराठ्यांच्या इतिहासाचा एक संपूर्ण कच्चा खर्डा तयार करून मग इतर बाबीकडे लक्ष द्यावे ही त्यांची भूमिका असावी. म्हणूनच ते वारंवार आपल्या 'मराठी रियासत' 'मराठ्यांचा नवा इतिहास' ह्या लेखनास 'कच्चा खर्डा' म्हणतात. इतरांनी बाकी इतिहास लिहिण्यास 'माझा हा खर्डा उपयोगी आणावा' हेच त्यांनी अनेकदा सुचविलेले आहे. नवी माहिती उजेडात येत आहे. अजून अप्रकाशित कागदपत्रे आहेत, ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती म्हणूनच ते 'खर्डा' व तोही 'कच्चा' ही प्रामाणिक भूमिका घेतात.

रियासतकारांचे निधन इ. स. १९५९ मध्ये झाले. त्या नंतर इतिहास संशोधनात क्रांतिकारक परिवर्तने झाली. नवीन अनेक साधने, कागदपत्रे, पुरावे ह्या दरम्यानच्या काळात प्रसिद्ध झालेली आहेत. तथापि इतिहासाच्या नव्या अभ्यासकास, विद्यार्थ्यांस 'रियासती'च अजूनही एक सलग माहिती देणाऱ्या म्हणून उपयुक्त ठरतात. त्याकडे जिज्ञासू अभ्यासक, खात्रीपूर्वक व विश्वासार्ह साधन म्हणूनच पाहात असतो. शिवाय मोगलांच्या अखेरपासून ते ब्रिटिशांच्या उपयापर्यंतच्या 'मराठ्यांच्या कालखंडा'चे सविस्तर इतिहास सांगणारी फारशी पुस्तके मराठीमध्ये आज तरी उपलब्ध नाहीत. अशा परिस्थितीत रियासतींचे पुनर्लेखन एक काळाची गरज म्हणून आवश्यक वाटते. पण त्याहीपेक्षा रियासतकारांचे हे महान कार्य असेच पुढे चालू राहणे म्हणजेच त्यांची स्मृती जागृत ठेवण्यासारखे आहे असे वाटते. अर्थात हे काम एकट्या/दुकट्याने संभवणार नाही. त्याला अनेकांचे सहाय्य मिळणे महत्त्वाचे आहे.

□ □

# आलिया भोगासी...

**संजय गोर्ले**
द्वि. व. शास्त्र

कानावर आवाज येताच तो थबकला. मान वळवून त्याने आवाजाच्या दिशेने पाहिले. समोरच्या शेतात चार–पाच कामचुकार मजूर काम करीत होते. कामापेक्षा त्यांचे बोलणेच जास्त चालले होते; आणि त्याचाच आवाज त्याच्या कानावर आला होता.

'आयला ! आपण गावाजवळ आलो की काय !' तो स्वत:शीच उद्गारला.

'चला ! जंगलात नाही तर नाही गावात काही मिळतंय का पाहूया' असा विचार करत तो गावाच्या दिशेनं चालू लागला.

सकाळपासून तो सगळं जंगल फिर फिर फिरला पण शिकार काही मिळाली नाही. माणसांनी झाडं तोडून उजाड केलेल्या जंगलात त्याला मिळणार काय म्हणा तसाच फिरत फिरत तो गावापाशी आला होता.

शेतावरच्या आपल्या घरातून गणपत बाहेर आला. मजुरांची काम करण्याची पद्धत बघून, तो एकदम भडकला. 'अरे, काय लावलंय काय ?' तरातरा त्यांच्या अंगावर जात तो ओरडला, 'काय जेवलाबिवला की नाही सकाळपासून, मरतुकडचा माणसासारखं काम करताय. चला उचला हात लवकर नाही तर मजुरी मिळायची नाही सांगून ठेवतो, कामचुकार लेकाचे' असे म्हणत तणतणतच तो घरात गेला. तो जाताच सर्व मजूरमंडळींनी हातातले विळे–कोयते टाकले आणि निवांत बांधावर झाडाखाली जाऊन बसले. गप्पागोष्टी करीत त्यांचे पान–तंबाखू खाणं सुरू झाले. गणपत एकदा येऊन गेला आता पुन्हा काय लवकर येत नाही त्यामुळे ते निर्धास्त होते.

इकडे तो हळूच ह्या घोळक्याच्या पाठीमागे येऊन उभा राहिला. एकाने मळलेली तंबाखू तोंडात टाकली आणि राहिलेला कचरा पाठीमागे टाकला. तो नेमका ह्याच्या तोंडावर. तंबाखू नाकात जाताच त्याचे नाक हुळहुळले. त्याने साट्कन एक शिंक दिली. शिंक ऐकताच कामचुकार मजूरमंडळी एकदम दचकली. पाठीमागे वळून बघतात तो काय. एक महाकाय चित्ता आपलं हुळहुळलेलं नाक पुढच्या पंजाने चोखतोय. मजूर मंडळींचे धाबे दणाणले. सर्वजण थरथर कापायला लागले. एकाने तोंडातली तंबाखू गिळूनच टाकली, एकाचं धोतर ओलं झालं, दोन क्षण सगळेच थरथरत होते. जरा वेळाने एकाला अवसान आलं. बेंबीच्या देठापासून किंचाळला, त्याचे किंचाळणे ऐकून नाक चोळणारा चित्ता एकदम दचकून उभा राहिला. तो उठताच सर्वजण पुन्हा घाबरले. कसंबसं उठत जीवाच्या आकांताने त्यांची गणपतच्या घराच्या दिशेने धूम ठोकली आणि घराच्या तोंडाशीच असलेल्या गोठचात शिरून दार लावून बसले. चित्ता चमकून त्यांच्याकडे बघतच राहिला. जरा वेळाने पुन्हा नाक चोळू लागला.

आपल्या ओरडण्याचा काय परिणाम झालाय हे पाहण्यासाठी गणपत पुन्हा बाहेर आला आणि त्याचं डोकंच सरकलं. एकही मजूर त्याच्या नजरेस पडत नव्हता. विळे–कोयते तसेच पडलेले होते. सणसणीत शिव्या देत त्याने मजुरांच्या मागच्या पिढचा बाहेर काढल्या. मजूरांनी टाकलेले विळे–कोयते आणायला तो पुढे आला. चार–पाच पावले पुढे जाताच तो एकदम थबकला. विळे–कोयते विसरून तो घरात पळत शिरला

आणि दार लावून बसला. चित्ता चक्रावला. आपल्याला बघून ही माणसं का पळतात हे त्याला समजत नव्हतं. भुकेची जाणीव झाली तसा तो गावाच्या वेशीवरून पुढे निघाला.

वेशीवरच तात्याचे घर होते. घराच्या सोप्यात खाट टाकून तात्या चिलमीतून धूर काढत बसला होता. त्याच्यासमोर त्याची बायको तांदूळ निवडीत बसली होती. तिच्याबरोबर तो पोरीच्या लग्नाविषयी बोलत होता. त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देत त्यांची पोरगी कपडे धुवायच्या निमित्ताने दगडावर कपडे आपटत बसली होती. खाटेवर पाय मुडपून घेत तात्याने एक जोरदार झुरका मारला. समोर काही तरी हालचाल दिसली म्हणून त्याने पाहिले तसा त्याचा आ वासला गेला. छातीतला धूर सोडायची त्याला गरजच भासली नाही, तो धूर आपोआपच बाहेर येऊ लागला. 'मग मी म्हणते जमलं तर ह्या वर्सालाच जमवा की' असे म्हणत त्याच्या बायकोने त्याच्याकडे पाहिले. नवऱ्याची विचित्र अवस्था बघून ती चमकली. 'आता, तर चांगलं होतं एवढ्यात ह्येला काय झालं' असे पुटपुटत तिने नवरा पाहत असलेल्या दिशेकडे पाहिले मात्र, क्षणात सुपासकट तांदूळ विखुरले गेले आणि तात्याला बायको ओरडत घरात शिरताना दिसली. तिचे ओरडणे ऐकून तो भानावर आला. त्याच्या हातातली चिलीम केव्हाच सुटली होती. खाटेच्या खिळचात अडकलेल्या धोतराची पर्वा न करता तोही बायको पाठोपाठ घरात पळाला. तात्याची पोरगी तर लग्नाची रंगवलेली स्वप्ने विसरून गवताच्या गंजीत केव्हाच लपून बसली होती.

हळूहळू पावले टाकीत चित्ता पुढे आला. तात्याने टाकलेल्या चिलमीला त्याने नाक लावले. चटका बसताच तो टाण्कन उडाला. चिलीमेकडे विचित्र नजरेने बघत तो पाणी साठवलेल्या दगडापाशी आला. भाजलेले नाक त्याने पाण्यात बुचकळले तेव्हा त्याला जरा बरे वाटले. चुरचुरत असलेल्या नाकानेच त्याने तात्याच्या घराभोवती फेरी मारली. पण त्याला काहीच मिळाले नाही. गोठ्यातही तो जाऊन आला पण तात्याच्या गायी व शेळ्या रानात गेल्यामुळे नुकताच वास घेण्यापलीकडे तो काहीच करू शकला नाही. हताश मनाने तो पुढे निघाला.

समोरच्या रस्त्यावरून एक वरात गावात चालली होती. वरातीच्यापुढे चार–पाच हाफ पँटीतले बँडवाले केकाटणाऱ्या पिपाण्या वाजवीत चालले होते. गावातल्या एका उमद्या मरतुकड्या घोड्यावर नवरदेव बसला होता. घोड्यासारखाच तोही किडमिडीतच होता. आपले पुढे आलेले दोन दात तो मुंडावळ्यांच्या आत लपवण्याचा प्रयत्न करत होता. त्याला कुणी मारून मुटकूनच घोड्यावर बसवला होता म्हणून की काय, नव्या नवरीपेक्षाही तो लाजत होता. घोड्याच्या मागून त्याची नववधू चालली होती. ती नेमकी नवऱ्याला वारा घालत होती की घोड्याच्या शेपटाला हे तिचं तिला माहित. तिचं गोजिरवाणं रूप तर विचारूच नका. कोळश्याच्यापेक्षा काळाकुट्ट रंग, नवऱ्यापेक्षा इंचभर पुढे आलेले आणि बऱ्याच दिवस न घासल्याने पिवळ्याहून पिवळे पडलेले दात आणि म्हशीने पाय दिल्यासारखे ढबाडें नाक, असा मद्रासी अंबाबाईसारखा तिचा अवतार होता. असं आपलं गोजिरवाणं रूप घेऊन अगदी नटून-थटून ती नवऱ्यामागं धपा–धपा पावलं टाकत युद्धावर निघाल्यासारखी चालत होती. तिच्यामागून चापून चोपून (वर्षातून एकदा (?)) घट्ट तेलकट वेण्या बांधलेल्या (वळलेल्या) सुवासिनी हातात फराळाची ताटे घेऊन चालल्या होत्या. त्यातली एक बया तर हातात घेतलेल्या ताटातून काही तरी जिन्नस काढून खात होती.

वरात वळणावरून गावात शिरली तसा चित्ताही त्यांच्या मागून चालू लागला. अगदी शांतपणे जणू त्यांच्यातलाच एक. एकाला काय वाटलं कुणास ठाऊक, त्याने सहज मागे वळून पाहिलं. नवा वऱ्हाडी पाहून त्याचे डोळेच पांढरे झाले. पायातली ताकदच कुणीतरी काढून घेतल्यासारखा तो मट्कन खाली बसला. वरात आपल्याच नादात पुढे चालली होती. चित्ता त्याच्याजवळ आला. चित्त्याने आपले तोंड त्याच्या गालाला लावीत, नाकपुड्या हलवीत वास घेतला. तशी त्याला एकदम वाचा फुटली. असेल नसेल तेवढा जोर काढून तो एकदम जोरात ओरडला तशी वरातीने दचकून मागे वळून पाहिले आणि एकच अभूतपूर्व गोंधळ सुरू झाला. वरातीपुढचे पिपाणीवाले तसेच पिपाण्या वाजवत गावाकडे पळत सुटले. उगाचच मुरके मारणाऱ्या सुवासिनींची तर बोबडीच वळाली. हातातली ताटे टाकून देऊन त्याही पळत सुटल्या. पुरुषमंडळी त्यांच्याही वरताण, इतका वेळ त्यांच्यापुढे मागे करणारे सर्व

पुरुष आता त्यांनाच तुडवत पुढे पुढे पळत होते. नवरदेवाची घाई तर विचारूच नका. चांगला घोड्यावर बसला होता, टाच मारून पळावं तर नाही. घोड्यावरून उतरून तो पळू पाहत होता, पण खास लग्नाकरिता तयार केलेला त्याचा गावठी बूट घोड्याच्या रिकिबीतच अडकून पडला होता. त्यातून सुटका करून घेण्याकरिता तो कमालीचा धडपडत होता. इकडे घोड्यालाही चित्त्याचा वास लागला होता. तोही नवरदेवापासून आपली सुटका करून घेण्याकरिंता धडपडत होता, पण बूट काही निघायला तयार नव्हता. दोघांच्या धडपडीत घोड्याची ताकद जास्त पडली. एक जबरदस्त झटका देऊन त्याने नवरदेवाला तीनताड उडविले आणि रिकिबीत अडकलेल्या बुटानिशी चौखूर उधळला. नवरदेव रस्त्यात पडलेल्या दगडांवर दाणकन आपटला. मागून त्याची महाकाय अंबाबाईही गेंड्यासारखी पळत सुटली होती. रस्त्यात पडलेल्या नवऱ्याकडे तिचे लक्षच नव्हते. त्याच्या पाठीवर पाय देऊन ती पुढे पळाली. नवऱ्याचा अर्धा जीव पिचकारीतल्या हवेसारखा बाहेर जाऊन परत आत आला. दुसऱ्या पायात राहिलेल्या बुटानिशी तोही जीव वाचवण्याकरता लंगडत कसाबसा पळत सुटला तेव्हा त्याचे पुढचे दोन्ही दात जागेवर नव्हते.

सगळ्या वरातीचे तीन तेरा वाजले चित्त्याचे डोके भिरभिरू लागले होते. एखादी कोंबडी–शेळी मिळण्याऐवजी नको त्या गोष्टी घडत होत्या. त्यामुळे तो वैतागला होता. पोटातली आतडी भुकेमुळे आत ओढली जात होती. कसाबसा रखडत तो गावात फिरू लागला.

'मेरे सपनों की रानी कब आएगी तू' म्हणत काश्या कासिमने सांगितलेली कोंबडी खुराड्यातून काढून आत दुकानात शिरत होता. चित्त्याने ते पाहिले मात्र तो मोठ्याने गुरगुरत झेपावत काश्याकडे निघाला. त्याचे लक्ष कोंबडीकडे होते. गुरगुराट ऐकून काश्याने मान वळवून पाहिले. बघतो तर काय एक अजस्त्र चित्ता अंगावर येतोय. काश्या 'सपनों की रानी' विसरला. त्याने कोंबडी फेकून दिली. कोठे लपावे हे त्याला कळेना. झटकन कोंबड्यांच्या खुराड्यात शिरून त्याने दार लावून घेतले. काश्याने फेकलेल्या कोंबडीलाही धोक्याची जाणीव झाली. चित्त्याने झडप घालायच्या आत ती उठून खुराड्याच्या छपरावर जाऊन बसली चित्त्याच्या अंगाची लाही-लाही झाली. रागाने त्याने खुराड्याचा जाळीवर जोराने पंजा मारला, पण गावातल्या कोंबडी चोरांनाही दाद न देणाऱ्या खुराड्याला काहीच झाले नाही. चित्त्याच्या पंजालाच जोरदार दणका बसला तसा तो आणखी खवळला. शेपटी आपटत, गुरगुरत तो खुराड्याभोवती लंगडत फिरू लागला. आतल्या कोंबड्यांना आणि काश्याला दोघांनाही हुडहुडी भरली. खुराड्याच्या एका अंगाला येताच काश्या आणि कोंबड्या खुराड्याच्या दुसऱ्या बाजूला पळत, चित्ता तिथे येताच पुन्हा दुसऱ्या बाजूला त्यांची पळापळी होई. काश्या आता सपनों की रानी ऐवजी रामराम म्हणत होता. त्यांच्या पळापळीत काश्याच्या पायाखाली किती कोंबड्यांनी राम म्हटला ते राम जाणे.

दुकानात कासीम कोंबडी सोलत बसला होता. बाहेर चाललेल्या प्रकारांची त्याला कल्पनासुद्धा नव्हती. काश्याला कोंबडी आणायला जसा वेळ होऊ लागला तसा तो चिडून म्हणाला, 'अरे काश्या, आया क्या जल्दी, इतनी देर लगती क्या कोंबडी पकडने कू।' चित्त्याच्या कानावर हे शब्द आले तसा त्याला रक्ताचा वास देखील आला. उघड्या दारातून तो आत शिरला. त्याची चाहूल लागताच कासीम म्हणाला, ला, जल्दी' शामतक उस बामण को पचास मुर्गी साफ करके देने का है। नहीं तो मेरे दुकान पे मंतर मारेगा, ला जल्दी कर।' असे म्हणत मागे न बघताच आपला रक्ताळलेला हात कोंबडी घेण्याकरिता मागे केला. रक्त बघून चित्ता खुळा झाला. त्याने कासिमचा हात चाटायला सुरुवात केली. तशी कासिम खवळला. 'अबे, गद्या मोऱ्या, मेरा हात चाटनेकू तू क्या शेरबीर है क्या।' म्हणत हात मागे घेत रागाने तो वळला. बघतो तर काय सचमुच शेर. कासिमला दरदरून घाम सुटला. कोयत्याच्या एका फटक्यात मुर्गीचा निकाल लावणारा शेर–ए–दिल कासिम स्वत:च मुर्गी झाला. त्याला धड ओरडताही येईना, धड पळताही येईना. त्याने सोलून ठेवलेली कोंबडी घेण्याकरिता चित्ता पुढे आला तशी कासिमला वाटले चित्ता आपल्या अंगावर आला. दोन्ही हात वर करून जोरात ओरडत थयथय नाचायला सुरूवात केली की विचारता सोय नाही त्याचा तो भयानक थयथयाट बघून चित्ताच घाबरला आणि बाहेर पळाला. काय होत आहे हे त्याला समजलेच नाही.

कसाबसा लंगडत पाय ओढत तो रस्त्यावर आला. समोर गावातलं आडदांड कुत्रं कासिमच्या दुकानातून

पळवून आणलेला कोंबडीचा पाय तोंड वाकडंतिकडं करीत चघळत होतं चित्त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. तो कुत्र्याजवळ आला. कुत्रं आपल्याच तंद्रीत पायाची चव घेत होतं. आशाळभूतपणे चित्ता त्याच्याकडे पाहत होता. कुत्र्याचे आपल्याकडे लक्ष नाही हे पाहताच चित्ता गुरगुरत आणि शेपटी आपटत त्याच्याभोवती फेऱ्या घालू लागला. तसा कुत्रा दचकून उठला. चित्त्याला बघून त्याने क्षणार्धात शेपटी पायात घातली. दबकून चारपाच पावलं तो मागं मागं सरकला आणि त्याने एकदम धूम ठोकली. कितीही झालं तरी शेवटी कुत्रंच ते, स्वतःबरोबर कोंबडीचा पायही घेऊन पळालं.

रस्त्याच्या कडेला एक गाढव उकिरडा फुंकत होतं. चित्त्याने त्याच्याकडे मोहरा वळविला पण त्याचा वास लागताच गाढवही उधळले. चित्त्याच्या अंगात त्याच्या-मागे पळण्याचे त्राण नव्हते. तो लंगडत-लंगडत उकिरड्यावर आला. कसेबसे बळ आणून त्याने मागचे पुढचे पाय झाडत उकिरडा धुडाळायला सुरुवात केली. मधूनच तो भाजलेले नाक खुपसून वास घेत होता. चुरचुरणाऱ्या नाकाला, तोंडाला आणि पायांना घाण लागत होती, पण त्याची पर्वा न करता तो शोधत होता. जंगलचा युवराज कुण्या एका भिकार गावात गाढवासारखा उकिरडा फुंकत होता. बराच वेळ फुंकल्यावर त्याला एक हाडूक सापडले. त्याने ते अलगद तोंडात धरून उचलले. मान वर करून आजूबाजूला पाहत तो जंगलाकडे निघाला. अंग धुळीने माखले होते. चेहऱ्याची पार दशा झाली होती. रडत-खडत कसाबसा लंगडत तो आपल्या घळीत पोचला.

घळीनं येताच त्याने तोंडातले हाडूक हळूवारपणे जमिनीवर ठेवले. त्याच्या डोळ्यात उदासवाणा भाव दिसत होता. चारी पाय दुमडून तो हाडकासमोर बसला. पुढचे दोनही पंजे एकावर एक ठेवून त्यावर त्याने हनुवटी टेकवली आणि एकटक हाडकाकडे पाहत बसला. कधी झोप लागली हे बिचाऱ्याला कळलंसुद्धा नाही.

□ □

---

### अश्विन पुंडलीक काव्यलेखन स्पर्धा : पारितोषिक विजेती कविता

# अनंताची वाटचाल

एक वाट अनंतात जाणारी,  
वाटेत सोबतीला कधी कधी काही हात धरणारे,  
कधी हात सोडणारे, आणि कधी म्हणे आपणहून सुटणारे.

अडचणींचा पाऊस कोसळतो,  
पण निश्चयाच्या फत्तरांवर नैराश्याचं शेवाळं साठू  
साठलं तरी त्यावरून घसरायचं नसतं, ढ्यायचं नसतं.  
घसरलोच तर खचून निदान मागे तरी फिरायचं नसतं,  
आशेच्या कुबड्या घेऊन चालतच राहायचं असतं.

अनंताकडची ही वाटचाल,  
अनवाणी पायांनी चालायची.  
बोचऱ्या काट्यांनाही मग चालताना तळव्यांनी कुरवाळायचं असतं  
आणि सारे क्लेश शेवटी वाहणाऱ्या पाण्यात विझवायचे असतात.

( पुढील पानावर )

भूतकाळचा धूसर पडदा आणि अस्पष्ट असा गडद भविष्यकाळ
अस्तित्वानंच साद घालतात वर्तमानाला जागवतात.
निसरडी पायवाट वर्तमानाची पावलोपावली घसंरते
ठेचकाळत पडत शेवटी ध्येयाकडेच घेऊन जाते.
अनंताच्या वाटेवर कधी बोट धरणारा सापडतो
कधी कधी अचानक आपणच त्याला हरवतो.
पुन्हा उठून सुरू होते वाटचाल चालू होते,
धरणारे दूर ठेवून, काठचा साऱ्या दूर फेकून, मन पुढे धावू लागते
थकलेल्या तळव्यांना तेलाची अपेक्षा असते,
कळत नाही वेड्यांना, अपेक्षेतच दुःख असते.
मन मग निश्चय करते, परिस्थितीही साथ देते,
आधाराला दूर ठेवून, अपेक्षेवर मात करते.
अपेक्षा स्वतःकडूनच अपेक्षाहीन बनायची
ती ही जेव्हा भंग पावते, कंबर खचते मनाची.
ते बिचारं बापुडपणा, थकून जातं केविलवाणं
स्वतःतच रमता रमता, होतं कधी उदासवाणं.
आधी बुरखा पांघरलेला, जाणूनबुजून पत्करलेला
एकटेपणाचा मार्ग त्याचा वेडावतो त्याचाच त्याला.
बुरखा पण फाटत नाही, निराश मन होत नाही
अंधुकशी स्पष्ट ऊब, त्याची कधी दुरावत नाही.
अदृश्य अशी मऊ शाल, गुरफटून सुरू चाल
अंतिम अशा अनंतातच, पुन्हा सुरू वाटचाल.
त्या वाटेवर उरत नाही, पाऊल मन काहीच नाही,
तिथे मग धरणार कसा ? हात कोण, कुणाचा कसा ?
तिथे फक्त उरलेला,
अस्तित्वाचा एक ठसा !
वाट तिथे संपलेली,
ध्येयापर्यंत पोचलेली,
अनंताची वाटचाल,
अनंतातच लय झाली ! ! !

**कु. योगिनी शरदचंद्र मुळे**
चतुर्थ वर्ष आयुर्वेद
अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय.
पुणे ३०

आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन
(महिला) विजेता संघ वरिष्ठ महाविद्यालय



आंतर शालेय कबड्डी (महिला) विजेता संघ
कनिष्ठ महाविद्यालय



आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल
(पुरुष) विजेता संघ
वरिष्ठ महाविद्यालय



क्रीडा संघटना



आंतर शालेय मैदानी स्पर्धा (मुले) विजेता संघ
कनिष्ठ महाविद्यालय



आंतर शालेय विभागीय बास्केट बॉल (मुले) विजेता संघ
कनिष्ठ महाविद्यालय





**कदम विश्वास**
तृतीय वर्ष कला–अखिल भारतीय
विद्यापीठ खेळाडू



**कळसकर स्मिता**
प्रथम वर्ष कला–बॉल बॅडमिंटन
युनिव्हर्सिटी



**दळवी अनंत**
प्रथम वर्ष कला–बॉल बॅडमिंटन
आंतर विद्यापीठ व्हॉलिबॉल प्रतिनिधी



**साळवी राजेश**
बॅडमिंटन व बॉल–बॅडमिंटन सेक्रेटरी



**पाटील शामला**
तृतीय वर्ष वाणिज्य–बॉल बॅडमिंटन
युनिव्हर्सिटी



**यादव राजेंद्र**
'तृतीय वर्ष कला–ज्युदो–जपानमधील
प्रशिक्षण पूर्ण ' ब्लॅक बेल्ट '



**बनकर संजय**
प्रथम वर्ष कला–विद्यार्थी प्रतिनिधी



**नेने सविता**
तृतीय वर्ष वाणिज्य–व्हॉलिबॉल व
बॉल बॅडमिंटन– युनिव्हर्सिटी



**गायकवाड सुरेश**
प्रथम वर्ष कला–व्हॉलीबॉल इंडियन
युनिव्हर्सिटी चाचणी स्पर्धेसाठी निवड

# हिन्दी विभाग

# दहेज प्रथा : एक सामाजिक अभिशाप

समशेरसिंग चमलेगी
१२ वी शास्त्र

किसी भी सामाजिक परम्परा, प्रथा या रीति-रिवाज को अपने मूल रूप में एकदम अपवित्र या अभिशाप नहीं कहा जा सकता। कोई भी प्रथा या परम्परा जब जीवन में प्रचलित होती है, तो उसके मूल में कोई–न–कोई पवित्र और क्रांतिकारी भावना रहती है। पर वह प्रथा या परम्परा तब बुराई बन जाती है, जब उसके साथ व्यापारिक दृष्टिकोन और घोर स्वार्थ का भाव जुड़ जाता है। भारत में इसी व्यापारिक दृष्टिकोन और निहित स्वार्थवाद ने ही दहेज जैसी पवित्र सामाजिक परम्परा को एक प्रकार का भयंकर अभिशाप बनकर रख दिया है।

दहेज का वास्तविक और व्यवहारिक अर्थ 'उपहार-विशेष' ही कहा जा सकता है। प्राचीन काल में 'विवाह' नामक पवित्र बंधन या परम्परा का आरंभ हुआ तो उसके साथ में घर से सदा के लिए विदा होकर एक पराये और नए घर में जानेवाली कन्या को शुभ कामनाओं के रूप में कुछ उपहार भी दिए जाने लगे। सभी दृष्टियों से योग्य किन्तु योग्य वर की सुविधा और कन्या के सुख सौभाग्य के लिए कहीं कही कुछ घरेलू सामान भी दिया जाने लगा। हां। जैसे–जैसे सामाजिक प्रथाएँ आती गई।

यह प्रथा रूढ़ होकर अनिवार्य सी बन गई। विशेष प्रतिबन्ध फिर भी न आया! कन्यापक्ष अपनी शक्ति के अनुसार जो कुछ भी देता वरपक्ष उसी सब को सौभाग्य मानकर स्वीकार कर लेता।

धीरे-धीरे समाज और आगे बढ़ने लगा। स्वार्थ और लाल लालच बढते गए। भावना और आध्यात्मिक पक्षों का लोप होता गया, परिणाम स्वरूप देश के कुछ भागों में, कुछ विवाह वर्गों में विवाह से पहले ही दहेज की रकम और धारणा निश्चित होने लगी सौदेबाजी की तरह लेन–देन का निर्णय होने लगा। अर्थात वरपक्ष के लोग यह बात भूलकर कि उनकी भी कन्याएँ हैं, अपने लडकों को मोल–तोल करके ऊँची रकमें और साज–सामान खरीदने लगे। उस सबका प्रदर्शन और प्रचार भी बढा–चढाकर किया जाने लगा परिणाम स्वरूप एक अच्छी प्रथा और परम्परा सामाजिक जीवन के लिए एक अभिशाप बनती गई। आज तो वह एक गलित कोढ़ का रूप धारण कर चुकी है।

पहले विवाह नामक सामाजिक संस्था के मूल में सामाजिक अपनत्व और पवित्रता की भावना थी, वह एकदम समाप्त हो गई है। आज तो वरपक्ष वालों के मुंह इस सीमा तक फट चुके हैं कि उन्हें अपनी वास्तविक औकात तक का भी स्मरण नहीं रह जाता! वह डाकू–लुटेरों जैसा व्यवहार करके कन्यपक्ष को पुरी तरह लूट लेना चाहते हैं। इस लूट से तैयारी न कर पाने के कारण कई माता–पिता तो कन्या का विवाह नहीं कर पाते। कई कन्याएँ चिन्तित माँ–बाप को चिन्ता से मुक्ति दिलाने के लिए आत्महत्या कर लेती हैं। कई कन्याएँ पथभ्रष्ट होकर घरों से भाग जाती हैं और उनमें से कुछ लडकियों को वेश्यालयों में आश्रय लेना पडता है। तिल–तिल घुटकर, घरों में कुँआरी ही बैठे रहकर अपने जीवन को समाप्त कर देनेवाली अभागिनियों की संख्या भी कम नहीं है।

आज हम दहेज न लेने या कम लेनेवाली कन्याओं

के जीवन के साथ घटित होनेवाली दुष्परिणामों के समाचार पत्रों में पढ़ते रहते है। बेचारी वधुओं के सौन्दर्य; शील–गुण स्वभाव तथा अन्य सभी प्रकार की सहज मानवीय विशेषताओं को भुलाकर दहेज के नाम पर जला दिया जाता है। गले घोटकर; बिजली के करेण्ट छुवाकर; मार–पीटकर, भूखे रखकर छत से नीचे गिराकर; उनके प्राण ले लिए जाते हैं।

ओह ! यह कैसा घोर और अनर्थकारी कर्म हैं। अपने को मनुष्य कहनेवाले दहेज के लोभी कुत्ते सब कर गुजरने का साहस न जाने कहाँ से बोर लेते हैं। ऐसी परिस्थिती में मनुष्य का धरम होता है कि इस कुप्रथा को जड मूल से उखाड फेका जाएँ, यहाँ हमारा कर्तव्य हो जाता है कि ऐसे लोगों का हम खुले रूप से बहिष्कार करें।

आखिरी इस कुप्रथा और गलित कोढ़ से छुटकारा पाने का उपाय क्या है ?

हमें अपने आत्मविश्वास को जगाना होगा, कि कुँवारे रह सकते हैं, पर दहेज नहीं लेंगे और विवाह योग्य युवक–युवतियाँ यह पक्का निश्चय कर ले कि माँ–बाप की इच्छा से वे लोग वहाँ कदापि विवाह नही करेंगे जहाँ दहेज लिया–दिया जाएगा। और इसके साथ–साथ सामाजिक संस्थाओं को तो सच्चे मनसे इस कुप्रथा के विरुद्ध वातावरण बनाना ही है।

□ □

---

## भारत बलवान है।

कह दो इस दुनिया से, हम बलवान हैं,
कह दो जमीं आसमाँ से भारत बलवान है।
सिख, ईसाई, मुस्लिम और हिंदू
सब हैं एक सागर के बिंदू
सब में हिंदुस्थानी खून है।
कह दो भारत बलवान है।
  जब राष्ट्र पर संकट आए,
  हम सब मिलकर एक हो जाए।
  समर-भूमि पर पाँव जमाए
  देखे कौन आँख उठाए।
देश के लिए नौजवानों के प्राण हैं।
कह दो इस दुनिया से, हम बलवान हैं,
कह दो जमीं आसमाँ से भारत बलवान है।

**–राजेश एम्. मुप्पीड**
११ वी, शास्त्र

---

# आतंकवाद समस्या और समाधान

**रेखा नारायण**
११ वी शास्त्र

भारत के कोने कोने में होने वाली भयानक घटनाओं के कारण आज हमारा ध्यान आतंकवाद की समस्या की और केंद्रित है। यह कहा जा सकता है कि अब आतंकवाद से भारत का परिचय चार पाँच वर्ष पुराना। पहले असम राज्य में और फिर पंजाब में। उन्नीस सौ साठ–सत्तर के लगभग आतंकवादी गतिविधियों ने भारत के विभिन्न भागों जैसे प. बंगाल, आँध्र प्रदेश आदि में गहन अंधकार फैलाया। अत: आतंकवाद हमारे लिए एक दूरदर्शीय बिंदू न होकर हमारे दैनिक जीवन को दुर्भावित करनेवाली एक समस्या बन गया है। जैसे जैसे भारतीय समाज आधुनिकीकरण और औद्योगीकरण की ओर बढता जा रहा है वैसे वैसे समस्याओं का दुर्भाव भी उस पर अधिक होता जा रहा है। इस कारण यह अति आवश्यक हो जाता है कि हम भारत में फैले राजनैतिक आतंकवाद का पूर्ण रूप से अध्ययन करें।

Grant wardlaw के मतानुसार जब व्यक्ति अथवा गिरोह हिंसा के बल पर अपना आधिपत्य स्थापित करने की कोशिश करता है और जनसाधारण को अपना निशाना बनाते हुए आतंक और भय की भावनाएं संचारित करता है तो उसे राजनैतिक आतंकवाद कहते हैं।

इस कुकर्म में लगे लोगों का लक्ष्य पूर्ण रूप से भारत की राजनैतिक व्यवस्था के विरुद्ध है। वे लोकतंत्र की प्रणाली में अल्प भी विश्वास नहीं रखते। उनका ध्येय मानवीय अधिकार, मौलिक स्वतंत्रता, मताधिकार, लोकतंत्र आदि का पूर्ण विनाश करता है। भारत में आतंकवाद की विजय लोकतंत्र के सर्वनाश का प्रतीक होगा। हिंसा केवल अन्यायपूर्ण और असमान सामाजिक व्यवस्था को ही जन्म देत है। ऐसे खुले व दृढ विचारों के कारण ही इटली और जर्मनी जैसे देश फासिस्टों और नाजियों का विरोध कर सके।

भारतीय सरकार नक्सलाइटों के विद्रोह को आसानी से दबा सकी। क्यों कि उनका प्रभाव केन्द्र बहुत छोटा था। उनके गुट सशस्त्र नहीं थे। वे भारत की मुख्य सामाजिक धारा से पूर्ण रूप से कटे थे। उनका दल कमजोर था और आसानी से कुचल दिया गया। किन्तु आजकल से आतंकवादियों की कथा कुछ और ही है। उन्होंने धर्म और राजनीति को मिला दिया। अन्य देशों से उन्होंने अस्त्र शस्त्र प्राप्त किए और असंख्य जाने लेकर सारे देश में भय और आतंक की एक लहर दौडा दी। अपनी माँगों को मनवाने के प्रयत्न में आतंकवादियों ने जो मार्ग अपनाए उन्हें केवल क्रूर, अमानवीय और पाश्विक ही कहा जा सकता है। वे एक खौपनाक रूप में सदा के लिए याद रहेंगी। फूलमालाओं से सुसज्जित शव यात्राएँ, खून से लथपथ गलियाँ, खण्डहर, अपने माँ के शव से लिपटे हुए एक बच्चे की करुण मूर्ति–यही सब कुछ आतंकवाद का परिणाम हुआ। यह भारत में ही नहीं बल्कि द्यूत की बीमारी के समान सम्पूर्ण विश्व में फैल रहा है।

यह विराट विश्व आज राजनैतिक आतंकवाद, अमानुषिक युद्ध आणविक आतंकवाद, सामाजिक अराजकता जैसे क्रूर खेलों के लिए एक रंगमंच मात्र

बन कर रह गया है। एक ओर इरान और इराक के बीच बरसों से चला आ रहा युद्ध एक दर्दनाक इतिहास बन रहा तो दूसरी ओर मानो फिलिस्तीन का युद्ध जले पर नमक छिडक रहा है। संसार की बडी शक्तियों के बीच हथियारों के लिए जो होड लगी है वह भी एक आतंकवाद को जन्म दे रही है जो कदापि मानव जाति के भले के लिए नही है। हाँ इसे सर्वनाश के और कदम जरूर ले जाएगी।

दुर्भाग्य वंश कुछ युरोपीय देशों के समान आतंकवाद का सामना करने में भारत को अपने पडोसियों से कोई सहायता नहीं मिल रही। अत: भारत को अपनी समस्याओं से आप ही लडना होगा। आतंकवाद को जड से उखाडने के लिए सबसे प्रथम तो यह आवश्यक है कि आतंकवादी दल को राजनीति से अलग रखा जाए। समाचार पत्रों के माध्यम से आतंकवाद संबंधीं घटनाएँ जनसाधारण तक पहुँचती हैं। वे भयभीत होते हैं और इससे आतंकवादीयों का ध्येय पूरा होता है। इसलिए इस पर रोक होनी चाहिए। इन क्रूर हिंसक आतंकवादियों से निपटने के लिए सरकार के सामने दो रास्ते हैं। सरकार या तो शक्ति के प्रयोग से उन्हें कुचल सकती है या फिर शांति पूर्ण समझौतों द्वारा सुलह हो सकती है। शक्ति का प्रयोग एक बार पहले भी असफल रहा जब ऑपरेशन ब्लूस्टार चलाया गया। सशस्त्र सेनाएँ स्वर्णमंदिर में घुसी और आतंकवादियों और उनके बीच भीषण युद्ध हुआ। इस घटना के कारण पंजाब के सिक्खों का सरकार पर से विश्वास उठ गया। आतंकवादी दल ने मृत्यु को प्राप्त हुए अपने साथियों को शहीद घोषित कर दिया। अत: शक्ति के प्रयोग से कुछ हल नहीं हो सकता। आतंकवाद का विरोध करने के लिए पंजाब के मूल निवासियों के मदद की आवश्यकता है। क्यों कि वे अब भी आतंकवादियों से सहानुभूति रखते हैं। उनको इस बात का विश्वास दिलाया जाना चाहिए कि आतंकवाद उन के भले के लिए न होकर संपूर्ण भारत के लिए एक समस्या बन गया है। जब उन में ऐसी भावना आएगी और वे भारतीय सरकार से मिलकर उनके विरुद्ध अभियान चलाएंगे तभी यह समस्या हल होगी और भारत एक शांतिमय कल का सपना देख सकेगा।

□ □

## मन का पंछी

मन का पंछी नील गगन में
उडने की इक आस लिए
बैठा रहा जमीं पर यूँ ही
ऊँचाई का भास किए।
जब भी उडना चाहा इसने
दुनिया ने पर काट दिए
वापस गिरा जमीं पर
सपनों का अहसास लिए।

—कु. अलका राजपाल
११ वी, शास्त्र

# राष्ट्रीय एकता : एक सुदृढ नींव

**नरेन्द्रसिंह कुशवाहा**
११ वी वाणिज्य

भारतवर्ष यह नाम सदियों से राष्ट्रीय एकता का प्रतीक रहा है, जिसकी गोद में कई ऋषियों एवं ज्ञानियों ने जन्म लिया उनका उद्देश राष्ट्रीय एकता को कायम रखना था। इस कार्य हेतु उन्होंने सांस्कृतिक पद्धति का प्रचार अपने शिष्यों में तथा उनके माध्यम से जनता में किया। आज भी महान ज्ञानियोंद्वारा लिखित ग्रंथ हमें स्नेहपूर्वक रहने तथा एकता स्थापित करने की प्रेरणा देते हैं।

हमारी संस्कृति तथा धर्म हमें एक दूसरे से पृथक करने का नहीं बल्कि आपस में मैत्रीपूर्ण व्यवहार रखने का संदेश देते हैं। हमारे महापुरुषोंने भी एकता के मजबूत आधारपर सु-राष्ट्र के निर्माण की शिक्षा दी तथा एकता स्थापित करने के लिए दर संभव प्रयास किए यहाँ तक कि इस महत्त्वपूर्ण कार्य में स्वयं को भी राष्ट्र के चरणों में अर्पित कर गए।

जब तक अंग्रेजों का भारत में शासन रहा, सभी भारतीय असुरक्षित रहे। इस का प्रमुख कारण था कि अंग्रेजों द्वारा भारतीयों पर किए गए अत्याचार की सीमा न रही। उन्होंने हमारी एकता को अपनी कूट-नीति का शिकार बनाया, क्योंकि हमारी एकता अंग्रेजी सत्ता के लिए एक विशाल दीवार थी जो कि उनके शासन में बाधक सिद्ध हो रही थी। इस दीवार को तोडने के लिए अंग्रेजों ने "बांटो और राज्य करो" नीति का सहारा लिहा। कहने का तात्पर्य यह है कि उन्होंने भारतीयों में फूट डाल दी तथा एक दूसरे के प्रति भडकाया जिससे हमारी शक्ति एक न रहकर अलग अलग विभाजित हो गई। अंग्रेजों की क्रूर नीतियों से हमारी संस्कृति तथा राष्ट्रीय एकता को भारी ठेस पहुँची जो हमारे लिए शीघ्र हीं आजादी के लक्ष्य को प्राप्त कर पाने का कारण बनी। अपने ही देश में हम अपने अधिकारों से वंचित रहे और गुलामी की जंजीरों में जकडे रहे।

अंग्रेजों के अत्याचार चरम सीमा तक पहुँच चुके थे। भारतीय उनकी स्वार्थपूर्ण नीतियों से अधिक समय तक अपरिचित न रहे और वे अपने महान नेताओं के नेतृत्व में अंग्रेजी शासन के विरुद्ध दमनात्मक कदम उठाने लगे। भारतीयों में अत्याचार के विरुद्ध एकता के बीज तेजी से अंकुरित होने लगे। सभी ने मिलकर अंग्रेजी हुकूमत को ललकारा, फलस्वरूप अंग्रेजी साम्राज्य की नींव हिल गई। भारतीयों में एकता उत्पन्न होने का अर्थ था ब्रिटिश साम्राज्य का अंत। हमारा इतिहास साक्षी है कि अंग्रेजों को हमारी राष्ट्रीय एकता के समक्ष नतमस्तक होकर देश छोडने के लिए मजबूर होना पडा।

आज हमारा देश स्वतंत्र है और हमें कई अधिकार प्राप्त हैं। फिर भी हम पूर्ण रुप से संतुष्ट नहीं है। आज भी देश में जाति-पांति तथा धर्म-पंथ की दीवारे कायम दिखाई दे रही हैं तथा भ्रष्टाचार फैला हुआ है। जरा सी बात पर आपस में भीड जाना तथा दंगे–फसाद को जन्म देना, अपने एक स्वार्थ के लिए कई लोगों की हत्या कर देना इसे मनुष्यता नहीं बल्कि पशुता कहना उचित होगा। हिंसा से भ्रष्टाचार को बढावा मिलता है तथा बदले की भावना जागृत हो उठती है। मनुष्य एक दूसरे के खून का प्यासा हो जाता

generated at various State (Regional) Centres will be later compiled at the Computer Centre of Madurai Kamaraj University to get the total picture.

Another aspect of the project is to study Socio- Economic aspects especially of the adivasi and tribal people who are involved in actual collection of frogs for sale. As a part of the project we have interviewed several of these people to understand their losses and gains in persuing this profession.

□ □

---

## Importance of 26th January in India

26th January, 1530 — Death of Barbar

26th January, 1720 — The Army of Nadirshah entered Delhi.

26th January, 1792 — Last war between Teepu Sultan and the English.

26th January, 1832 — The English went to Kabul for the first time.

26th January, 1869 — The Bombay High court was formed.

26th January, 1876 — The first Railway Train started from Calcutta to Bombay.

26th January, 1982 — The Telephone started between Bombay, Madras Calcutta for the first time.

26th January, 1930 — Pandit Jawaharlal Nehru and the Congressmen promised to get complete independence at the Ravi.

26th January, 1950 — India became a Republic.

**Rekha Narayan**
XI. ( Science )

## Recollections

It was another day —
a cuter day, a sweeter day —
When I played the big bad boy
and you just smiled carefree and gay
O ! you looked so pretty !
Its been long since you were so gay.
Your smile keeps returning —
Sweeter and SWEETER and SWEETER
It was another day —
a fresh day, a lovelier day —
When I smoked my first cigar
and you told me to put it away
O ! you were so caring !
Its been long since you cared
Your reproval keeps on ringing
Lovelier and LOVELIER and LOVELIER.
It was another day —
a closer day, a louder day —
When I held your hand and asked,
" What of me would you say ?"
O ! you were so loving !
Its been long since you said
you loved me
An echo keeps resounding
Louder and LOUDER and LOUDER.

By : **Samsher Sing Chamlegi**
XII Science

## Dr. S. Y. Paranjape at the International Conference

Dr. S. Y. Paranjape, Head of the Post-Graduate Research Centre and Department of Zoology of the College was invited to some National and International Conference in India and abroad.

He participated by presenting research papers at the "International Orthopterological (Entomological) Conference", held (Jan. 14-18th, 1986) at Siena in Italy. This conference was organized under the auspices of the University of Siena and other Italian and International Biological Societies. The conference was attended by delegates from about 27 countries. Dr. Paranjape was the only invitee who participated from and represented India. After the conference he was also invited for seminars and discussions at different Universities, Research Institutes and Natural History Musea in West Germany, Switzerland, Denmark, France and United Kingdom. In India, Dr. S. Y. Paranjape was invited to "First World Conference on Trade in Froglegs vis-a-vis Environmental considerations held (April 10–11th, 1986) at Calcutta." This World conference was sponsored jointly by The Marine Products Export Development Authority (MPEDA) of Ministry of Commerce and Central Inland Fisheries Research Institute (CIFRI) of ICAR, Govt. of India. Dr. Paranjape was also invited at the National Symposium on "Insect Nutrition and Impact on Reproduction," held (Jan. 7–9th, 1987) at Entomology Research Institute, Loyola College, Madras. The symposium was sponsored jointly by the Indian National Science Academy (INSA) and The Council of Scientific and Industrial Research (CSIR) New Delhi. He participated at these conferences by presenting research papers.

Dr. S. Y. Paranjape is associated as a Regional Investigator with Project on Frogs sponsored by MPEDA and being co-ordinated by Madurai Kamaraj University. Dr. Paranjape has also been awarded a Contractual, Collaborative research project on grouse locusts by the Zoological Survey of India, Calcutta.

# A Special Friend

Friendship is such a lovely thing,
that binds us both together,
Since we were little ignorant kids,
for years and years altogether,
And so I tell you, my dear friend,
I'll never forget you.
You'll be a landmark in my heart,
though sometimes we did go blue,
God made us both together so,
we're meant for each other,
He sent us down from his heavenly abode,
to nourish our friendship all the more,
God forbid but if life destines,
our paths different from each other,
my love for you will never fade,
but will increase altogether,
And so I hope my faithful friend,
you too feel the same,
let's keep the flame of friendship burning,
until we breathe last here,

**Shilpa Chavan**
XI Com.

# My Imagination

As the flower and the bee,
Always remain along,
So do I and she,
Sing together every song,
She takes me into the silent past,
The glorious future of eternal peace.
The truth which is so vast,
And ever deeper than the seas.
Even if the whole world perishes,
She will be by my side
To fulfil all my wishes,
And to bring over a happy tide.
But she can't exist in reality
That is the end of her fidelity
For she is just my sweet imagination

By **Rekha Narayan**
XI. ( Science )

# Turn of the Age...

Cavemen lived in dark black holes,
Devising pictures with bits of coals,
Retelling stories of hunts and fights,
Around the campfire's flickering lights.
Evolution has brought us here.
Modernman sits with his beer,
Within a pitch-black living-room,
And inside that cozy womb,
Watches T. V. with its flickering lights'
Retelling stories of hunts and fights.

**Miss Priya S. Darade**
XI. F.
Roll No. 490



**पेद्राम राकेश**
राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी
(N. D. A.) मध्ये प्रवेश



**पवार अनिल**
१२ वी कला – मॅरेथॉन



**कुलकर्णी शैलजा**
१२ वी शास्त्र– कबड्डी



**टिल्लू मकरंद**
प्रथम वर्ष वाणिज्य–बास्केट बॉल
सेक्रेटरी



**नेर्लेकर मनोज**
द्वितीय वर्ष शास्त्र–मैदानी स्पर्धा
व जलतरण



**नेरुरकर विनोत**
द्वितीय वर्ष शास्त्र–युनिव्हर्सिटी
टेनिस टीम निवड



**सोनावणे संगीता**
११ वी कला– कबड्डी



**हवालदार राजेंद्र**
तृतीय वर्ष शास्त्र–अखिल भारतीय
युनिव्हर्सिटी– बॉक्सिग कांस्य पदक
विजेता



**अवसरीकर विनीता**
इंडियन नेटबॉल टीममध्ये निवड,
इंटर स्टेट लेव्हल हॅन्डबॉल



**सूर्यवंशी एस्. एन्.**
तृतीय वर्ष वाणिज्य–कबड्डी युनिव्हर्सिटी



**कामत सुरेन्द्र**
१२ वी, मैदानी स्पर्धा
महाराष्ट्र संघात



**संसारे नीता**
तृतीय वर्ष कला–प्रथम क्रमांक



**फडके मेधा**
द्वितीय वर्ष वाणिज्य–कबड्डी युनिव्हर्सिटी



**भोपटकर गायत्री**
१२ वी वाणिज्य–आंतरराज्य कबड्डी



**पोरे प्रज्ञा**
१२ वी वाणिज्य 'प्रथम' क्रमांक
मार्च १९८६



**शिरोळे प्रकाश**
तृतीय वर्ष कला–आंतर महाविद्यालयीन
विद्यार्थी प्रतिनिधी



**कळसकर उज्वला**
तृतीय वर्ष वाणिज्य–व्हॉलिबॉल:
व बॉल बॅडमिंटन– युनिव्हर्सिटी



**जिनेडी शाकीर**
११ वी, मैदानी स्पर्धा महाराष्ट्र संघ



**मुथा संदीप**
१२ वी शास्त्र भौतिक शास्त्र विषयात बोर्डात पहिला



**देशपांडे अविनाश**
११ वी शास्त्र– राष्ट्रीय प्रज्ञा शिष्यवृत्ती विजेता



**भोसले साधना**
तृतीय वर्ष शास्त्र–प्रथम क्रमांक



**भागवत मंजुषा**
तृतीय वर्ष वाणिज्य–प्रथम क्रमांक एप्रिल १९८६



**नवाथे वासंती**
१२ वी शास्त्र– बोर्डात ६ वी पुणे विभागात मुलींमध्ये पहिली



**कऱ्हाडकर अंजू**
१२ वी कला– प्रथम क्रमांक बोर्डात ४७– मार्च ८६



**जोशी चंद्रकिशोर**
तृतीय वर्ष वाणिज्य–सीनिअर अंडर ऑफिसर–N. C. C.



**भावे माधवी**
तृतीय वर्ष वाणिज्य–आंतर महाविद्यालयीन विद्यार्थी प्रतिनिधी,
व्हॉलीबॉल– युनिव्हर्सिटी व नॅशनल



**मोघे सुधीर**
तृतीय वर्ष कला–राज्य, राष्ट्रीय व अखिल भारतीय विद्यापीठ पातळीवरील क्रिकेट खेळाडू



**बोडाडे रवींद्र**
दामोदर ट्रॉफी, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी



**देशपांडे मेघना**
द्वितीय वर्ष शास्त्र–वक्तृत्व नैपुण्य



**श्री. आव्हाड वि. ल.**
बी. लीब्. आय्. एस्सी. जून १९८६



**घेवडे राजेश**
द्वितीय वर्ष शास्त्र–मॅगझिन सेक्रेटरी



**अथणे सुहास**
तृतीय वर्ष वाणिज्य–कलामंडळ सचिव



**ढमाले किशोर**
१२ वी कला– वक्तृत्व नैपुण्य



**पिंगळे राजेंद्र**
द्वितीय वर्ष वाणिज्य–राष्ट्रीय पातळीवरील 'राष्ट्रीय सेवा योजना' शिबिरासाठी निवड



**जगदाळे अजय**
द्वितीय वर्ष शास्त्र–गदगकर संगीत स्पर्धा सर्वोत्कृष्ट गायक

# वार्षिक अहवाल १९८६–८७

## वरिष्ठ महाविद्यालय : क्रीडा संघटना वार्षिक अहवाल

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध स्पर्धांत भाग घेऊन नेत्रदीपक यश संपादन केले आणि महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली.

सतत दुसऱ्या वर्षी आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलांच्या संघाने विजेतेपद मिळविले. संघनायक अरविंद चव्हाण व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन.

त्याचप्रमाणे आंतरमहाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन मुलींच्या संघाने सतत तिसऱ्या वर्षीही विजेतेपद संपादिले. संघनायक कु. उज्ज्वला कळसकर आणि खेळाडू यांचे हार्दिक अभिनंदन.

या वर्षी खालील संघाने आंतर महाविद्यालयीन विविध क्रीडा स्पर्धेत उत्तम कामगिरी केली. याबद्दल संघनायक व खेळाडू यांचे हार्दिक अभिनंदन.

१. आंतर महाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन संघ पुरुष उपविजेता.
२. आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन महिला संघ उपविजेता.
३. आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल महिला संघ उपविजेता.
४. आंतर महाविद्यालयीन हॅन्डबॉल महिला संघ उपविजेता.
५. आंतर महाविद्यालयीन ४ + १०० मी. रिले स्पर्धा विजेता संघ.

तसेच आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत कु. स्वाती गोखले प्रथम वर्ष वाणिज्य यांनी १०० मी. धावणे द्वितीय क्र. व लांब उडीत प्रथम क्र. मिळविला.

कु. संगीता लोखंडे एम. कॉम. हिने लांब उडीत द्वितीय क्रमांक मिळविला.

श्री. अतुल सफाई तृतीय वर्ष वाणिज्य याने आंतर महाविद्यालयीन जलतरण १०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक व २०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविले.

आमच्या महाविद्यालयाचे मुष्टियोद्धे श्री. राजेंद्र हवालदार तृतीय वर्ष शास्त्र यांनी आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत दरवर्षी प्रमाणे ५७ किलो गटात विजय संपादन केला.

## खालील विद्यार्थ्यांनी पुणे शहर विभागाचे प्रतिनिधित्व केले.

| | | |
|---|---|---|
| माधवी भावे | तृतीय व. वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| उज्वल्ला कळसकर | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल बॉलबॅडमिंटन |
| श्यामला पाटील | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल बॉलबॅडमिंटन |
| सविता नेने | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल |
| विनिता अवसरीकर | एम्. कॉम. पार्ट वन | बॉलबॅडमिंटन |
| स्मिता कळसकर | प्रथम व. कला | बॉलबॅडमिंटन |
| अनंत दळवी | ,, ,, ,, | बॉलबॅडमिंटन व्हॉलीबॉल |
| सुरेश गायकवाड | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल |

| | | |
|---|---|---|
| अरविंद चव्हाण | प्रथम वर्ष वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| मनीषा गंभीर | तृतीय वर्ष वाणिज्य | हॅण्डबॉल |
| सुधीर मोघे | तृतीय वर्ष कला | क्रिकेट |
| सीमा जोशी | एम्. कॉम्. पार्ट वन | खोखो |
| संगिता लोखंडे | ,, ,, ,, | खोखो |
| स्वाती गोखले | प्रथम वर्ष वाणिज्य | खोखो |
| स्वाती कुलकर्णी | ,, ,, ,, | खोखो |
| राजू हवालदार | तृतीय वर्ष शास्त्र | बॉक्सिग |
| वामन परांजपे | द्वितीय वर्ष वाणिज्य | मल्लखांब |
| विश्वास कदम | तृतीय वर्ष कला | बास्केटबॉल |
| शुभांगी बागवडे | ,, ,, ,, | कबड्डी |
| मेधा फडके | द्वितीय वर्ष वाणिज्य | कबड्डी |
| सुनंदा सूर्यवंशी | तृतीय वर्ष वाणिज्य | कबड्डी |
| विनित नेरूरकर | द्वितीय वर्ष शास्त्र | लॉनटेनिस |
| जॉनी मेनन | एम्. कॉम्. पार्ट वन | व्हॉलीबॉल |

## खालील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

| | | |
|---|---|---|
| माधवी भावे | तृतीय वर्ष वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| उज्वज्ला कळसकर | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल बॉलबॅडमिंटन |
| श्यामला पाटील | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल बॉलबॅडमिंटन |
| सविता नेने | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल |
| विनिता अवसरीकर | एम्. कॉम्. पार्ट वन | बॉलबॅडमिंटन |
| स्मिता कळसकर | प्रथम वर्ष कला | बॉलबॅडमिंटन |
| अनंत दळवी | ,, ,, ,, | बॉलबॅडमिंटन |
| सुरेश गायकवाड | ,, ,, ,, | व्हॉलीबॉल |
| अरविंद चव्हाण | प्रथम वर्ष वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| मनीषा गंभीर | तृतीय वर्ष वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| सुधीर मोघे | तृतीय वर्ष कला | क्रिकेट |
| सीमा जोशी | एम. कॉम. पार्ट वन | खोखो |
| संगीता लोखंडे | एम. कॉम. पार्ट वन | खोखो |
| स्वाती गोखले | प्रथम वर्ष वाणिज्य | खोखो |
| स्वाती कुलकर्णी | ,, ,, ,, | खोखो |
| राजू हवालदार | तृतीय वर्ष शास्त्र | बॉक्सिग |
| वामन परांजपे | द्वितीय वर्ष वाणिज्य | मल्लखांब |
| विश्वास कदम | तृतीय वर्ष कला | बास्केटबॉल |
| सुनंदा सूर्यवंशी | तृतीय वर्ष वाणिज्य | कबड्डी |
| मेधा फडके | द्वितीय वर्ष वाणिज्य | कबड्डी |
| विनित नेरूरकर | द्वितीय वर्ष शास्त्र | लॉनटेनिस |
| शुभांगी बागवडे | तृतीय वर्ष कला | मैदानी स्पर्धा |

## राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात खालील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रतिनिधित्व केले

| | | |
|---|---|---|
| सुरेश गायकवाड | प्रथम वर्ष कला | व्हॉलीबॉल |
| माधवी भावे | तृतीय व . वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| स्वाती कुलकर्णी | प्रथम वर्ष वाणिज्य | खोखो |
| स्वाती गोखले | प्रथम व . वाणिज्य | खोखो |
| सीमा जोशी | एम. कॉम. पार्ट वन | खोखो |
| संगीता लोखंडे | एम. कॉम. पार्ट वन | खोखो |
| मेधा देशपांडे | प्रथम व . वाणिज्य | खोखो |

## आमचे मानकरी

आमच्या महाविद्यालयातील **कु. स्वाती कुलकर्णी** प्रथम व ं वाणिज्य यांनी राष्ट्रीय स्तरावरील उत्तम खोखो पटू म्हणून ' राणी लक्ष्मीबाई ' पुरस्कार मिळविला.

सचिन सावंत, तृतीय वर्ष वाणिज्य यांची भारतीय बास्केटबॉल कनिष्ठ संघात याही वर्षी निवड झाली.

सुरेश गायकवाड प्रथम वर्ष कला यांना भारतीय विद्यापीठ व्हॉलीबॉल संघात विशेष निमंत्रण.

केंद्रसरकारची क्रीडा शिष्यवृत्ती पतियाळा पुरस्कृत प्रती महिना रु. ३००/– ही आमच्या महाविद्यालयातील खालील खेळाडूंनी याही व र्षी मिळविली.

१. संगीता लोखंडे — एम. कॉम. पार्ट वन
२. सीमा जोशी — एम्. कॉम्. पार्ट वन

सालाबादप्रमाणे झालेल्या आंतर वर्गीय ( टेनिस ) क्रिकेट स्पर्धात विजयी संघ ११ वी शास्त्र
उपविजयी संघ १२ वी वाणिज्य
सर्वात्कृष्ठ बॉलर.
सर्वात्कृष्ठ बॅटस्मन ( अविनाश पवार ) तृतीय वर्ष वाणिज्य

राजेंद्र यादवने तृ. वाणिज्य जपान येथे ज्यूदोकान प्रशिक्षण संस्थेत तीन महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण करून ब्लॅक बेल्ट संपादिला.

दरवर्षीप्रमाणे आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा क्रीडा संघटनेद्वारा भरवण्यात आल्या. त्यात तृतीय व ं वाणिज्य सी. या वर्गाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

शरीर सौष्ठव, स्पर्धातील ' मॉडर्न श्री ' हा किताब अनिल पवार यांनी दुसऱ्यांदा मिळविला.

क्रीडा संघटनेस माननीय प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी आणि माझे विद्यार्थी, खेळाडू मित्र या सर्वांचे बहुमोल सहाय्य लाभले.

या सर्वांचे आभारी आहोत.

**प्रकाश शिरोळे**

| | | |
|---|---|---|
| **माधवी भावे** | **प्रा. किरण लागू** | **प्रा. बनसुडे जो. एम्.** |
| विद्यार्थी प्रतिनिधी | क्रीडा संघटक | कार्याध्यक्ष |

## कनिष्ठ महाविद्यालय ' क्रीडा–संघटना '

प्रतिवर्षीप्रमाणे १९८६–८७ हे शैक्षणिक वर्ष हे कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा संघटनेच्या स्पृहणीय यशात भर घालणारे ठरले हे नमूद करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी आंतरमहाविद्यालयीन, विभागीय आणि जिल्हा स्तरांवरील विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन महाविद्यालयाचे यशस्वी प्रतिनिधित्व केले आहे. त्यांच्या कौतुकास्पद कामगिरीचा आलेख पुढीलप्रमाणे :–

कनिष्ठ महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने जिल्हा, आंतरमहाविद्यालयीन आणि आंतरविभागीय अशा तीनही स्तरांवर अजिंक्यपद संपादून विजेतेपदाची हॅटट्रिक पूर्ण केली.

राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी स्पर्धेसाठी खालील विद्यार्थिनींची निवड झाली.

१) कु. शैलजा कुलकर्णी बारावी ई.
२) ,, गायत्री भोपटकर बारावी आय.
३) ,, संगीता सोनावणे बारावी बी.

कबड्डी संघातील सर्व स्पर्धकांचे आणि राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी स्पर्धेसाठी निवड झालेल्या वरील तिघींचे मन:पूर्वक अभिनंदन !

आंतर विभागीय मैदानी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून खालील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे –

| | | |
|---|---|---|
| १) सुरेंद्र कामत | १००, ४००, ४००X४ रिले | |
| २) शाकीर जिनेडी | ४००, ८०० | –,,– |
| ३) अनिल पार | १५००, ५००० ४००X४ रिले. | |
| | मी· धावणे | |
| ४) कैलास कागल | ४००X४ रिले. | |
| ५) संपत निकम | ४००X४ रिले. | |
| ६) ऑगस्टिन डिमेलो | ४००X४ रिले: | |

वरील सहांपैकी सुरेंद्र कामत व शाकीर जिनेडी या दोन खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावरील मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली.

आंतर महाविद्यालयीन स्तरावरील बास्केट–बॉल स्पर्धेत आपल्या संघाने विजेतेपद मिळविले. राष्ट्रीय स्तरावरील बास्केट बॉल स्पर्धा अमरावती येथे संयोजित केली होती. त्यासाठी खालील दोघांची निवड झाली.

१) मिहीर पेंढारकर
२) धनेश दळवी.

राष्ट्रीय स्तरावरील व्हॉलीबॉल स्पर्धा आग्रा येथे संयोजित केली होती. या स्पर्धेसाठी राजेश गायकवाड बारावी आर्टस्. याची निवड झाली.

आंतरमहाविद्यालयीन स्तरावरील व्हॉलीबॉल स्पर्धेत आपल्या संघाने उप– विजेतेपद पटकावले.

राष्ट्रीय स्तरावरील खो–खो स्पर्धेसाठी खालील दोघांची निवड झाली.

१) कु. भारती टिळक
२) कु. धनश्री पोळ

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयाच्या सांघिक व वैयक्तिक अशा आंतरराष्ट्रीय स्पर्धा घेण्यात आल्या.

बारावी आर्टसेला या वर्गाने मुलांचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले तर सुरेंद्र कामत हा विद्यार्थी मुलांच्या नैपुण्यपदाचा मानकरी ठरला. तृप्ती बोडे ही विद्यार्थिनी मुलींच्या नैपुण्यपदाची मानकरी ठरली.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा संघटनेस मा. प्राचार्य, उपप्राचार्य, कार्याध्यक्ष, जिमखाना संघटनेचे कार्यकारी मंडळ, कार्यालयीन कर्मचारी व सेवकवर्ग यांचे मार्गदर्शन, सहकार्य मिळाले. क्रीडा संघटना त्यांच्याच पाठिंब्यावर महाविद्यालयाची यशस्वी परंपरा टिकवून आहे. सर्वांचेच आम्ही ॠणी आहोत.

**प्रा. जी. एम्. बनसोडे**
कार्याध्यक्ष

**विनोद छाब्रा**
**विनय शेरीकर**
क्रीडा संघटक.

# एन्. सी. सी.

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील ११३ विद्यार्थी आणि ११ विद्यार्थिनी असे एकूण १२४ कॅडेटस् विविध युनिटस्मध्ये दाखल झाले होते. या युनिटनुसार त्यांची विभागणी खालीलप्रमाणे होती.

| Name of NCC Unit | Number of Cadets. |
|---|---|
| i ) 36 MAHARASHTRA BN | 53 |
| ii ) 3 MAH. NAVAL Unit | 42 |
| iii) 3 MAH. AIR SQN. | 16 |
| iv) 1 MAH. SIGNAL Coy | 02 |
| v ) 2 MAH. GIRLS Bry | 11 |
| | Total 124 |

या वर्षात वृक्षारोपण, रक्तदान, गणेशोत्सव काळात सामाजिक कार्य, साहसाचे उपक्रम, गिरिभ्रमण यासारख्या विविध उपक्रमांत आपल्या महाविद्यालयातील कॅडेटस् सहभागी झाले होते.

**विशेष उल्लेखनीय :** आपल्या महाविद्यालयात बारावी शास्त्र या वर्गात शिकणारा 36 MAH. BN NCC मध्ये दुसऱ्या वर्षातील कॅडेट राकेश पेद्राम याची National Defence Academy Khadakwasla, मधील अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी निवड झाली. ६ जानेवारी १९८७ पासून त्याचे प्रशिक्षण सुरू झाले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सैन्यात अधिकारी म्हणून तो दाखल होईल.

**मधुसूदन मुटाटकर :** हा दुसरा कॅडेट, 36 MAH. BN. मधून IMA डेहराडूनमधील शिक्षणासाठी निवडला गेला होता. त्याने अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला. डिसेंबर १९८६ मध्ये सैन्यात अधिकारी म्हणून रुजू झाला.

या दोन्ही विद्यार्थ्यांना कॅप्टन आपटे यांचे मार्गदर्शन लाभले होते. राकेश व मधूसुदन. दोघांचे अभिनंदन.

आपल्या महाविद्यालयातील खालील कॅडेटसनी विविध उपक्रमामध्ये भाग घेऊन यश संपादन केले आहे.

**36. MAH. BN.**

1. U/o जोशी सी एस. – Advance Leaderhip Camp.
2. Sgt. परदेशी एम्. एन्. – „ „ „
3. Cpl. कसबे पी. व्ही. – Army Attechment camp, Shivaji Trail
4. Cpl. अंजळेकर एस्. एल्. – Shivaji Trail
5. Cpl. जाधव एस्. पी. – Mountaineering – Treking

**3. MAH. NAVAL Unit :**

1. Cdt. Capt. नवींदरसिंग सितल – Treking
2. Cdt. उत्तेकर एन्. बी. – Basic Leadership Camp.
3. कु. गायकवाड वासंती – Nav–Sainik Camp
4. Cdt. पटेलिया डी. आर. – Sports Camp – (Hockey)

गणेशोत्सवात एक आठवडा तसेच गणेशविसर्जन मिरवणुकीचे वेळी आपल्या कॅडेटस्नी स्वयंसेवक म्हणून उत्तम प्रकारे काम केले.

आपल्या महाविद्यालयातील एन्. सी. सी. प्रमुख अधिकारी, कॅप्टन आपटे यांनी officers Training School–Kamptee येथील एक महिन्याचा R/SD III कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला व Major ह्या पदावर बढती मिळण्याची पात्रता संपादन केली.

आपल्या महाविद्यालयातील नाविक दलाचे– लेफ्ट. अे. एल्. पाथरे यांनी वार्षिक. शिबिराचे वेळी ट्रेनिंग ऑफीसर म्हणून उत्तम काम केले.

या विविध उपक्रमांना प्राचार्य, तसेच कार्यालयीन कर्मचारी व सेवकवर्ग यांचेकडून चांगले सहकार्य मिळाले. या सहकार्याबद्दल त्यांचे आभार.

**पद्माकर आपटे**
( ऑफिसर इनजार्ज )

# शारीरिक शिक्षण विभाग

## वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय

महाविद्यालयाच्या १९८६–८७ या शैक्षणिक वर्षाच्या शारीरिक शिक्षणाच्या तासांना १०–७–१९८६ पासून सुरुवात झाली व विद्यार्थ्यांमधूनच शारीरिक शिक्षण संघनायकाची निवड करण्यात आली. त्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

प्रथम वर्ष कला, वाणिज्य व शास्त्र या वर्गासाठी आठवड्यातून ३ वेळा ( सोमवार, बुधवार, शुक्रवार ) सकाळी महाविद्यालय सुरू होण्यापूर्वी ६–४० ते ७–२० ह्या वेळात शारीरिक शिक्षणांचे तास घेण्यात आले.

तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शारीरिक शिक्षणाचे तास हे त्यांच्या वर्गाच्या वेळापत्रकाप्रमाणे महाविद्यालयाच्या नियमित वेळात घेतले गेले. ते प्रतिवर्ग आठवड्यास दोन–दोन याप्रमाणे होते.

वरील शारीरिक शिक्षणाच्या तासांना, विद्यार्थ्यांना विविध खेळाचा सराव त्याचे कौशल्य, तंत्र आणि त्यासाठी आवश्यक असणारी शारीरिक क्षमता विद्यार्थ्यांत निर्माण करण्यात आली.

कनिष्ठ महाविद्यालयाची वर्षातून दोन वेळा शारीरिक क्षमता कसोटी घेण्यात आली त्यात १०० मी. धावणे, गोळाफेक, लांबउडी या प्राथमिक कौशल्याचा समावेश होता.

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वर्षाअखेर शारीरिक क्षमता कसोटी घेण्यात आली त्यात १०० मी. धावणे, लांबउडी, स्कॉट औड थ्रस्ट शरीरखेच ( पुल अप्स ), शीट अप्स, आणि दोरीवरच्या उड्या (स्किपींग) याचा समावेश होता.

शारीरिक शिक्षणाद्वारे शारीरिक दोषांचे उच्चाटन करणे, मसाज, आरोग्य विषयक सल्ला, उंची वाढविणे, अंगातून मेद कमी करणे, चौरस आहार या विषयी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले.

## वैद्यकीय तपासणी

दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षी प्रथम वर्ग शास्त्र, कला व वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी शारीरिक शिक्षण विभागाच्या पुढाकाराने घेण्यात आली.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण विद्यार्थ्यांनी साजरे केले.

दि. १२ जानेवारी १९८७ युवक दिन स्वामी विवेकानंद जयंती या वर्षी युवकांच्या स्पर्धा घेऊन साजरी करण्यात आली.

यामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता कसोट्या घेण्या आल्यात वा १०० मी. धावणे, गोळाफेक, लांबउडी व ३००० मी. धावणे ह्या स्पर्धा घेण्यात आल्या.

तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या आंतर वर्गीय क्रिकेट स्पर्धांतील अंतिम सामना घेण्यात आल ह्या सामना ११ वी शास्त्र तुकडी ई विरुद्ध १२ वी वाणिज्य तुकडी आय ह्यांच्यात अतिशय चुरशीने खेळला गेला.

ह्यात ११ वी शास्त्र तुकडी ई हा संघ विजयी व १२ वी वाणिज्य तुकडी आय हा संघ उपविजयी झाला.

१९८६–८७ ह्या शैक्षणिक वर्षात शा. शिक्षण संघनायकासाठी दिवाळीच्या सुट्टीत एक शिबीर घेण्यात आले ह्यात त्यांना वर्गनियंत्रण, क्रीडाकौशल्य कसे शिकवावे ह्या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

१९८६–८७ ह्या शैक्षणिक वर्षासाठी म्हणून खालील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट संघनायक म्हणून काम पाहिले.

| | |
|---|---|
| १) श्री. गोखले केदार रविंद्र | प्रथम वर्ष वाणिज्य |
| २) श्री. बासन पवनकुमार | तृतीय वर्ष शास्त्र |
| ३) श्री. हंबीर राजेश शाम | प्रथम वर्ष शास्त्र |
| ४) श्री. बहिरट अनिल | द्वितीय वर्ष कला |
| ५) श्री. जगदीश सातव | तृतीय वर्ष वाणिज्य |
| ६) श्री. मोरे भरत नामदेव | १२ वी आर्टस् |
| ७) श्री. शिंदे शरद | ११ वी आर्टस् |

८) कु. एरंडे वसुधा — प्रथम वर्ष वाणिज्य
९) कु. भालेराव ज्योती — प्रथम वर्ष वाणिज्य
१०) कु. सावळेकर मेधा — १२ वी आर्टस्
११) कु. औटे आशू — ११ वी आर्टस्
१२) कु. काकडे मनीषा — ११ वी आर्टस्
१३) कु. नागरेचा मनीषा — १२ वी शास्त्र
१४) कु. जोशी स्वाती — १२ वी आर्टस्
१५) कु. गोरे स्वाती — १२ वी आर्टस्

मा. प्राचार्य, कार्यालयीन कर्मचारी, संघनायक श्री. नेर्लेकर, बनकर व कु. भावे. ह्यांच्याकडून लाभलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**विनोद छाब्रा**
**विनय शेरीकर**
शा. शिक्षण शिक्षक
कनिष्ठ महाविद्यालय

**किरण लागू**
संचालक
शा. शिक्षण विभाग
वरिष्ठ महाविद्यालय

## कलामंडळ

दरवर्षीप्रमाणे यंदाही महाविद्यालयाच्या कलामंडळातर्फे अनेक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी निरनिराळ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन सुयश प्राप्त केले. सतत तिसऱ्यांदा पुरुषोत्तम करंडक जिंकण्याची ईर्षा बाळगून महाविद्यालयाने पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेमध्ये राज काझी यांच्या 'निरन्न नागवे' या एकांकिकेचा अतिशय दर्जेदार प्रयोग सादर केला. परंतु पुरुषोत्तम करंडक आमच्या हातून निसटला. तरीही एकांकिकेचा विद्यार्थी दिग्दर्शक व प्रमुख कलाकार गगनविहारी बोराटे याने सर्वोत्कृष्ट अभिनेत्यासाठी ठेवलेला 'नटवर्य केशवराव दाते' करंडक पटकावला. या एकांकिकेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| सुनील देशपांडे | संध्या नाईक | गिरीश देशमुख |
| मंजुषा दोंदेकर | सुप्रिया देशपांडे | गगनविहारी बोराटे |
| शुभदा शहा | जितेंद्र आफळे | निमिष तोटे |
| दिनेश शाळिग्राम | तेजस्विनी आठवले | वर्षा दीक्षित |
| मंजुषा कोठे | मनीषा जोशी | अंबुजा गुळवणी |
| भारती केळकर | श्रीपाद काळे | यशवंत पाषाणकर |
| राजेंद्र कांबळे | सुनील होवाळे | दिनेश पवार |
| संदीप साकोरे | मृदुला ठकार | |
| | अजित टेंबे | मकरंद टिल्लू |
| अनिल पवार | मकरंद गोवर्धन | राजू माने |
| श्रीधर पिसाळ | विकास पेशवे | |

जागर आंतरमहाविद्यालयीन प्रसंग नाट्य स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या आमच्या संघात खालील विद्यार्थी होते.

| | | |
|---|---|---|
| अनिरुद्ध खुटवड | संजय तागुंदे | सिकंदर सय्यद |
| अंजली जोशी | मृदुला फाटक | पल्लवी गोखले |
| मेघना देशपांडे | श्रीपाद आमले | प्रसाद शेंडे |

जळगाव येथील लायन्स क्लब स्पर्धेत श्रीपादराज आमले याने एकपात्री अभिनयस्पर्धेत भाग घेतला.

गदगकर संगीत स्पर्धेत सहभागी झालेला आमचा संघ खालीलप्रमाणे :–

अजय जगदाळे, मंजिरी सोवनी, जितेंद्र कुलकर्णी,
आनंद करंदीकर, अवधूत कोलवाळकर, संदीप नाईक,
शिरीष कुलकर्णी, राजेश परताणी,

या स्पर्धेत अजय जगदाळे याने सर्वोत्कृष्ट गायकाचे पारितोषिक व मंजिरी सोवनी हिने गायनाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

फिरोदिया करंडक विविध गुणदर्शन स्पर्धेत शिरीष कुलकर्णी याने लिहिलेला व दिग्दर्शिलेला 'नवरत्नांच्या शोधात' हा प्रयोग सादर केला. या संघातील अजय जगदाळे यास गायनाचे द्वितीय पारितोषिक मिळाले. इतर कलावंत खालीलप्रमाणे :–

श्रीनिवास लाटकर, देवीप्रसाद कुलकर्णी, अभय गोडसे,
अश्विन बापट, भरत ठाकूर, राजेंद्र पाटील,
सुनील राठी, पराग चौधरी, महेश पाटणकर,
धनश्री पारसनीस, मोहना परुळेकर, मंजिरी देशपांडे,
जितेंद्र कुलकर्णी, आनंद करंदीकर, अजित टेंबे,

सिम्बॉयोसिस संगीत स्पर्धेत त्यागराज खाडिलकर व मंजिरी देशपांडे यांनी भाग घेतला व त्यागराज खाडिलकरने गझल–गायनात प्रथम क्रमांक व शास्त्रीय गायन स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावला.

अहममदनगर येथील लायन्स क्लब संगीतस्पर्धेत त्यागराज खाडिलकर व लीना श्रोत्री यांना सहभाग दिला. तर पुण्याच्या बी. जे. मेडिकल सांस्कृतिक महोत्सवात रवींद्र बोदडे, वर्षा दीक्षित, सिकंदर सैय्यद, परेश मोकाशी, मकरंद टिल्लू हे विद्यार्थी भाग घेत आहेत.

दि. १ ऑक्टोबर १९८६ रोजी कलामंडळातर्फे प्रसिद्ध अभिनेते श्री. यशवंत दत्त यांचा कार्यक्रम सादर केला गेला. त्यांनी नटसम्राटमधली स्वगते म्हटली. हा कार्यक्रम खूपच प्रभावी झाला.

यंदा महाविद्यालयाने सुरू केलेल्या नाट्यशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे संयोजक व व्यवस्थापनामध्ये कलामंडळ सदस्यांनी सक्रिय सहभाग दिला. तसेच प्राध्यापक कलाकारांनी सादर केलेला 'करायला गेलो एक' या नाटकाचा प्रयोग सादर केला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही 'महाविद्यालयांतर्गत संगीत स्पर्धा' संयोजित केली होती. सदर स्पर्धेत यश मिळविणाऱ्यांची नावे खालीलप्रमाणे :–

## वरिष्ठ महाविद्यालय :

### ० चित्रपट–गीते

| | | |
|---|---|---|
| मंजिरी सोवनी | : | प्रथम क्रमांक |
| विनोद कालेकर | : | द्वितीय क्रमांक |
| अजय जगदाळे | : | तृतीय क्रमांक |

### उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके

किरण चौहान, वैदेही वाकडे, भाग्यश्री भागवत.

### ० भावगीत

| | | |
|---|---|---|
| विनोद कालेकर | : | प्रथम क्रमांक |
| अजय जगदाळे | : | द्वितीय क्रमांक |

### उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके

नलिनी पाटील, मंजिरी सोवनी.

### वाद्यसंगीत

| | | |
|---|---|---|
| आनंद करंदीकर | : | प्रथम क्रमांक |
| अतुल कुलकर्णी | : | द्वितीय क्रमांक |

## कनिष्ठ महाविद्यालय

### ० चित्रपट गीते

एम्. पी. राज : प्रथम क्रमांक
अपर्णा वरेकर : द्वितीय क्रमांक
जितेंद्र कुलकर्णी : तृतीय क्रमांक

**उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके**

माधुरी देशमुख, वैशाली पुणेकर, लीला श्रोत्री, प्रशांत डाकलिया.

**भावगीत**

समीर ओक : प्रथम क्रमांक
मंजिरी देशपांडे : द्वितीय क्रमांक

**उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके**

माधुरी देशमुख, लीना श्रोत्री.

### ० वाद्यसंगीत

जितेंद्र कुलकर्णी : प्रथम क्रमांक
अतुल नडे : द्वितीय क्रमांक

**उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके**

संदीप नाईक, केशर मराठे.

### ० नाट्यसंगीत

मंजिरी देशपांडे : प्रथम क्रमांक

वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नाट्यसंगीत, भावगीत व वाद्यसंगीत विभागातील प्रत्येक प्रथम क्रमांकास सौ. अमृता सातभाई यांनी ठेवलेले कै. सरस्वतीबाई अनंत पेडणेकर पारितोषिक समान विभागून दिले जाईल. या स्पर्धेसाठी सौ. कल्याणी नामजोशी व सौ. अनुराधा पाठक यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांचे मनःपूर्वक आभार.

दरवर्षीप्रमाणे यंदाही महाविद्यालयांतर्गत नाट्यवाचन, नाट्याभिनय, कथाकथन, एकांकिका स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. या स्पर्धेसाठी प्रा. मिलिंद दाते, आनंद मासूर आणि विनीता पिंपळखरे परीक्षक म्हणून लाभले. त्यांचे हार्दिक आभार.

या स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे :

## महाविद्यालयांतर्गत स्पर्धा–निकाल

### ० नाट्यवाचन

**सांघिक पारितोषिके** :– प्रथम क्रमांक : साडी उडाली आकाशी, द्वितीय क्रमांक :–
(वरिष्ठ महाविद्यालय) – भिंत, तृतीय क्रमांक – उन्हाळ्यातील पाऊस.
(कनिष्ठ महाविद्यालय) – प्रथम क्रमांक, भोवरा, द्वितीय क्रमांक – मीरा मधुर,

**वैयक्तिक पारितोषिक**

वरिष्ठ महाविद्यालय (मुले) – प्रथम क्रमांक व श्री. विकास पेशवे पारितोषिक ० : गिरीष कांबळे
द्वितीय क्रमांक : श्रीपादराज आमले

| | | |
|---|---|---|
| (मुली) | प्रथम क्रमांक व श्री. विकास पेशवे पारितोषिक ० | : रेवती घोपेश्वरकर |
| | | : तेजश्री आठवले |
| | द्वितीय क्रमांक | : वसुधा एरंडे |
| | तृतीय क्रमांक | : राजश्री देशमुख |
| | उत्तेजनार्थ | : अनिता नगरे |
| कनिष्ठ महाविद्यालय | प्रथम क्रमांक व श्री. विकास पेशवे पारितोषिक ० | |
| (मुली) | | : अनिरुद्ध खुटवड |
| (मुली) | प्रथम क्रमांक व श्री. विकास पेशवे पारितोषिक | |
| | | : मंजुषा भारद्वाज |
| | द्वितीय क्रमांक | : अपर्णा वरेकर |
| | तृतीय क्रमांक | : अंजली जोशी |
| | उत्तेजनार्थ | : मृदुला फाटक |

**० नाटयाभिनय**

वरिष्ठ महाविद्यालय : प्रथम क्रमांम, सुप्रिया देशपांडे, द्वितीय क्रमांक गिरीश कांबळे, तृतीय क्रमांक – प्रतिभा माने.

कनिष्ठ महाविद्यालय : प्रथम क्रमांक – महेंद्र कांबळे, द्वितीय क्रमांक – अंजली जोशी.

**० कथाकथन**

वरिष्ठ महाविद्यालय : प्रथम क्रमांक – मकरंद टिल्लू, द्वितीय क्रमांक – नितिन निकम.

कनिष्ठ महाविद्यालय : प्रथम क्रमांक – परेश मोकाशी.

**० एकांकिका : सांघिक पारितोषिके**

| | | |
|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय : | प्रथम क्रमांक, कै. विजय पाटोळे–करंकड आणि कै. माई भिडे पारितोषि क रु. ५१ /– | आमचंही कुऽकुचकू |
| | द्वितीय क्रमांक | बिन पैशाचा तमाशा |
| कनिष्ठ महाविद्यालय : | प्रथम क्रमांक, सिबिकॉय करंडक आणि कै. माई भिडे पारितोषिक रु. ५१/– | हम नही सुधरेंगे |
| | द्वितीय क्रमाक | एक राणी दोन गुलाम |
| | तृतीय क्रमांक | पूर्वज. |

**वैयक्तिक पारितोषिके**

| | | | |
|---|---|---|---|
| रिष्ठ महाविद्यालय | (मुले) | प्रथम क्रमांक व प्रा. अतुल देशपांडे पारितोषिक | श्रीधर विसाळ |
| | | द्वितीय क्रमांक सुनील होवाळे, तृतीय क्रमांक पराग चौधरी | |
| | (मुली) | प्रथम क्रमांक व प्रा. अतुल देशपांडे पारितोषिक | प्रमिला धिवार |
| | | द्वितीय क्रमांक | मनीषा जोशी |
| | | उत्तेजनार्थ – विवेक थावरे, भारत परदेशी. | |
| कनिष्ठ महाविद्यालय | (मुले) | प्रथम क्रमांक, प्रा. अतुल देशपांडे पारितोषिक ० प्रा. वैशंपायन पारितोषिक रु. २५ /– | जयंत गोसावी |
| | | द्वितीय क्र. सिकंदर सैय्यद, तृतीय क्र. संदीप साकीरे | |
| | (मुली) | प्रथम क्रमांक आणि प्रा. अतुल देशपांडे पारितोषिक ० | कल्पना जोशी |
| | | द्वितीय क्रमांक | वीना इजंनकर |
| | उत्तेजनार्थ | प्रसाद झेंडे, राजेश शिरोडकर, नरेश मोकाशी. | |

## संपूर्ण स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

सर्वोत्कृष्ट अभिनेता
व
प्रा. विनोद छाब्रा यांनी ठेवलेले — परेश मोकाशी
कै. जुगलदास छाब्रा पारितोषिक रु. २५ /–

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री
व
प्रा. विनोद छाब्रा यांनी ठेवलेले — रेवती धोपेश्वरकर
कै. जुगलदास छाब्रा पारितोषिक रु. २५ ।–

महाविद्यालयाच्या कलामंडळाची शिष्यवृत्ती रु. ५१ – अजय जगदाळे यांस संगीत स्पर्धांसाठी उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे देण्यात आली तर नाट्य विभागात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कलामंडळ शिष्यवृत्ती रु. ५१– श्रीपादराज आभळे या विद्यार्थ्यास देण्यात आली.

महाविद्यालयांतर्गत स्पर्धांसाठी पारितोषिके ठेवणारे प्रा. बाळासाहेब भिडे, श्री. बिपिन पाटोळे, प्रा. विनोद-कुमार छाब्रा, प्रा. सौ. अमृता सातभाई, प्रा. अतुल देशपांडे, प्रा. सुधीर वैशंपायन, श्री. विकास पेशवे यांचे आम्ही ऋणी आहोत.

कलामंडळाला नेहमीच सहकार्य करणारे प्राचार्य, उपप्राचार्य, कलामंडळ प्राध्यापक सदस्य, इतर प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सेवकवर्ग, विद्यार्थी कलाकार व प्रेक्षक, सर्व विद्यार्थी प्रतिनिधी यांचे मन:पूर्वक आभार.

आम्हाला नेहमी मार्गदर्शन करणारे डॉ. वि. भा. देशपांडे आणि सर्वतोपरी मदत करणारे प्रा. जयंत जोर्वेकर यांचे विशेष आभार.

कलाडमंळाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ दि. १७ फेब्रुवारी १९८७ रोजी मा. शिक्षण उपसचाल्क, श्री. सेवेकरी यांचे अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे, सुप्रसिद्ध अभिनेते श्री. दीनानाथ टाकळकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**श्री. सुहास अथने** — **राजीव कुलकर्णी**
सचिव, कलामंडळ — प्रमुख कलामंडळ

## वक्तृत्व व वादविवाद मंडळ

यावर्षी वादविवाद मंडळाचे उद्‌घाटन लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानाने झाले. व्याख्याते होते सुप्रसिद्ध विनोदी लेखक, वक्ते प्रा. द. मा. मिरासदार.

१९८६–८७ या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागांतील विद्यार्थ्यांनी आंतर महाविद्यालयीन स्तरावरील वक्तृत्व, वादविवाद, सामान्यज्ञान, निबंध लेखन, काव्य–लेखन–वाचन, कथाकथन या स्पर्धात उत्साहाने भाग घेतला. या स्पर्धांमधील आपल्या स्पर्धकांचा सहभाग निश्चितच स्पृहणीय होता. प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर, प्रा. यशवंत सुमंत, प्रा. सीताराम रायकर, प्रा. सुनील दाढे यांनी स्पर्धकांना केलेल्या मार्ग, दर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार. कलामंडळातील अन्य सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी वर्ग-ग्रंथाल्य विभाग यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

१) श्री फुलचंद बाळचंद कर्नावट करंडक वादविवाद स्पर्धा, पुणे. सांघिक करंडक विजेता संघ.
   १. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–प्रथम कमांक, १५० रु. रोख.
   २. कु. मेघना मधुमिलिंद देशपांडे, द्वि. व. शास्त्र–उत्तेजनार्थ

२) स्वा. सावरकर वाङ्मय वक्तृत्व मंडळ, पुणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा. (कनिष्ठ महाविद्यालयस्तर) विजेत्या करंडकाची मानकरी
   १. कु. जया मृथा, १२ वी कला. प्रथम क्रमांक, ७० रु. रोख

३) स्वा. सावरकर वाङ्मय वक्तृत्व समिती, पुणे आयोजित आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा.
 १. कु. जया मुथा, १२ वी कला–तृतीय पारितोषिक, २०० रु. रोख
 २. कु. मेघना मधुमिलिंद देशपांडे, द्वि. व. शास्त्र–उत्तेजनार्थ
४) कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धा, बारामती
वैयक्तिक फिरत्या चांदीच्या ढालीची मानकरी
 १. कु. मेघना मधुमिलिंद देशपांडे, द्वि. व. शास्त्र–प्रथम क्रमांक, ४९३ रु. रोख
 २. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–उत्तेजनार्थ
५) कविवर्य मोरोपंत वादविवाद स्पर्धा, बारामती
चांदीची फिरती ढाल विजेता संघ–प्रथम क्रमांक
 १. कु. मेघना मधुमिलिंद देशपांडे, द्वि. व. शास्त्र–प्रथम क्रमांक, २८३ रु. रोख
 २. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–उत्तेजनार्थ
६) कै. वसंतराव करमरकर स्मृती वक्तृत्व स्पर्धा, पुणे.
 १. कु. जया मुथा, १२ वी कला–प्रथम क्रमांक रु. २५१/– रोख
 २. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला
 ३. श्री. पुरुषोत्तम पाटील, १२ वी कला
७) डॉ. आंबेडकर मेडिकोज असोसिएशन, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे द्वारा आयोजित आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा
 १. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–उत्तेजनार्थ
 २. श्री. विनायक सूर्यकांत पारखी, प्र. व. शास्त्र–उत्तेजनार्थ
 ३. कु. जया मुथा, १२ वी कला–उत्तेजनार्थ
८) दीनदयाळ प्रबोधिनी (पुणे) आयोजित पं. दीनदयाळ उपाध्याय स्मृती आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा–
 १. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–द्वितीय क्रमांक रु. २०१/–
 २. श्री. मकरंद मधुकर टिल्लू, द्वि. व. वाणिज्य
९) 'फिनिक्स' पुणे द्वारा आयोजित वादस्पर्धा
 १. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–तृतीय क्रमांक रोख १५० रु.
 २. श्री. सदानंद वसंत दाते, तृ. व. वाणिज्य
१०) म. फुले मंडळ, पुणे आयोजित आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा
 १. जया मुथा, १२ कला–द्वितीय क्रमांक रु. ५१ रोख
 २. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–तृतीय क्रमांक रु. २५ रोख
११) बुद्धिप्रामाण्यवादी मंच, पुणे आयोजित आगरकर स्मृती वादस्पर्धा
 १. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला
 २. कु. जया मुथा, १२ वी कला
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी मानव्य–वाणिज्य महाविद्यालय पुणे आयोजित आंतर महाविद्यालयीन हिंदी वक्तृत्व स्पर्धा
 १. कु. मंजुला काशीलाल भारद्वाज, ११ वी शास्त्र
१३) श्री संतदर्शन मंडळ, पुणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा
 १. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–तृतीय क्रमांक रु. ५१/– रोख
 २. श्री. विनायक सूर्यकांत पारखी, प्र. व. शास्त्र
 ३. श्री. नरेंद्र अंबादास भागवत, द्वि. व. वाणिज्य

१४) न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वाद स्पर्धा, पुणे
१. श्री. दाते सदानंद वसंत, तृ. व. वाणिज्य
२. कु. देशपांडे मेघना मधुमिलिंद, द्वि. व. शास्त्र

१५) मराठी साहित्य सभा, मुंबई आयोजित आंतर महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धा– 'व्यासमुनींची चांदीची मूर्ती' फिरत्या करंडकाचा मानकरी संघ
१. परेश श्याम मोकाशी, १२ वी कला, प्रथम क्रमांक रु. २०१ रोख
२. श्री. मकरंद मधुकर टिल्लू, द्वि. व. वाणिण्य, सहभाग

१६) शिवसेना शाखा दापोडी, आयोजित वक्तृत्व स्पर्धा
१. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–प्रथम क्रमांक रु. १०१ रोख सुवर्णपदक

१७) लोकसंख्या नियंत्रण मंडळ, पुणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा
१. श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला–द्वितीय क्रमांक रु. १०१ रोख
२. श्री. नरेंद्र अंबादास भागवत, द्वि. व. वाणिज्य

१८) श्री संतदर्शन मंडळ, पुणे आयोजित निबंध स्पर्धा
१. अनिता चं. नगरे, तृ. व. वाणिज्य–द्वितीय क्रमांक रु. ७५ रोख
२. कु. वसुधा जोशी, तृ. व. वाणिज्य
३. कु. वर्षा चंद्रकांत दीक्षित, प्र. व. वाणिज्य

१९) नारी समता मंच, पुणे आयोजित निबंध स्पर्धा
१. वसुधा प्रभाकर जोशी, तृ. व. वाणिज्य–उत्तेजनार्थ

२०) मुक्तांगण ज्ञानदीप मंडळ, राजगुरुनगर (पुणे) आयोजित खुल्या काव्यवाचन स्पर्धा
१. श्री. मकरंद मधुकर टिल्लू, द्वि. व. वाणिज्य–प्रथम क्रमांक रु. ५१ रोख
२. श्री. परेश श्याम मोकाशी, १२ वी कला

२१) मुक्तांगण ज्ञानदीप मंडळ, राजगुरुनगर (पुणे) आयोजित खुल्या कथाकथन स्पर्धा
१. श्री. परेश श्याम मोकाशी, १२ वी कला–तृतीय क्रमांक रु. २१ रोख
२. श्री. मकरंद मधुकर टिल्लू, द्वि. व. वाणिज्य–उत्तेजनार्थ रु. ११ रोख

२२) भारती विद्यापीठ, पुणे आयोजित आंतर महाविद्यालयीन सामान्यज्ञान स्पर्धा
१. कु. वर्षा चंद्रकांत दीक्षित, प्र. व. वाणिज्य

२३) श्री जैन युवक मंडळ, नाशिक आयोजित आंतर महाविद्यालयीन कथाकथन व काव्यवाचन स्पर्धा
१. श्री. परेश श्याम मोकाशी, १२ वी कला–सहभाग
२. श्री. मकरंद मधुकर टिल्लू, द्वि. व. वाणिज्य–सहभाग

२४) बी. वाय्. के. वाणिज्य महाविद्यालय नासिक आयोजित आंतर महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धा
१. श्री. मकरंद मधुकर टिल्लू, द्वि. व. वाणिज्य
२. श्री. संदीप शरद बक्षी, तृ. व. वाणिज्य

२५) पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर आयोजित शारदा करंडक आंतर महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धा
१. श्री. सदानंद वसंत दाते, तृ. व. वाणिज्य
२. श्री. संदीप शरद बक्षी, तृ. व. वाणिज्य

**प्रा. गीताराम गायकवाड**
कार्याध्यक्ष

# मॉम

या शैक्षणिक वर्षातील 'मॉम'ची वाटचाल आपल्या नेहमीच्या परंपरेला साजेशीच होती. 'मॉम' या विद्यार्थीप्रिय भित्तीपत्रकाचे यांवर्षी एकूण चार अंक प्रसिद्ध करण्यात आले. त्यापैकी दोन अंक हे विशेष लक्षणीय ठरले. पहिल्या सत्रातील मादक पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम सांगणारा मॉमचा विशेषांक व दुसऱ्या सत्रातील भटक्या आणि विमुक्त जाती–जमातीविषयीचा खास अंक ह्या दोन्ही अंकांचा या संदर्भात विशेष उल्लेख करावा लागेल.

अंकाची सजावट, मुखपृष्ठ, लेखन इ. साठी सर्वश्री हर्षवर्धन पिंजरकर, कु. सुवर्णा गुर्जर, कु. नंदे एस्. एस्.–सर्व प्रथम वर्ष कला; श्री. किशोर ढमाले, बारावी कला, कु. वसुधा जोशी, तृतीय वर्ष वाणिज्य या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले. या सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या सहकार्याशिवाय 'मॉम'ची यशस्वी वाटचाल झालीच नसती. या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

**शक्ती शिंदे**
प्र. व. वाणिज्य (सचिव)

**प्रा. यशवंत सुमंत**
**प्रा. नयना कुलकर्णी**
(सल्लागार)

# राष्ट्रीय सेवा योजना

पुण्यातील 'रम्यमुठा' या प्रकल्पाचा शुभारंभ ओंकारेश्वराच्या परिसरात मॉडर्न महाविद्यालयाने केला. या प्रसंगी पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरु मा. डॉ. वि. ग. भिडे यांचे हस्ते झालेला वृक्षारोपणाचा शुभारंभ विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर ठरला. या प्रकल्पाबरोबरच महाविद्यालयाचा प्रकल्प 'रम्य देऊळे' ओंकारेश्वराच्या देऊळाचा परिसर रम्य करण्यापासून आरंभ झाला. ओंकारेश्वराच्या परिसरातील तरुण मंडळाने या कामी पुढाकार घेतला. नगरसेवक मा. विजय काळे, मा. गिरीश बापट आदींनी या योजनेत लक्ष घालून लक्षणीय रम्यता त्या परिसराला प्राप्त झाली आहे. रम्यमुठेचा प्रकल्प पुणे महानगरपालिकेने मनावर घेतला आणि नटराज थिएटरचे मागील परिसरात पुलाची वाडी येथे कुंपण घालून मा. आयुक्त देवव्रत मेहता यांच्या हस्ते व उपस्थितीत मनपाचे उद्यान अधीक्षक यांच्या नियोजनाने रम्यमुठा प्रकल्पाचा मागोवा आणि चालना मिळाली. या ठिकाणाची व्यवस्थासुद्धा मॉडर्न महाविद्यालयाकडे सोपविण्यात आली. पुणे विद्यापीठाचे रा. से. योजनेचे संचालक व संयोजक डॉ. एस. डी. पाटील यांनी या व्यवस्थापनेची प्रेरणा दिली.

शासनाच्या धोरणानुसार आणि काळाची पाऊले लक्षात घेऊन मध्यवर्ती शासनाचा अनौपचारिक शिक्षणाबद्दलच्या नव्या अंमलबजावणीत मॉडर्न महाविद्यालयाचे एकक पाऊल पुढेच राहिले. पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या एक दिवसाच्या शिबिरात ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. महाविद्यालयात अनौपचारिक शिक्षण प्रकल्पातील विद्यार्थ्यांच्या गटाचे एक दिवस शिबीर महाविद्यालयात आयोजित केले होते. अनौपचारिक शिक्षण प्रकल्पासाठी महाविद्यालयाशेजारील पोलीस वसाहतीची निवड केली आहे. या वसाहतीत जाऊन विशेषत: स्त्रियांशी संपर्क साधून सर्वेक्षण आणि शिक्षणाचे बाबतीत तृतीय वर्ष वाणिज्यच्या कु. राजश्री वसंत देशमुख आणि कु. मेधा प्रभाकर जोशी यांनी मोठी चिकाटी आणि उत्साह दाखविला.

शहरातील विविध महाविद्यालयातील कार्यक्रमांसंबंधीची चर्चा आणि नियोजनासाठीची रा. से. योजनेच्या कार्यक्रमाधिकाऱ्यांची बैठक आमचे महाविद्यालयात सपन्न झाली.

कार्यक्रमाधिकारी प्रा. बा. गो. वाणी यांना पाच राज्यांच्या विभागीय बैठकीस अहमदाबाद येथे राज्यमंत्री मा. सौ. मार्गरिट आल्वा यांचे मार्गदर्शनासाठी पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्याची, महाराष्ट्र राज्य पातळीवरील अहमदनगर येथे झालेल्या मादक द्रव्ये प्रतिबंध मोहीम प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्याची तसेच महाराष्ट्र पातळीवरील अनौपचारिक शिक्षण प्रशिक्षणासाठी पुणे येथील 'इंडियन इन्टिटयूट'मध्ये संपन्न झालेल्या चर्चासत्रात सहभागी होण्याची संधी विद्यापीठाने दिली.

पुणे विद्यापीठाने विद्यापीठ पातळीवरील विद्यार्थी-विद्यार्थिनींचे विशेष नेतृत्व शिबीर आयोजित करण्यास दुसऱ्यांदा परवानगी दिली. या शिबिरात पाच जिल्ह्यातील ५२ महाविद्यालयातून २२९ विद्यार्थी सहभागी झाले होते. कोणत्याही जिल्ह्याचे प्रतिनिधी कार्यक्रमाधिकारी न येणे, आमच्या महाविद्यालयातील सौ. गोडबोले यांचे दुःखद निधन, श्री. थोपटे बन्धुचे दुःखद निधन, पुणे बंद, पुणे परिसरातील गारपीट पाऊस आणि कडाक्याची थंडी तसेच अपेक्षेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग इत्यादी प्रतिकूल परिस्थितीतही ग्रामीण भागातील खऱ्या अर्थाने भरगवयाचे या रा. से. योजनेच्या उद्देशास अनुसरून शिबीर यशस्वी केले. या शिबीरात मा. बाळासाहेब भारदे, श्री. अण्णासाहेब हजारे यांची उपस्थिती आणि मार्गदर्शन विशेष उल्लेखनीय होते. रां. से. योजनेच्या अधिकाऱ्यांमध्ये केंद्रीय शासनाचे प्रादेशिक विभागीय सल्लागार प्रा. पी. जी. जावळगी, पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालक आणि रा. से. योजनेचे संयोजक डॉ. एन्. डी पाटील यांची भेट शिबिराला मार्गदर्शक प्रोत्साहनपर होती. महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे भाषण आणि प्राध्यापकांच्या भेटी शिबिराचे चैतन्य ठरल्या. श्रमदान व्याख्याने, चर्चा भेटी ग्रामोद्धार असे विविध कार्यक्रम या शिबिरातील ठळक वैशिष्टचे होती. पुण्याचे आंतरदेशीय वैशिष्टच राष्ट्रीय सुरक्षा प्रबोधिनी आणि पुणे दर्शनचे शिबिरार्थ्यांना विशेष आकर्षण वाटले.

मौजे खडकवाडी, ता. हवेली, जिल्हा पुणे हे सिंहगड परिसरातील निसर्गरम्य पार्श्वभूमीने नटलेले नवीन ग्रामीण कार्यक्षेत्र. यंदाच येथे आम्ही कार्याला आरंभ केला. येथील महाविद्यालयीन शिबीर विद्यापीठ शिबिराचे पूर्वतयारीसाठी आणि शिबीर उद्देश पूर्तीसाठी आयोजित केले होते. विद्यार्थी संख्येचा या वर्षीचे शिबिरात उच्चांक होता. दोन्ही विशेष शिबिरे बेस्टचे माध्यमिक विद्यालयाचे आवारात आणि परिसरात आयोजित करण्यात आली होती. या आयोजनात प्रि. द. ग. नेर्लेकर आणि त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. चवळे व अन्य सहकारी तसेच गावचे सरपंच मा. काकासाहेब ढमढेरे आणि उपसरपंच मा. तात्यासाहेब तागुंदे यांचा मोठा वाटा होता. या शिबिरात शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पाण्याची टाकी आणि वीज नव्याने मिळवून दिली. गाव व शाळा यांच्यासाठी उपयोगी रस्ता दुरुस्त करून देण्यात आला.

महाविद्यालयीन कार्यक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी महाविद्यालयेतर कार्यक्रमातही मोठा सहभाग दिला. लोणावळा येथे झालेल्या जिल्हा पातळीवरील शिबिरात श्री. राजेंद्र पिंगळे, श्री. अनिप हलपती, कु. फरिदा सय्यद कु. हेमलता हंडेदेशमुख व कु. शैलजा पिरंगुटे या विद्यार्थ्यांनी सहभाग दिला. तेथील संयोजनात प्रसंशनीय वाटा उचलला. पुण्याच्या एस्. एन्. डी. टी. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या व्यक्तित्व विकास शिबिरात कु. ज्योत्स्ना शिदीड सहभागी झाली होती. दारूबंदी सप्ताहानिमित्त झालेल्या कार्यक्रमात श्री. जयकुमार कोटेचा आणि श्री. माणिक रायकर यांनी प्रशिक्षण घेतले. राष्ट्रीय पातळीवरील कानपूर येथे झालेल्या 'गंगा सेवा विशेष शिबिरात पुणे विद्यापीठीय पथकाचे नेतृत्व श्री. राजेंद्र पिंगळे याने केले. शिबिरातील सहभागाबरोबरच तेथील स्पर्धापैकी 'फॅन्सी ड्रेस शो' व 'भजन' या दोन्हींत प्रथम पारितोषिकाचा मान पटकावला आणि पुणे विद्यापीठाचा लौकिक वाढविला.

नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त यंदाचे वर्षी नव्याने स्वामी विवेकानंद जयंती आणि रा. से. योजना दिन साजरा केला. कार्यात्मक साक्षरता आणि अंमली पदार्थ विरुद्ध मोहीम हे नवे प्रकल्प हाती घेण्यात आले. शासकीय मनोरुग्णालय, मुलांचे रिमांड होम, जीवन ज्योती मंडळाची मतिमंदासाठीची शाळा, महिला सेवाग्राम अशा सेवाभावी संस्थातून जाऊन सांस्कृतिक कार्यक्रम, मदत इ. कार्यक्रम केले. 'आजच्या सामाजिक समस्या आणि त्यांची कारणमीमांसा' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

पुणे विद्यापीठ परिसरात सौंदर्यात आम्ही दरवर्षी भर घालतो. या उपक्रमात यंदा पदार्थविज्ञान विभागासमोरील बागेला एककाने साजेसे सौंदर्य आणून दिले. त्याचबरोबर औंध येथील आय. आय. टीचे आवारातील शासनातर्फे नियोजन करण्यात आलेल्या वृक्षरोपणाचे कार्यक्रमात मोठा सहभाग दिला.

**श्री. जयकुमार कोटेचा**
**कु. फरिदा सय्यद**
विद्यार्थी नायक प्रमुख

**प्रा. बा. गो. वाणी**
कार्यक्रमाधिकारी

# शास्त्र संघटना

यदाचे वर्षी शास्त्र संघटनेचे उद्घाटन प्रा. डॉ. दिलीप देवबागकर ( प्राणीशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ ) यांच्या हस्ते दिनांक २५ ऑगस्ट १९८६ रोजी झाले. या प्रसंगी झालेल्या भाषणात डॉ. देवबागकर यांनी पुणे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात नव्यानेच सुरू झालेल्या 'जैवतंत्रविज्ञान' (बायोटेक्नॉलॉजी) याविषयीची प्राथमिक माहिती देऊन त्याची उपयुक्तता आणि गरज पटवून दिली.

२० डिसेंबर १९८६ रोजी 'वूल रिसर्च इन्स्टिटयूटच्या' डॉ. शालिनी पटवर्धन यांनी कॉम्प्युटर हा टेक्सटाईल डिझाईनिंगमध्ये वेगवेगळया आकाराचे, प्रकाराचे आणि रंगांचे डिझाईन बनवू शकतो हे 'कॉम्प्युटर एडेड टेक्साटाईल डिझाईन' ह्या व्याख्यानाद्वारे आणि रंगीत, मनमोहक पारदर्शिकांच्या सहाय्याने दाखवून दिले. व्याख्यान अतिशय उपयुक्त आणि सुरेख झाले. हे व्याख्यान आयोजित करण्यासाठी भौतिकशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. देऊसकर यांनी पुढाकार घेतला.

दुसऱ्या सत्रात शास्त्र संघटनेतर्फे शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेसाठी विविध प्रकारचे ६ विषय दिले होते, शास्त्र संघटनेच्या वतीने प्रत्येक शाखेमध्ये विशेषकरून तृतीय वर्ष शास्त्र विद्यार्थ्यासाठी काही व्याख्याने विभागप्रमुखांनी आयोजित केली होती. त्यांचा संक्षिप्त आढावा.

१. **विभागीय कार्यक्रम** (रसायनशास्त्र)

रसायनशास्त्र विभागाने आपल्या कॉलेजचा माजी विद्यार्थी श्री. रविंद्र जोशी याचे 'अल्डोल कन्डेन्सेशन' यासंबंधीचे महत्त्वपूर्ण आणि उद्बोधक व्याख्यान आयोजित केले होते.

२. **विभागीय कार्यक्रम** (भौतिकशास्त्र)

१) इंडियन फिजिक्स असोसिएशन (पुणे विभाग) यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या 'क्विझ कॉंपिटिशन'मध्ये भौतिकशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

२) यावर्षी शास्त्र संघटनेच्या सहकार्याने 'इंडियन फिजिक्स असोसिएशन' तर्फे होणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन व्याख्यानस्पर्धा आपल्या महाविद्यालयांत घेतल्या गेल्या. आपल्या कॉलेजचा विद्यार्थी श्री. रविंद्र बोडाडे यास द्वितीय पारितोषिक मिळाले.

३. पुणे विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील डॉ. दिलीप जोग आणि डॉ. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे 'अॅडव्हान्स्ड मायक्रोस्कोप' या विषयावरील व्याख्याने आयोजित केली आहेत.

३. **विभागीय कार्यक्रम** (वनस्पतीशास्त्र)

तृतीयवर्ष विद्यार्थ्यांसाठी खालील व्याख्याने आयोजित केली.

१) डॉ. विजय रानडे ( प्राध्यापक, गरवारे महाविद्यालय ) यांनी 'मिक्झोमायसिटस्' या विषयावर व्याख्यान दिले.

२) डॉ. सुरेश बोंडे ( संशोधन अधिकारी, विज्ञान वर्धिनी ) 'अॅप्लीकेशन ऑफ पॅलीओबॉटनी इन ऑईल अॅंड कोल' या क्लिष्ट विषयावर अत्यंत सोप्या भाषेत व्याख्यान दिले.

४. **विभागीय कार्यक्रम** (प्राणीशास्त्र)

१) तृतीय वर्ष शास्त्र विद्यार्थ्यांसाठी प्राणीशास्त्रावरील एक उपयुक्त व्याख्यान आणि अभ्यास सहल आयोजित केली आहे.

२) प्रथम वर्ष शास्त्र ते तृतीय वर्ष शास्त्र विद्यार्थ्यांसाठी जानेवारी महिन्यात जीवशास्त्रविषयक ५ फिलमस् दाखविण्यात आल्या. त्याद्वारे सागरी जलचर आणि त्यांचे जीवन, पर्यावरण, प्रदुषणाचे दुष्परिणाम या विषयीची महत्त्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. या फिलमस् नौरोजी वाडिया कॉलेजच्या प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी आणि त्यांचे सहकारी प्रा. मुकुंद ओक यांचे सौजन्याने प्राप्त झाल्या.

५. **विभागीय कार्यक्रम** (भूगोल विभाग)

१) शास्त्र संघटनेच्या भूविज्ञान शाखांतर्गत या वर्षातील कार्यक्रमाचा भाग म्हणून प्रथमवर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी 'अरथ अॅंड एन्व्हायरन्मेंट' या सदरासाठी माहितीपूर्ण लेख असलेली अद्ययावत कात्रणे सादर

करून भूवैज्ञानिक माहिती संकलित केली. श्री. गोरडे टी. आर. या विद्यार्थ्याने विशेष कष्ट घेऊन 'झू–जिऑग्राफीकल रिजन्स ऑफ द अरथ' हा नकाशा तयार केला.

२) द्वितीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी 'पर्यावरणशास्त्र' या नवीन सुरू झालेल्या विषयातील दुर्मिळ परंतु उपयुक्त तक्ते व आकृत्यांचे आरेखन केले. प्रा. अहिरराव यांनी या कामी खालील विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

१) आशिष भोळे – **'फॉसील फ्युएल्स्**
२) कु. सीमा सवाई – **रिन्युएबल रिसोंसेस**
३) कु. अंजली वेदपाठक – **ट्रॉफीक चेन्स–फूड वेब**
४) कु. अलका कुलकर्णी – **कार्बन सायकल**
५) कु. मेधा देशपांडे – **एकोसिस्टीम स्ट्रक्चर**
६) कु. विजया साठे – **एन्हायरन्मेंटल मॅनेजमेंट**
७) सुजाता शेंबडे – **पोल्युशन**
८) संजय वाकुडे – **एकोसिस्टीम फंक्शन्स**

हे तक्ते तयार करताना दिनेश धीमण, सतीश गौरोजी आणि सुनील पवार यांचे सहाय्य झाले.

६. **विभागीय कार्यक्रम** (संख्याशास्त्र विभाग)

१) इंधनसमस्या ही दिवसेंदिवस भयानक स्वरुप धारण करते आहे. रॉकेल, कोळसा, लाकूड, गॅस इत्यादी जळणांना पर्याय शोधण्याची वेळ आलेली आहे. विद्युत् शेगडी हा एक उपाय आहे पण तो सर्वसामान्य जनतेला न परवडणारा ! या समस्येवर तोडगा म्हणून आज सूर्यशक्तीकडे पाहिले जाते. विशेषतः भारतासारख्या देशात सूर्यप्रकाश सरासरी आठ महिने मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊ शकतो. या सूर्यशक्तीचा उपयोग जास्तीत जास्त प्रमाणात करून घेता येईल या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने तीन वर्षापूर्वीपासून सूर्यचुलीचे उत्पादन सुरू केले.

संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबर प्रायोगिक कामांचा अनुभव मिळावा हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन एक पाहणी आयोजित केली होती. पुणे विद्यापीठ संख्याशास्त्र विभागातील डॉ. अनिल गोरे व डॉ. सौ. परांजपे यांनी या कामात पुढाकार घेतला होता. आपल्या महाविद्यालयातील तृतीय वर्ष संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सूर्यचुलीची उपयुक्तता, त्यासंबंधी येणाऱ्या अडचणी, फायदे व तोटे या बाबींवर ग्राहकांकडून माहिती गोळा करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली. संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी घरोघर जाऊन या प्रश्नावली ग्राहकांकडून भरून आणल्या. विद्यार्थ्यांना ग्राहकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. प्रश्नावली भरून आणल्यानंतर मिळालेल्या माहितीचे संगणकाद्वारे संकलन केले. संख्याशास्त्रीय कसोट्या वापरून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करता असे दिसून आले की सूर्यचूल ही निश्चित उपयुक्त व फायद्याची आहे. सूर्यचूलीचा नियमित वापर केल्यास अंदाजे रु. तीस ची जळण बचत महिन्याकाठी होऊ शकते. तथापि या चुलीत अजून बऱ्याच सुधारणा करणे आवश्यक आहे असे अभ्यासगटाच्या पाहणीतून दिसून आले आहे. या नमुना पाहणीच्या सांख्यिक विश्लेषणाचे काम अजून चालू आहे.

२) शास्त्रसंघटनेतर्फे पुणे विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागामध्ये 'मिनीकॉम्प्युटर' व 'मायक्रोसिस्टिम्स' यांच्या माहितीसाठी अभ्याससहल आयोजित केली होती.

३) नियोजित– संख्याशास्त्राचा अनेक क्षेत्रास वापर केला जातो. जीवशास्त्र, उद्योग व व्यवसाय, वाहतूक, वस्तूंच्या किमतींचे निर्देशांक वगैरे बाबतीत संख्याशास्त्रीय पद्धती वापरल्या जातात. विद्यार्थ्यांच्या निदर्शनाला हे आणून देण्यासाठी दोन व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत.

७. **विभागीय कार्यक्रम** (गणित विभाग)

१) 'रोझ अॅन्ड लोरा मॉरीस ट्रस्ट' यांच्या सहकार्याने गणिताच्या तृतीय वर्ष शास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी 'बेसिक', 'फोर्ट्रॅन' या भाषामधील प्रोग्रॅमिंगचे अभ्यासक्रमास पूरक असे प्रात्यक्षिकांचे वर्ग नोव्हेंबर आणि डिसेंबर मध्ये आयोजित केले. सर्व विद्यार्थ्यांनी हे अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केले.

याबाबतीत दिलेल्या सक्रिय सहकार्याबद्दल 'रोझ अॅन्ड लौरा मॉरीस ट्रस्ट'चे विश्वस्त श्री. भागवत, श्री. जोशी, कार्यालयीन व्यवस्थापक श्री. दुबे, निर्देशक श्री. देशपांडे व श्री. दुराके यांचे आम्ही आभारी आहोत.

२) मुंबई आय्. आय्. टी. यांनी २५ जानेवारी रोजी केलेल्या 'गणित ऑलिंपियाड'मध्ये द्वितीय वर्ष शास्त्राचे श्री. संदीप खजुरे आणि श्री. उमेश पोटभरे यांनी भाग घेतला. याच विभागाने आयोजित केलेल्या गणित विषयाच्या निबंध स्पर्धांसाठी श्री, उमेश पोटभरे. श्री. रविंद्र वाकडे आणि श्री तारक रद्दिलकर यांनी निबंध पाठविले आहेत.

३) व्याख्यान– ७ फेब्रुवारी रोजी मॉरिस इलेक्ट्रॉनिक्स कारखान्याचे संस्थापक डॉ. जेनाल्ड मॉरिस यांनी महाविद्यालयास भेट दिली. त्यावेळी त्यांनी 'अमेरिका, भारत आणि कॉम्प्युटर्स' या विषयावर व्याख्यान दिले. त्यानंतर झालेल्या चर्चेत विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने भाग घेतला.

४) नियोजित– पुढील महिन्यामध्ये तृतीय वर्ष शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी टेल्को, पिंपरी येथील कारखान्याच्या संगणक विभागात सहल नेण्याचे योजिले आहे.

संकल्पित– खालील दोन कार्यक्रम फेब्रुवारी आणि मार्चमध्ये करण्याचा मानस आहे–

५) व्याख्यान– विषय ग्राफथिअरी

व्याख्याते– ति. ति. रघुनाथन्, रीडर, गणित विभाग, पुणे विद्यापीठ.

६) गणित विभागास भेट व व्याख्यान–

वक्ते– डॉ. निंबा ठाकरे, गणित विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ.

शास्त्र संघटनेचे विविध कार्यक्रम आखताना उपप्राचार्य प्रा. प. स. चिरपुटकर यांचे बहुमोल मार्गदर्शन झाले. याचबरोबर इतर अनेक सहकारी प्राध्यापकांनी वेळोवेळी मदत करून शास्त्र संघटनेचे कार्यक्रम यशस्वी केले. समारंभाचे वेळी विविध विभागांचे लॅबोरेटरी असिस्टंट आणि त्यांचे सहकारी यांनी सहकार्य केले. त्यामुळे काहीवेळा अत्यंत अल्प सुचनेनंतरसुद्धा कार्यक्रम व्यवस्थित झाले. या सर्वांचे शास्त्र संघटनेचे सदस्य अत्यंत आभारी आहेत.

**डॉ. हे. व. घाटे**
कार्याध्यक्ष

## वाणिज्य संघटना

संघनेतर्फे या शैक्षणिक वर्षात खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**१. भित्तीपत्रक :** या वर्षीच्या कार्यक्रमांची सुरवात प्राचार्य नवलगुंदकर यांनी 'कॉम' या भित्तीपत्रकाचे प्रकाशन दि. १५ ऑगस्ट १९८६ रोजी करून केली. 'कॉम'चे एकूण सहा अंक या वर्षी प्रकाशित करण्यात आले. त्यापैकी एक दिवाळी विशेषांक होता व एका अंकाच्या प्रकाशनाचे सर्व काम कनिष्ठ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले. या वर्षीच्या अंकाची सजावट विशेष उल्लेखनीय होती.

**२. शैक्षणिक भेटी :** विद्यार्थ्यांनी खालील व्यावसायिक संघटनांना भेटी देऊन त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला.

कॉसमॉस सहकारी बँक
मराठा चेंबर ऑफ कॉमर्स
मॉडर्न महाविद्यालय संगणक विभाग
किशोर पंपस् लिमिटेड

**३. प्रकल्प अहवाल स्पर्धा :** कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लघु–प्रकल्प अहवाल स्पर्धा आयोजित करण्यात आली. प्रथम तीन क्रमांकांच्या अहवालास पारितोषिके देण्यात आली.

प्रथम क्रमांक : नीता शहा, माधवी धर्माधिकारी
द्वितीय क्रमांक : अविनाश बचते, ए. व्ही. कुकडे
तृतीय क्रमांक : मनीषा श्रोत्री, आरती नाखे

वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प अहवाल स्पर्धा घेण्यात आली व त्यातीलही प्रथम तीन क्रमांकास पारितोषिके देण्यात आली.

प्रथम क्रमांक : राजश्री देशमुख, शुभदा गोडबोले, मेधा जोशी

द्वितीय क्रमांक ; अनुपमा देशपांडे, शैलजा दुधळे, वैशाली कुलकर्णी, वंदना कुलकर्णी

तृतीय क्रमांक : वैशाली कानडे, संगीता घोडके, शुभदा भोपळे व मेधा फडके, स्मिता आठवले, विदुला देव, वसुधा कवळे

**४. व्यवसाय मार्गदर्शन :** तृतीय वर्ष वाणिज्यमधील विद्यार्थ्यांसाठी त्यांना महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर व्यवसाय शोधण्याच्या बाबतीत मार्गदर्शन व्हावे या दृष्टीने त्या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींच्या व्याख्यानांची मालिका आयोजित केली होती.

श्रीमती नीला काळे—मुलकी सेवा—नोकरीचे एक महत्त्वाचे क्षेत्र

श्री. दत्ता लिमये—उद्योजगता विकास आणि संज्ञापन

श्रीमती लीना मेहेंदळे—स्वयंरोजगार व प्रश्न

श्री. अरुण वाखलू—मुलाखतीचे तंत्र

श्री. नवीन नागरेचा—मुलाखतीची तयारी कशी करावी ?

प्रा. सुधा शाळिग्राम—मानसशास्त्रीय चाचण्या

तसेच गरजू विद्यार्थ्यांना अर्धवेळ काम मिळवून देण्याच्या दृष्टीने लघुउद्योगांशी संपर्क साधण्याची योजना यंदा आखण्यात आली व त्यादृष्टीने प्रारंभिक तयारीस सुरुवात केली आहे. या संदर्भात पुढील वर्षी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले.

औद्योगिक व व्यावसायिक संघटनांतर्फे प्रकाशित होणाऱ्या गृहपत्रिकांसंबंधी एक संशोधन प्रकल्प संघटनेतर्फे हाती घेण्यात आला होता. परंतु त्याविषयी प्राथमिक कामानंतर काही कारणांमुळे पुढे काहीच काम होऊ शकले नाही याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

**५. ग्रंथालय :** याही वर्षी संघटनेतर्फे नवीन पुस्तकांची भर ग्रंथालयात घालण्यात आली व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक पुस्तक वाचनासाठी देण्याची व्यवस्था करण्यात आली. या संदर्भात ग्रंथालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचे आभार.

**६. निरोप समारंभ :** संघटनेच्या वतीने तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम करण्यात आला.

संघटनेचे कार्यक्रम आयोजित करताना ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मदत झाली त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. कार्यालयीन कामाची जबाबदारी श्री. दिलीप खोपकर यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही सांभाळल्याबद्दल त्यांचेही आभार.

**माधवी मित्र**
कार्याध्यक्षा

## साहित्य संघटना

महाविद्यालयाच्या साहित्य संघटनेने यंदा वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केलेले होते. पहिल्या सत्रातील उपक्रमांचा भर प्रामुख्याने पुस्तक चर्चांवर होता. दि. २६ सप्टेंबर १९८६ रोजी सौ. मेधा सिधये यांचे 'माणसं' ( ले. अनिल अवचट ) या पुस्तकावर व्याख्यान झाले. दि. २७ सप्टेंबर १९८६ रोजी संघवी केशरी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. शरद देव यांचे 'पवनाकाठचा धोंडी' ( ले. गो. नी. दांडेकर ) या कादंबरीवर व्याख्यान झाले. दि. ६ ऑक्टोबर १९८६ चे डॉ. वि. भा. देशपांडे यांचे 'सत्तांतर' ( ले. व्यंकटेश माडगूळकर') या कादंबरीवर व्याख्यान झाले.

यंदाच्या उपक्रमांमधील लक्षणीय उपक्रम म्हणजे श्री. अनिल अवचट यांच्या 'गर्द' या पुस्तकावरील चर्चा. हा चर्चेचा कार्यक्रम दि. ३० सप्टेंबर १९८६ रोजी झाला. ११ विद्यार्थ्यांनी चर्चा केल्यावर स्वतः लेखक श्री. अवचट यांनी चर्चेला उत्तर देणारे भाषण केले. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. सौ. स्नेहल वावरे यांनी केले होते.

आणखी एक लक्षणीय उपक्रम म्हणजे वि. वा. शिरवाडकर लिखित 'नटसम्राट' या नाटकावर श्री. यशवंत दत्त यांचे झालेले मार्गदर्शनपर व्याख्यान. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना 'नटसम्राट'च्या संहितेबरोबर प्रयोगाच्या मूल्यमापनाच्या दिशा समजण्यास मदत झाली.

साहित्य संघटनेच्या सहकार्याने हिंदी विभागाने काही कार्यक्रम साजरे केले. विभागाने 'हिंदी दिवस सांस्कृतिक एकात्मता कार्यक्रम या रूपात साजरा केला. विभागाने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत कु. रेखा नारायण ( ११ वी विज्ञान ) आणि कु. जया मुथा ( १२ वी कला ) यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय पारितोषिक मिळाले. यंदा घेतलेल्या स्पर्धेत वैशिष्टच म्हणजे सर्व व्यवस्था स्वत: विद्यार्थ्यांनीच पाहिली होती.

११ जानेवारी १९८७ रोजी साजऱ्या झालेल्या युवक–दिनाच्या दिवशी साहित्य संघटनेतर्फे विवेकानंदांची छायाचित्रे व वचने यांची पोस्टर्स तयार करून महाविद्यालयात प्रकाशित करण्यात आली.

मानसशास्त्र विभागाने यंदा द्वि. व. कला विद्यार्थ्यांसाठी दोन शैक्षणिक सहली आयोजित केल्या होत्या. दि. १० ऑक्टोबर १९८६ रोजी कामायनी येथील मतिमंद मुलांची संस्था आणि दि. २८ जानेवारी १९८७ रोजी येरवडा येथील केंद्रीय मानसिक आरोग्य व संशोधन केंद्र या संस्थांना भेटी आयोजित केल्या होत्या.

दि. २१ व २२ मार्च १९८७ रोजी कै. श्री. म. माटे जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'अर्वाचीन महाराष्ट्रातील जातपातविषयक विचार' या विषयावर राज्यव्यापी स्तरावरील चर्चासत्र घेतले जाणार आहे. चर्चासत्रात महाराष्ट्रातील नामवंत विचारवंत व प्राध्यापक भाग घेणार आहेत. या चर्चासत्राचे नियोजन प्रा. यशवंत सुमंत करीत आहेत.

**डॉ. दत्तात्रय पुंडे**
कार्याध्यक्ष

## नियोजन चर्चा मंडळ

नियोजन चर्चा मंडळाचे औपचारिक उद्घाटन दि. ९ सप्टेंबर १९८६ रोजी बँक ऑफ महाराष्ट्रचे सर व्यवस्थापक श्री. एस. एम. चिटणीस यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी श्री. चिटणीस यांचे 'आर्थिक विकासातील बँकांचा कार्यभाग' या विषयावर माहितीपूर्ण आणि उपयुक्त व्याख्यान झाले, या औपचारिक उद्घाटनापूर्वीच नियोजन चर्चा मंडळाचे प्रत्यक्ष कार्य सुरू करण्यात आले होते. बँकांच्या प्रत्यक्ष कामकाजाचे अवलोकन करता यावे आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील बँकिंग विषयाचे अध्ययन सुलभपणे करता यावे यासाठी दि. २० ऑगस्ट १९८६ रोजी 'कॉसमॉस बँके'च्या भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमास पदवी प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांनी विशेष प्रतिसाद दिला.

येत्या शैक्षणिक वर्षापासून पदवी प्रथम वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पुणे विद्यापीठाने अर्थशास्त्र य' वि याचा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वरील अभ्यासक्रम काही प्रमाणात अवघड असल्याचे अर्थशास्त्र विभागातील आम्हा प्राध्यापकांस वाटते. विद्यार्थ्यांना या विषयाचे अध्ययन करण्यासाठी उपयुक्त व्हावे या दृष्टिकोनातून या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी एक **निबंध वाचन मालिका** सुरू करण्यात यावी असे ठरविण्यात आले. पदवी प्रथम वर्ष कला याच वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्याच अभ्यासक्रमातील काही विषय देऊन त्यांना प्रा. सौ. विनीता कुलकर्णी यांनी मार्गदर्शन करून निबध तयार करवून घेतले. या निबंधांचे वाचन वर्गातच विद्यार्थ्यांसमोर करण्यात आले. वाचनानंतर या विषयावर चर्चाही घडवून आणण्यात आली.

अशा पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या निबंध–वाचन–मालिकांचा या वर्गातील तसेच पदवी तृतीय वर्ष कला (सत्र पद्धती) याही विद्यार्थ्यांना अतिशय उपयोग झाला. या निबंध वाचन मालिकांचा तपशील पुढीलप्रमाणे–

| | दिनांक | विषय | मार्गदर्शक प्राध्यापक |
|---|---|---|---|
| १) | २४–९–८६ | निसर्गवादाचे तत्त्वज्ञान | प्रा. मुकुंद महाजन |
| २) | २६–९–८६ | व्यापारवादाची मूलतत्वे | प्रा. सौ. विनिता कुलकर्णी |
| ३) | २७–९–८६ | सनातनवादी विचारप्रणाली | प्रा. रमेश शहा |
| ४) | ३–१०–८६ | कार्लमार्क्सचे आर्थिक विचार | प्रा. सौ. विनिता कुलकर्णी |
| ५) | ४–१०–८६ | लीस्टचा आर्थिक राष्ट्रवाद | प्रा. मुकुंद महाजन |

दुसऱ्या सत्रात नियोजन–चर्चा–मंडळाने अनेक उपक्रम पार पाडण्याचे निश्चित केले होते तथापि पुणे विद्यापीठाकडून परीक्षा लवकर घेण्यासंबंधी आलेल्या परिपत्रकामुळे या समितीतील सर्व प्राध्यापकांना आपापले अभ्यासक्रम पूर्ण करण्याकडे लक्ष केंद्रीत करणे भाग पडले. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून उपयुक्त होईल या उद्देशाने दि. १७ जानेवारी १९८७ रोजी गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अ‍ॅन्ड इकॉनॉमिक्समधील एक नामवंत प्राध्यापक डॉ. एस्. जी. बापट यांचे 'समाजवादाचे नवीन प्रतिमान' या विषयावर अतिशय विद्वत्ताप्रचुर परंतु मनोरंजक असे व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. बापट यांनी हंगेरी व अन्य काही समाजवादी देशांना प्रत्यक्ष भेटी दिलेल्या असल्यामुळे त्यांनी मांडलेल्या अत्यंत वस्तुनिष्ठ आणि जिवंत विचारांनी विद्यार्थी अतिशय प्रभावित झाले. हा व्याख्यानाचा कार्यक्रम साहित्यसंघटना व नियोजन–चर्चा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. साहित्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. द. दि. पुंडे यांचे मनःपूर्वक आभार. नियोजन चर्चा मंडळाच्या सर्व उपक्रमांना प्रॉ. नवलगुंदकर, डॉ. पाथरे यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. या व्यतिरिक्त मंडळाच्या कार्यक्रमासाठी ज्यांचे सहकार्य लाभले त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

**मुकुंद महाजन**
कार्याध्यक्ष

## पदभ्रमण मंडळ

या शैक्षणिक वर्षात पदभ्रमण मंडळाच्यावतीने चार पदभ्रमणे व चार 'हिमालयातील पदभ्रमण–पूर्वतयारी–सराव सत्रे' आयोजित करण्यात आली. पदभ्रमण मंडळाच्या सभा गेल्या वर्षी सुरू झालेल्या प्रथेनुसार विधी महाविद्यालयाच्या टेकडीवर आयोजित करण्यात आल्या. 'गढवाल हिमालयातील पदभ्रमण' व 'सायलेंट व्हॅलीतील पदभ्रमण' या विषयावर दोन पारदर्शिका प्रदर्शनेही (slide shows) यावर्षी आयोजित करण्यात आली. पदभ्रमण मंडळाच्या या वर्षातील सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद समाधानकारक होता.

या वर्षातील पदभ्रमणे व सराव सत्रे खालील प्रमाणे आयोजित करण्यात आली.

| पदभ्रमण | दिनांक | सहभागी सभासदांची संख्या |
|---|---|---|
| १) भाजे–विसापूर–लोहगड | २३ जुलै १९८६ | ३८ |
| २) खानापूर–सिंहगड | ३ ऑगस्ट १९८६ | ४२ |
| ३) तिकोना | १३, १४ सप्टेंबर १९८६ | २० |
| ४) पांडवगड | १६ नोव्हेंबर १९८६ | ८ |
| ५) सराव सत्र १ | १४, १५ डिसेंबर १९८६ | ८ |
| ६) ,, २ | १९, २० डिसेंबर १९८६ | ८ |
| ७) ,, ३ | २७, २८ डिसेंबर १९८६ | ६ |
| ८) ,, ४ | ३, ४ जानेवारी १९८७ | ६ |

विद्यापीठाच्या परीक्षा यावर्षी लवकर असल्याने विद्यापीठीय पदभ्रमण आयोजित होऊ शकले नाही. यावर्षीच्या सुट्टीत गेल्या तीन वर्षातील नियमितता ध्यानात घेऊन काही सदस्यांना हिमालयातील गिर्यारोहणतंत्रांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी इन्स्टिटयूट ऑफ माऊंटेनिअरींग अ‍ॅन्ड अलाइड स्पोर्टस् मनाली या संस्थेत पाठविण्याचा प्रस्ताव आहे. या सदस्यांची निवड काही वस्तुनिष्ठ कसोटचा आणि सदस्यांचा गेल्या २/३ वर्षातील प्रत्यक्ष अनुभव यानुसार केली जाईल.

यावर्षीच्या पदभ्रमण मंडळाच्या विविध उपक्रमात नितीन खममकर, रवींद्र लाळे, सदानंद दाते, श्रीधर पिसाळ, मोहन काळे, अभय रानडे, किरण कवळे, मनोज औटी, व सतीश भालेराव यांचा सहभाग उल्लेखनीय होता. प्रा. सिताराम रायकर व प्रा. तुकाराम निकम यांचे मार्गदर्शनाचा लाभ पदभ्रमण मंडळास झाला.

**–प्रा. महेंद्र गोहेल, प्रा. सुनिल दाढे**

## पदव्युत्तर विद्यार्थी संघटना

प्रा. शहा, प्रा. दाढे, प्रा. विनीता कुलकर्णी यांच्या मदतीने संघटनेचे कामकाज पार पाडण्यात आले. संघटनेतर्फे यावर्षी वाणिज्य अभ्यासक्रमाला पूरक अशी विविध विषयांवरची व्याख्याने आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना वाणिज्य क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन लाभावे या हेतूने खालीलप्रमाणे व्याख्याने आयोजित केली होती.

| विषय | व्याख्याने |
|---|---|
| 1) Financial Inplications of Expansion and failure | Prof. Nulkar |
| 2) Co-operative Marketing | Prof. Kamat |
| 3) Management of co-operative sector | Prof. Kamat |
| 4) Industrial Productivity | Prof. Dastane |

संघटनेतर्फे Commerce Education Expectations and Realities या विषयावर निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली. महाराष्ट्र बँकेच्या संगणक केंद्राला भेट दिली.

**डॉ. भारती डोळे**
कार्याध्यक्ष

## माजी विद्यार्थी संघटना

मॉडर्न महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा वार्षिक मेळावा दि. २६ जाने. १९८७ रोजी संपन्न झाला. मेळाव्यास सुमारे दीडशे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. सौ. राहणे यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केल्यानंतर प्राचार्यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी माजी विद्यार्थी व महाविद्यालय यांचे परस्परसंबंध व सहकार्य संवर्धित करण्याचे आवाहन केले. आजी विद्यार्थ्यांनी 'हम नही सुधरेंगे' या एकांकिकेचा प्रयोग सादर केला. परस्पर परिचय, प्राध्यापकांशी हितगुज, अल्पोपहार याचेही आयोजन करण्यात आले होते.

माजी विद्यार्थी संघटनेतर्फे समाज प्रबोधन व्याख्यानमाला एप्रिल महिन्यात आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.

**–प्रा. अ. गो. गोसावी**
कार्याध्यक्ष

## कर्नावट करंडक आंतर–महाविद्यालयीन वादस्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही 'श्री फुलचंद बाळचंद कर्नावट करंडक आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा' दि २२ सप्टेंबर १९८६ रोजी मोठ्या उत्साहाने संपन्न झाली. पुणे व पुण्याबाहेरील एकूण ११ महाविद्यालयाच्या २२ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. या वर्षी प्रथमच ही स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली. हे स्पर्धेचे आठवे वर्ष होते.

'धार्मिक उत्सवांचे स्वरुप सार्वजनिक नसावे' हा वाद स्पर्धेचा प्रस्ताव होता. स्पर्धेचे उद्घाटन मा. एस्. के. कुलकर्णी (संपादक, दैनिक सकाळ, पुणे) यांचे हस्ते झाले. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. सु. न. तवले (प्र–पाठक, राज्यशास्त्रविभाग, पुणे विद्यापीठ) व कु. राणी पारसनीस यांनी काम पाहिले.

कर्नावट मानचिन्ह जिकण्याचा मान दुसऱ्यांदा आपल्या मॉडर्न महाविद्यालय, पुणे या संघाने मिळविला. या विजयी संघात श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला व कु. मेघना मधुमिलिंद देशपांडे, द्वि. व. शास्त्र हे स्पर्धक होते.

प्रथम पारितोषिक श्री. किशोर सोपानराव ढमाले, १२ वी कला ( मॉडर्न महाविद्यालय, पुणे ) रुपये १५०/– रोख.

द्वितीय पारितोषिक कु. श्रुती तांबे, (स. प. महाविद्यालय, पुणे) रु. १००/– रोख,

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके– श्री सुहास ठाकूरदेसाई (अभियांत्रिकी, पुणे) श्री. माधव हुंडेकर (वास्तुविद्या, पुणे), श्री. आनंद जोशी (बी. जे. वैद्यकीय, पुणे) श्री. गजानन भिडे (अभियांत्रिकी, पुणे) कु. मेघना देशपांडे (मॉडर्न. पुणे)

या स्पर्धेसाठी मा. प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर, उपप्राचार्य पद्माकर आपटे, प. स. चिरपुटकर, उपप्राचार्य डॉ. अशोक पाथरे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. राजीव कुलकर्णी, प्रा. यशवंत सुमंत, प्रा. सुनील दाढे, प्रा. निर्मला मोने, प्रा. अरुण दांडेकर, प्रा. विलास आल्हाट, प्रा. मानसिंग साळुंके, प्रा. जगदीश चिंचोरे, डॉ. वि. भा. देशपांडे, प्रा. सीताराम रायकर, प्रा. जयवंत अहिवळे, कलामंडळातील व अन्य सहकारी प्राध्यापक, सर्व कर्मचारी वर्ग यांनी स्पर्धेच्या यशस्वितेसाठी अतिशय परिश्रम घेतले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**प्रा. गीताराम गायकवाड**
कार्याध्यक्ष

## ग्रंथालय अहवाल

फेब्रुवारी १९८७ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ४३००० झाली. वरील ग्रंथांबरोबरच एकूण ६० नियतकालिके आणि पुणे व मुंबई येथील जवळजवळ सर्व मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे ग्रंथालयासाठी घेतली जातात.

विद्यापीठ अनुदान पुस्तक पेढी योजनेतून यंदा १७० पुस्तक संच विद्यार्थ्यांना विनामूल्य देण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत खुली ठेवण्यात आली.

१९८६–८७ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयाने ग्रंथालय शास्त्र हा विषय कनिष्ठ महाविद्यालयात सुरू केला.

खाली नमूद केलेल्या व्यक्ती व संस्था यांनी यावर्षी ग्रंथालयाला ग्रंथ भेट दिले.

१) प्राचार्य शं. ना. नवलगुंदकर
२) प्रा. अ. बा. दांडेकर
३) प्रा. वाय्. एम्. सुमंत
४) प्रा. वैशंपायन
५) प्रा. नरेंद्र नायडू
६) प्रा. सौ. नवाथे
७) प्रा. सौ. व्ही. एस्. कुलकर्णी
८) प्रा. श्रीमती लीला गोळे
९) श्री. पी. एस्. पंडित
१०) श्री. एम्. पी. नारायण
११) श्री. दिवेकर
१२) श्री. चव्हाण
१३) सौ. निंबकर
१४) शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य
१५) एल् पी. प्रोग्रॅम, पुणे विद्यापीठ
१६) हिन्दी विभाग, पुणे विद्यापीठ
१७) सोमय्या प्रकाशन
१८) मॅकमिलन कंपनी
१९) फडके प्रकाशन
२०) दास्ताने प्रकाशन
२१) डायमंड बुक सेंटर

**द. गो. बापट**
ग्रंथपाल

# भूगोल विभाग

## भौगोलिक अभ्यास सहल वृत्तान्त

(१) २० डिसेंबर १९८६ रोजी इ. ११ वी (ब) साहित्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी बालेवाडी या ग्रामीण वस्तीचे भौगोलिक सर्वेक्षण प्रा. मानसिंग साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली केले. पुणे परिसरातील उपनागरी प्रभावाखालील भौगोलिक घटकांचे विशेष अध्ययन या सर्वेक्षणात प्रामुख्याने करण्यात आले.

(२) २४ डिसेंबर १९८६ रोजी इ. ११ वी (अ) साहित्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी नारायण पेठ या पुरंदर किल्ले परिसरातील ग्रामीण वस्ती सर्वेक्षण प्रा. विलासराव आल्हाट यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भौगोलिक घटकांचे विश्लेषण या सर्वेक्षणाद्वारे करण्यात आले.

(३) २८ डिसेंबर १९८६ रोजी इ. ११ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी व द्वितीय वर्ष कला शाखेच्या भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी चऱ्होली या पुणे–आळंदी परिसरातील ग्रामीण वस्ती सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात पुणे नगराचा तीव्र नगरप्रभाव, वस्तीतील व्यवसायश्रेणीवर व प्रमाणावर आढळला. मात्र पिण्याच्या पाण्याचे स्वरूप दूषित आढळले. प्रा. रामचंद्र झगडे यांनी मार्गदर्शन केले.

बालेवाडी, नारायण पेठ व चऱ्होली या ग्रामीण वस्ती सर्वेक्षणात भौगोलिक स्थान, भूरचना, जलवाहन, मृदा या घटकांबरोबरच मानवाचे आर्थिक व सामाजिक गुणधर्म यांच्या आंतरसंबंधांचा व क्रिया–प्रक्रियाचा विशेष अभ्यास करण्यात आला. ग्रामीण वस्त्यातील मानवी जीवनाच्या अत्यावश्यक सेवा–सुविधांचे परीक्षण करून नियोजनासाठी ग्रामीण समस्यांचे अग्रक्रमानुसार भौगोलिक विश्लेषण करण्यात आले.

(४) ४ जानेवारी १९८६ रोजी इ. १२ वी (अ व ब) साहित्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी थेऊर सहकारी साखर कारखान्यास प्रा. आल्हाट व प्रा. साळुंके यांच्या संयोजनाखाली अध्ययन–भेट दिली. नाशवंत कच्चा माल, भारऱ्हास उद्योग व भौगोलिक अंतर या घटकांचे साखर उद्योगाच्या दृष्टीने अध्ययन करण्यात आले.

(५) द्वितीय वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र विज्ञान वर्धिनी पुणे, या संशोधन–प्रकल्प संस्थेस अभ्यास–भेट दिली. या अभ्यास–भेटीत जैविक संशोधनातील नवनवीन प्रयोग, निष्कर्ष, समस्या, गोबरगॅस निर्मिती प्रकल्प, प्रदूषण नियंत्रण विषयक प्रयोगांचे निरीक्षण व अध्ययन प्रा. अहिरराव व सौ. वेगस यांच्या संयोजनाखाली केले.

(६) २७ डिसेंबर ते ३० डिसेंबर १९८६ या काळात तृतीय वर्ष साहित्य शाखेच्या भूगोल विशेष विषयाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल रत्नागिरी–पुळे परिसरात आयोजित केली होती. या अभ्यास सहलीत सह्याद्री परिसरातील भूरचना, भूरूपे, नदीप्रणाली, मृदा, वनस्पती व मानवी जीवन यांचे निरीक्षण व अध्ययन करण्यात आले. रत्नागिरी किनाऱ्यावरील सागरी लाटांच्या खनन, वहन व भरण कार्यामुळे निर्माण झालेल्या भूविशेषांचा अभ्यास प्रा. वाल्मिकी अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

जानेवारी १९८७ च्या पहिल्या आठवड्यात उपप्राचार्य प्रा. पद्माकर आपटे यांनी १२ वी साहित्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ' परिस्थिती की विज्ञान – अर्थकारण ' या विषयावर उपयुक्त व्याख्यान दिले. तसेच प्रा. वाल्मीकी अहिरराव यांनी ११ वी साहित्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ' ग्रामीण वस्ती सर्वेक्षण – भौगोलिक अंग ' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

## शास्त्र शाखेचा एक आगळा उपक्रम

पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर शास्त्र विभागात इलेक्ट्रॉनिक्स सायन्स हा विषय जून ८५ पासून सुरू झाला. फिजिक्स, केमेस्ट्री, मॅथ्स यासारखा Electronic Science हा वि य असून तृतीय वर्षाला Special Subject म्हणून घेता येण्याची सोय विद्यापीठाने करून दिली आहे. आपल्या महाविद्यालयात या वर्षी प्रथम व लि ६० आणि द्वितीय वर्षाला ४८ विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स सायन्स विषयाला प्रवेश मिळाला आहे. (विद्यापीठाकडून एवढेच विद्यार्थी घ्यावयाची अनुमती आहे.) प्रथमपासूनच इलेक्ट्रॉनिकबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात कमालीचे औत्सुक्य दिसत होते. नेमके ८५ सालापासून सत्र पद्धती बंद झाल्यामुळे विद्यार्थी परीक्षांच्या कचाटचातून थोडे मुक्त झाले होते. यामुळे प्रयोगशाळेत जास्त वेळ थांबणे, विषयाची अधिक माहिती करून घेणे याकडे त्यांचा कल दिसू लागला होता. अधिक परिश्रम करण्याची तयारीही विद्यार्थ्यांमध्ये आढळून येत होती.

१९८६ च्या प्रथम सत्रात ' इलेक्ट्रॉनिक्स ' या विषयाला नजिकच्या भविष्यकाळात किती महत्त्व आहे, हा विषय कशा पद्धतीने शिकवावा याची माहिती करून देण्यासाठी पुणे विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान व इलेक्ट्रॉनिक सायन्स विभागाने या विषयाशी निगडित अशा महाविद्यालयीन प्राध्यापकांची एक सभा बोलावली. या सभेत इलेक्ट्रॉनिक्स विषय घेऊन बाहेर पडणाऱ्या शास्त्र पदवीधर विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत बराच ऊहापोह झाला. विशेषत: या पदवीच्या अभ्यासक्रमाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला हवे असा चर्चेचा सूर होता. जवळपासच्या इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाच्या अपेक्षा काही अंशी पूर्ण करणारा अभ्यासक्रम असावा. चाकोरीबद्ध अभ्यासक्रमाच्या बाहेरचे शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे. असे विचार अनेक प्राध्यापकांनी या सभेत मांडले. यातूनच विद्यार्थ्यांना ' औद्योगिक क्षेत्रातील अनुभव ' देण्याची कल्पना पुढे आली. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुटीत जवळपासच्या इलेक्ट्रॉनिक्सच्या छोट्या / मोठ्या कारखान्यात किमान एक महिना काम करावे व ' प्रत्यक्ष अनुभवाने ' आपला अभ्यास समृद्ध करावा, असे सर्वसाधारण स्वरूप या कल्पनेचे होते.

आपल्या महाविद्यालतील पदार्थ विज्ञान विभागाने ही कल्पना सर्वात प्रथम उचलून धरली व तिला मूर्त स्वरूप देण्याचे ठरवले. त्याप्रमाणे साधारण सप्टेंबर महिन्यात द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना वर्गात याची जाहीर कल्पना दिली. त्यावेळी एक गोष्ट अगदी स्पष्ट केली व ती म्हणजे विद्यार्थ्यांना कारखान्यातील प्रत्यक्ष अनुभव घेणे हे अनिवार्य नाही. प्रत्येकाने ते केलेच पाहिजे असे नाही. परंतु जे विद्यार्थी आपणहून सुटीमध्ये अशा कामांना जातील त्यांना याबद्दल 'बोनस' गुण मिळतील. या औद्योगिक प्रशिक्षण/अनुभवासाठी एखाद्या कारखान्यात जाऊन परवानगी काढणे, त्यांच्या व आपल्या सोईचे दिवस ठरवणे या गोष्टी विद्यार्थ्यांनीच करावयाच्या – तोही प्रशिक्षणाचा एक भाग आहे. वर्गात हेही सांगितले की, इच्छुक विद्यार्थ्याला महाविद्यालयातर्फे अधिकृत प्रमाणपत्र दिले जाईल.

इलेक्ट्रॉनिक्स विषय शिकवणारे प्राध्यापक मधून–मधून विद्यार्थ्यांना या उपक्रमाची आठवण सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात करीत होते. विद्यार्थ्यांनी या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिला. सुमारे महिन्याभराच्या काळात १५–२० उत्साही विद्यार्थ्यांनी आपापल्या हिंमतीवर अशा प्रकारचा 'अनुभव' देणारे कारखाने शोधून काढले. व्यवस्थापकांकडे जाऊन त्यांची अनुमती आणली. या सर्वांना महाविद्यालयातर्फे प्रमाणपत्रे देण्याचे काम पदार्थविज्ञान विभागाने केले आणि दिवाळीच्या सुटीत हे विद्यार्थी वेगवेगळ्या कारखान्यातून दाखल झाले. शास्त्र-शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'औद्योगिक अनुभव' देण्याचा आगळा उपक्रम सुरू करण्यात मॉडर्न महाविद्यालय अग्रेसर ठरले.

द्वितीय सत्राच्या सुरुवातीला या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव प्राध्यापकांना व इतर विद्यार्थी मित्रांना सांगितले. काही जणांचे कारखान्यात चांगले स्वागत झाले. व्यवस्थापकीय स्तराच्या व्यक्तींनी या विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणात रस घेतला. त्यांना कारखान्यात चालणाऱ्या वेगवेगळ्या प्रक्रियांची माहिती दिली. याउलट काही विद्यार्थ्यांना अगदी उलटा अनुभव आला. त्यांना प्रशिक्षणाऐवजी सुशिक्षित कामगारांप्रमाणे वागणूक मिळाली. त्यांच्याकडून ठराविक साच्याचे काम जास्तीत जास्त करवून घेण्यात आले तेही अगदी ठोकळेबाजपणाने. अशा प्रकारचा अनुभव अगदी थोड्या विद्यार्थ्यांनाच आला. बाकी इतर मंडळी कारखान्याशी जवळून आलेल्या संपर्कावर समाधानी होती. त्यातून आपल्याला काहीतरी फायदा होतोय म्हणून असा उपक्रम जरूर राबवावा असंच सर्वसाधारण विद्यार्थ्यांचे मत होते.

पदार्थविज्ञान विभागाने केलेला हा पहिला प्रयोग यशस्वी झाला आहे असे या विद्यार्थ्यांच्या अनुभवावरून वाटते. प्रत्येक विषयात प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या सोईनुसार अशा प्रकारचे उपक्रम करता येतील. त्यासाठी अभ्यासक्रमात तशी तरतूद असण्याची जरूरीही नाही. आजच्या काळाला काय आवश्यक आहे, नव्या पदवीधरांकडून समाजाच्या काय अपेक्षा आहेत याचे ज्ञान या उपक्रमातून मिळेल व त्यातून शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास निश्चित उपयोग होईल.

**डॉ. सुलभा देऊसकर**
(पदार्थविज्ञान विभाग)

## वार्षिक स्नेहसंमेलन १९८७

दुष्काळी परिस्थितीच्या तीव्रतेचा विचार करता, या वर्षी स्नेहसंमेलनावरील खर्च कमी करावा आणि मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळ निधीस मदत करावी असे आवाहन विद्यापीठाने सर्व महाविद्यालयांना केले होते. त्यानुसार प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी विद्यार्थी–प्रतिनिधींची बैठक घेऊन स्नेहसंमेलन साधेपणाने साजरे करण्याचे आणि दुष्काळनिधीसाठी मदत गोळा करण्याचे आवाहन केले.

दिनांक २३ व २४ जानेवारी १९८७ या दोन दिवशी झालेले या वर्षीचे संमेलन काही बाबतीत वेगळे आणि वैशिष्टयपूर्ण ठरले. बाहेरच्या कलाकारांना तसेच ध्वनिवर्धकांच्या वापरास मुळीच वाव दिला गेला नव्हता. प्रत्येक वर्गाचे स्वतंत्र गुणदर्शन कार्यक्रम योजले होते. यामुळे प्रत्येक वर्गातील कलाकारांना एक आव्हान मिळून अनेकांनी कल्पकतेने विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. आनंदमेळ्याचा कार्यक्रमही फक्त दुपारी अडीच तास एवढ्याच काळात अत्यंत शिस्तबद्धरीतीने पार पडला.

दुष्काळनिधीस व्यक्तिशः मदत करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार वरिष्ठ महाविद्यालयात सर्वाधिक रक्कम (रु. २२४–००) तृतीय वर्ष वाणिज्य (ब) या वर्गाने; तर कनिष्ठ महाविद्यालयातील १२ कला (ब) या वर्गाने (रु. २०५–००) जमा करून दिली. या दोन दिवसात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयात मिळून एकूण सुमारे ३ ७५० रुपये दुष्काळ निधीसाठी गोळा झाले.

सर्व प्राध्यापक आणि सर्व विद्यार्थी–प्रतिनिधी यांच्या संपूर्ण व उत्स्फूर्त सहकार्यामुळे तसेच शिस्तबद्ध व नियोजनपूर्व कार्यवाहीमुळे हे स्नेहसंमेलन यशस्वीपणे आणि सुरळीतपणे पार पडले. विद्यापीठ प्रतिनिधी श्री. संजय बनकर तसेच क्रीडा प्रतिनिधी श्री. पी. व्ही शिरोळे आणि कु. माधवी भावे यांनी पुढाकार घेऊन संमेलनाचा साधेपणा आणि शिस्त टिकवूनही आनंद कसा मिळविता येतो हे दाखवून देण्याच्या बाबतीत अन्य विद्यार्थी–प्रतिनिधींच्या सहकार्याने जे काम केले त्याचा आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे.

**प्रा. मुकुंद महाजन**
कार्याध्यक्ष

## नाटयशास्त्र विभाग

यंदाच्या वर्षी नाटयशास्त्र विभाग नव्याने आरंभित झालेला आहे. नाटयशास्त्राचा रीतसर अभ्यासक्रम महाविद्यालयीन स्तरावर पुण्यात प्रथमच सुरू झालेला आहे. हा अभ्यासक्रम प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) स्तरावरचा होता. ३० विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला. या अभ्यासक्रमामध्ये नाटक आणि रंगभूमी यांतील घटकांची ओळख व्हावी हा मुख्य हेतु होता तो पूर्ण झाला. व्याख्याने, प्रात्यक्षिके, प्रयोग आणि अभ्यास सहल असे या अभ्यासक्रमाचे स्वरूप होते. व्याख्याने–प्रात्यक्षिके यासाठी खालील व्यक्तींना पाचारण करण्यात आले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विजय तेंडुलकर | – | नाटयलेखन |
| २) | दामू केंकरे | – | दिग्दर्शन–नेपथ्य |
| ३) | लक्ष्मण देशपांडे | – | अभिनय |
| ४) | दीनानाथ टाकळकर | – | आवाज–शब्दसंवाद |
| ५) | राजा नातू | – | प्रकाशयोजना |
| ६) | भास्कर चंदावरकर | – | संगीत |
| ७) | प्रभाकर भावे | – | रंगभूषा |
| ८) | लालन सारंग | } | अभिनय प्रात्यक्षिके |
| ९) | यशवंत दत्त | } | आणि व्याख्यान |
| १०) | वि. भा. देशपांडे | – | रंगभूमी इतिहास |
| ११) | अमृता सातभाई, प्रमोद देशपांडे राणी पारसनीस, आनंद मासूर आणि पूर्वा पटवर्धन | } | रंगभूमीविषयक शरीरे व्यायाम–खेळ आणि प्रात्यक्षिके. |

या विद्यार्थ्यांची एक लेखी परीक्षा घेण्यात आली. तसेच त्यांनी प्रात्यक्षिकांच्या परीक्षेसाठी तीन एकांकिका आणि काहींनी व्यक्तिगत अभिनय करून दाखवला. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून या विद्यार्थ्यांची अभ्यास–सहल मुंबईला नेण्यात आली. यामध्ये मुंबईतील एन्. सी. पी. ए., रवींद्र नाटय मंदीर, छबिलदास नाटयगृह, गडकरी रंगायतन इत्यादी नाटयगृहे सविस्तरपणे दाखवण्यात आली. तसेच दोन नाटयप्रयोगही पाहिले. याचबरोबर मुंबई दूरदर्शन केंद्राला भेट देऊन तिथे प्रत्यक्ष ध्वनिमुद्रण-चित्रण पाहिले गेले. ही सहल दोन दिवसांची होती. या अभ्याससहलीसाठी श्री. लिमये यांनी मोठ्या प्रमाणात अर्थसाह्य केल्यामुळे हे शक्य झाले.

या अभ्यासक्रमाचे उद्घाटन ५ सप्टेंबर १९८६ ला श्री· अमोल पालेकर यांच्या हस्ते झाले. सहा महिन्यांचा हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना श्री. नाना पाटेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

यंदाच्या वर्षात विविध प्रकारचे अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरू व्हावेत अशी प्राचार्यांची योजना होती. त्यांच्या प्रोत्साहनाने हा अभ्यासक्रम अखेरपर्यंत नेता आला. प्राचार्यांप्रमाणेच सहकारी प्राध्यापक सर्वश्री राजीव

कुलकर्णी, जगदीश चिचोरे, दत्ता लिमये आणि सौ. अमृता सातभाई यांचे बहुमोल सहकार्य लाभले. तसेच कार्यालयीन कर्मचारी, सेवक यांनी या वेगळया प्रकारच्या अभ्यासक्रमाला सर्वतोपरी मदत केली. या सर्वांचे आभार.

**वि. भा. देशपांडे**

( नाटयशास्त्र विभाग प्रमुख )

## कनिष्ठ महाविद्यालय अहवाल

कनिष्ठ महाविद्यालय समिती ( १९८६–८७ )

अध्यक्ष : उपप्राचार्य प्रा. प. द. आपटे.

सदस्य : प्रा. क. म. गोखले

डॉ. सुलभा देऊस्कर

सौ. शैलजा नवाथे

सौ. वीणा नरगुंद

सौ. वसुंधरा कांबळे.

कनिष्ठ महाविद्यालय वर्ग : कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी व बारावी वर्गांच्या प्रत्येकी दहा तुकडया आहेत. त्यात कलाशाखेच्या चार, शास्त्रशाखेच्या आठ आणि वाणिज्यशाखेच्या आठ अशी विभागणी आहे.

शैक्षणिक कार्याचा प्रारंभ : १९८६–८७ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी माननीय प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचे अभिभाषण झाले. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यानिमित्ताने माननीय प्राचार्यांनी मार्गदर्शनपद भाषण केले.

गौरव समारंभ : बारावी, मार्च १९८६ च्या परीक्षेत कु. नवाथे ही बोर्डात ६ वी आली. तसेच श्री. मुथा याने पदार्थविज्ञान विषयाचे पारितोषिक मिळविले. ह्या दोन्ही गुणवान विद्यार्थ्यांचा, त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला. याच प्रसंगी १२ वी शास्त्र वर्गाच्या स्कॉलर बॅचला शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांना पुस्तक संच : १० वी शालांत परीक्षा, मार्च ८६ मध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त करून आपल्या महाविद्यालयांत इ. ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या निवडक गुणी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या समारंभाचे वेळी इ. ११ वी च्या क्रमिक पुस्तकांचे संच विद्यार्थ्यांना देण्यात आले.

महाविद्यालयीन स्पर्धा : महाविद्यालयांत दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या महाविद्यालयांतर्गत एकांकिका, नाटयवाचन, अभिनय व कथाकथन या स्पर्धांमध्यें कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग बहुसंख्येने असतो. यावर्षी या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या स्पर्धांचा तपशील व निकाल कलामंडळाच्या अहवालामध्ये दिलेला आहे.

स्कॉलर बॅच : इ. १२ वी शास्त्र वर्गाच्या निवडक विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेत उत्तम यश मिळावे या हेतूने 'स्कॉलर बॅच' हा उपक्रम केला जातो. एप्रिल–मे १९८६ या सुट्टीच्या काळात रोज स. १०–३० ते सायं. ४ या वेळेत अध्ययन, अध्यापन केले गेले. जून ८६ पर्यंत ५० टक्क्याहून अधिक अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला व ऑक्टोबर ८६ अखेर संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. बोर्डाच्या धर्तीवर चांचण्या व परीक्षा घेण्यात आल्या.

यंदाचे वर्षी प्रथमच वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलर बॅच सुरू करण्यात आली. १२ वी वाणिज्यमधील प्रत्येक विषयाचे जादा तास घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच तीन चांचण्या घेतल्या गेल्या.

'स्कॉलर बॅच' उपक्रमासाठी खालील प्राध्यापकांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले.

| | |
|---|---|
| रसायन शास्त्र | : प्रा. रा. ग. लिमये, प्रा. क. म. गोखले, सौ. जयश्री कुलकर्णी, सौ. गौरी चाफेकर, श्री. गोहेल. |
| भौतिकशास्त्र | : प्रा. गंभीर, श्री. घैसास, श्री. वैशंपायन. |
| वनस्पतिशास्त्र | : डॉ. अ. के. पांडे, सौ. मंगला शिंदे, सौ. रंजना देव. |
| प्राणीशास्त्र | : प्रा. अ. बा. दांडेकर, सौ. अमृता साताभाई, सौ. चारूलता बुटाला, कु. नीता भोसले. |
| गणित | : प्रा. चिरपुटकर, प्रा. चंद्रकांत कुलकर्णी, सौ. प्रमिला चिकटे, सौ. शैलजा नवाथे. |
| वाणिज्य विभाग | : कै. सौ. गोडबोले, सौ. नरगुंद, श्री. जयंत जोर्वेकर. |
| मराठी | : सौ. सिधये. |
| इंग्रजी | : श्री. राजीव कुलकर्णी. |
| हिंदी | : श्री. माळवे. |
| जर्मन | : सौ. पटवर्धन. |
| अर्थशास्त्र | : श्री. दत्ता लिमये. |

इ. ११ वी वाणिज्यमधील निवडक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा उपक्रम करण्यात आला. लहान प्रकल्प तयार करणे व औद्योगिक सहल या गोष्टी करण्यात आल्या. ह्या उपक्रमासाठी प्रा. दातार, प्रा. गोसावी, डॉ. मित्र, प्रा. दाढे, सौ. राहाणे व सौ. जोग यांचे सहकार्य लाभले.

इ. ११ वी मधील मराठी साहित्याची आवड असलेल्या निवडक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांची अभिरुची वाढण्यासाठी, त्यांन सौ. सिधये, श्रीमती मोने यांनी मार्गदर्शन केले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांना सहकार्य करणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे हार्दिक आभार. तसेच वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल माननीय प्राचार्य डॉ. नवलगुंदकर, उपप्राचार्य चिरपुटकर, डॉ. पाथरे यांचे आभार मानतो.

तसेच कार्यालय कुलसचिव, अधीक्षक, कार्यालयीत कर्मचारी व सेवकवर्ग यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

**प्रा. पद्माकर आपटे**
उपप्राचार्य

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती (१९८६–८७)

| | |
|---|---|
| १) कु. यादव शोभा मारुती | १२ वी सायन्स |
| २) कु. गीते विनया अरविंद | १२ वी कॉमर्स |
| ३) कु. पवार सुषमा लक्ष्मण | एफ्. वाय्. बी. एस्सी. |
| ४) श्री. वडगांवकर गणेश पुरुषोत्तम. | –,,– |
| ५) श्री. सोन्ना संजीव व्यंकटेश. | एफ्. वाय्. बी. कॉम. |
| ६) कु. औटी अंबू दशरथ. | एस्. वाय्. बी. एस्सी. |
| ७) श्री. पुरोहित तुषार विनायक. | –,,– |
| ८) कु. जेरे वंदना वामन. | टी. वाय. बी. एस्सी. |
| ९) श्री. भोजवाणी महेश नारायण | टी. वाय. बी. कॉम. |

## राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (१९८६–८७)

| | |
|---|---|
| १) श्री. अपशेटे सोमकांत केशव. | ११ वी सायन्स |
| २) श्री. पारगी मंदार सुधाकर. | –,,– |
| ३) श्री. बारगळ अविनाश माणिकराव. | १२ वी सायन्स. |
| ४) कु. भालेराव कल्पना दत्तात्रय. | –,,– |

| | | |
|---|---|---|
| ५) | श्री. हिरवे गणेश केशव. | –„– |
| ६) | कु. कुलकर्णी मृणाल भालचंद्र | –„– |
| ७) | श्री तांबोळी नसीर गुलाबभाई | –„– |
| ८) | कु. पासी अनिता सुखनाथ. | एफ. वाय. बी. एस्सी. |
| ९) | कु. ठाकूर जयश्री नरेन्द्र | एस. वाय. बी. ए. |
| १०) | कु. गवसणे मीनाक्षी रेणवसिद्ध. | एस. वाय. बी. एस्सी. |
| ११) | कु. फडके जयश्री श्रीधर. | एस. वाय. बी. कॉम. |
| १२) | श्री. दिवेकर प्रशांत बळवंत | टी. वाय. बी. एस्सी. |
| १३) | कु. केसरी सविता प्रभाकर. | –„– |
| १४) | कु. नाव मंजिरी वसंत | –„– |
| १५) | कु. शाह बिल्कीशबानू हनीफ | –„– |
| १६) | श्री. शिर्के धवल शिवाजी. | –„– |
| १७) | कु. इंगळे प्रज्ञा जगन्नाथ. | टी. वाय. बी. कॉम. |
| १८) | कु. करंदीकर सुनीलता गंगाधर | –„– |

**राष्ट्रीय शिष्यवृत्ती (कनिष्ठ महाविद्यालय)**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. केसकर लक्ष्मीकांत पुरुषोत्तम. | १२ वी सायन्स |
| २) | कु. साळुंके विद्या अशोक. | १२ वी सायन्स. |

**राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पारसनीस रमेश नीलकंठ. | १२ वी सायन्स |
| २) | श्री. जाधव रामदास धोंडिबा. | एफ. वाय. बी. एस्सी. |
| ३) | कु. शेवाळकर निलिमा प्रभाकर. | –„– |
| ४) | श्री. जोशी राजेश सुरेश. | –„– |
| ५) | श्री. तिवारी अनिलकुमार शीतलप्रसाद. | –„– |
| ६) | कु. चौधरी कल्पना रामचंद्र | –„– |
| ७) | कु. दोदण्णवार सुधा शिवन्नसाप्पा. | –„– |
| ८) | कु. सापटणेकर सुहासिनी विनायक. | –„– |
| ९) | कु. पवार मनीषा भगवंतराव. | एस. वाय. बी. एस्सी. |

**शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती (१९८६–८७)**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. थोरात बाळू त्र्यंबक. | ११ वी सायन्स (१९८५–८६) |
| २) | श्री. कुंभार संगीता दगडू. | एफ. वाय. बी. एस्सी. |

**भारत सरकारची क्रीडा शिष्यवृत्ती (१९८६–८६)**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. जोशी सीमा प्रभाकर. | एम. कॉम. पार्ट–१ |
| २) | कु. लोखंडे संगीता शशिकांत. | –„– |

**भारत सरकारची हिंदी शिष्यवृत्त (१९८६–८७)**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. उपाध्ये प्रतिभा श्रीनिवास, | टी. वाय बी. ए. |

**प्राथमिक–माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती–८६–८७**

| | | |
|---|---|---|
| १) | कु. मुसळे संध्या गुरुनाथ. | एफ. वाय. बी. एस्सी. |

**प्रज्ञावान विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती (१९८६–८७)**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पारसनीस राजेश नीलकंठ. | १२ वी सायन्स. |
| २) | कु. रेखा नारायण | ११ वी सायन्स. |

## ई. बी. सी. शिष्यवृत्ती (१९८६–८७)

| | |
|---|---|
| १) श्री. रावडे उमेश भगवंत. | १२ वी आर्टस् |
| २) श्री. भणगे सुनील लक्ष्मण. | १२ वी सायन्स |
| ३) श्री. टकळे महेंद्र दत्तोबा. | –,,– |
| ४) श्री. खोपकर राजेंद्र नामदेव. | १२ वी कॉमर्स |

## स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत ८६–८७

| | |
|---|---|
| १) श्री. देशपांडे ओंकार शंकर. | १२ वी कॉमर्स |
| २) कु. पाटील श्यामला रामचंद्र. | टी. वाय. बी. कॉम. |

## सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत – ८६–८७

| | |
|---|---|
| १) श्री. कुशवाटा नरेन्द्रसिंग | ११ वी कॉमर्स |
| २) श्री. गुजर सुशिलकुमार प्रल्हाद. | १२ वी कॉमर्स |
| ३) श्री. चमलेगी समशेरसिंग भूपालसिंग | १२ वी कॉमर्स |
| ४) कु. बिश्वास शीला मनोरंजन | एफ. वाय. बी. एस्सी. |
| ५) श्री. रॉय रणजितकुमार चन्द्रभान. | –,,– |
| ६) कु. औटी नीता बापू. | एफ. वाय. बी. कॉम. |

**(१) ई. बी. सी. फी सवलत १९८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – १३८ वरिष्ठ महाविद्यालय – ५७९

**(२) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत ८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – ४६ वरिष्ठ महाविद्यालय – ८६

**(३) एस्. एस्. सी. डी. एड. शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत ८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – ०१ वरिष्ठ महाविद्यालय – ०५

**(४) महाविद्यालयीन शिष्यवृत्ती ८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – ७५ वरिष्ठ महाविद्यालय – १५५

**(५) महाविद्यालयीन फी सवलत ८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – वरिष्ठ महाविद्यालय – ०३

**(६) माजी सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत १९८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – ०८ वरिष्ठ महाविद्यालय – ४१

**(७) भारत सरकारची शिष्यवृत्ती (मागासवर्गीय) १९८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – ७१ वरिष्ठ महाविद्यालय – ११५

**(८) महाराष्ट्र राज्य शासनाची फी सवलत ८६–८७ (मागास विद्यार्थी)**
कनिष्ठ महाविद्यालय – ९० वरिष्ठ महाविद्यालय – १०१

**(९) मुलींना मिळणारी मोफत शिक्षण योजना १९८६–८७**
कनिष्ठ महाविद्यालय – ७३९

## कनिष्ठ महाविद्यालय – नवीन नेमणुका (१९८६–८७)

| | |
|---|---|
| (१) सौ. सरोज अशोक पटवर्धन | जमन विषय |
| (२) श्री. दत्तात्रय लक्ष्मण लिमये | अर्थशास्त्र विषय |
| (३) सौ. नीता रमेश जोशी | अर्थशास्त्र विषय |
| (४) श्री. मानसिंग सदाशिव साळुंके | भूगोल विषय |
| (५) श्री. रामचंद्र विठ्ठल झगडे | भूगोल विषय |

| | | |
|---|---|---|
| (६) | श्री. अनिल यमू वानकलस | रसायनशास्त्र विषय |
| (७) | श्री. दत्तात्रय कृष्णाजी दातरंगे | भौतिकशास्त्र |
| (८) | कु. मंजिरी दत्तात्रय सप्तर्षी | भौतिकशास्त्र |
| (९) | सौ. मंगल दीपक भोपटकर | गणित विषय |
| (१०) | सौ. शुभदा शशिकिरण सोनटक्के | गणित विषय |
| (११) | सौ. कल्पना अरविंद रायरीकर | वाणिज्य विषय |
| (१२) | सौ. मानसी उदय जोग | वाणिज्य विषय |
| (१३) | श्री. विनय मुरलीधर शेरीकर | शारीरिक शिक्षण विषय |
| (१४) | श्री. दत्तात्रय गोविंद बापट | ग्रंथालयशास्त्र |
| (१५) | श्री. रविंद्र अंबादास मुळे | संस्कृत विषय |
| (१६) | सौ. सविता प्रदीप दातार | जीवशास्त्र विषय |

## वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| (१) | कु. गौरी शरद पाटील | वनस्पतीशास्त्र विषय |
| (२) | श्री. नरेंद्र मधुकर नायडू | जीवशास्त्र विषय |
| (३) | सौ. मंगल दिपक भोपटकर | गणित विषय |
| (४) | श्री. गीताराम परशुराम गायकवाड | राज्यशास्त्र विषय |
| (५) | श्री. सुधीर राजाराम पंडित | वाणिज्य विषय |
| (६) | श्री. सुरेन्द्र रघुपती कट्टी | वाणिज्य विभाग |
| (७) | श्री. चन्द्रशेखर श्री कंठय्या | कॉम्पुटर सायन्स |
| (८) | श्री. नातू अनिल रघुनाथ | वाणिज्य विभाग |
| (९) | सौ. पद्मजा संजय मेहेंदळे | इंग्रजी विषय |
| (१०) | श्री. विनायक केशव आठवले | गणित विषय |
| (११) | डॉ. सुधीर कृष्णराव उजळंबकर | रसायनशास्त्र विषय |
| (१२) | कु. उषा करुणाकरन केलॉथ | जीवशास्त्र विषय |
| (१३) | श्री. अरुण कोंडीभाऊ वाळुंज | भौतिकशास्त्र विषय |
| (१४) | श्री. दशरथ भिकोबा गायकवाड | " " " |
| (१५) | श्री. बाळकृष्ण भागवत यंगे | " " " |
| (१६) | श्री. शरद रघुनाथ चौधरी | " " " |
| (१७) | सौ. अमृता श्रीकांत कुलकर्णी | वाणिज्य विषय |
| (१८) | सौ. अनिता सतीश साठे | वाणिज्य विषय |
| (१९) | सौ. नंदिनी विवेक एकबोटे | अर्थशास्त्र विषय |
| (२०) | सौ. जानकी ज. गुडलावेलट्टी | अर्थशास्त्र विषय |
| (२१) | सौ. शैला भरतकुमार कोलटकर | मराठी विषय |
| (२२) | श्री. जुगलकिशोर श्रीनिवासी राठी | वाणिज्य विषय |

## अन्यत्र संधी मिळाल्यामुळे महाविद्यालय सोडून गेलेले प्राध्यापक

| | | |
|---|---|---|
| (१) | डॉ. लक्ष्मण ज्योतीक कान्हेकर | जीवशास्त्र विषय |
| (२) | डॉ. स्मिता बळवंत कांबळे | जीवशास्त्र विषय |

(३) कु. उषा करुणाकरन केलॉथ
(४) सौ. अनिता सतीश साठे
(५) सौ. नंदिनी विवेक एकबोटे
(६) सौ. मंगल दीपक भोपटकर

### डीएचई / बी. एड्.

(१) श्री. महेंद्र गिगाभाई गोहेल
(२) श्री. दत्तात्रय लक्ष्मण लिमये

### एम. पी. एड.

(१) विनय मुरलीधर शेरीकर

### ग्रंथालयनशास्त्र पदविका

(१) श्री. विष्णुपंत लक्ष्मण आव्हाड

जीवशास्त्र विषय
वाणिज्य विषय
अर्थशास्त्र विषय
गणित विषय

### पी. एच्‌डी.

(१) प्रकाश दिगंबर कुलकर्णी

### एम्. फील

(१) श्री. प्रदीप श्रीराम कापरे
(२) श्री. प्रकाश चांदमल मुथा
(३) प्रा. सौ. पद्‌मा पिंगळे

□ □






शैक्षणिक आणि कलाक्षेत्रांतील विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्याच्या समारंभात श्री. दीनानाथ टाकळकर भाषण करीत आहेत. त्यांच्या डाव्या बाजूस प्राचार्य नवलगुंदकर आणि शिक्षणाधिकारी श्री. सेवेकर.




नाट्यशास्त्र विभागाच्या प्रमाणपत्र-प्रदान समारंभ प्रसंगी प्राचार्य नवलगुंदकर श्री. नाना पाटेकरांचा सत्कार करीत आहेत.

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
## पुणे ५

□ □ □

| | संस्था | स्थापना |
|---|---|---|
| १ | मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ | १९३४ |
| २ | प्राथमिक विद्या मंदिर, पुणे ५ | १९३६ |
| ३ | सर ससून डेव्हीड होस्टेल ( मुलांचे ) | १९४० |
| ४ | पी. ई. एस्. मुलींची प्रशाला | १९४६ |
| ५ | मॉडर्न हायस्कूल, पुणे ८ | १९६७ |
| ६ | शिशु विद्या मंदिर, पुणे ५ | १९६८ |
| ७ | मुलींचे वसतीगृह | १९६८ |
| ८ | मॉडर्न महाविद्यालय | १९७० |
| ९ | शिशु शाळा आणि प्राथमिक इंग्रजी माध्यमाची शाळा ( एन्. सी. एल्. परिसरात ) | १९७६ |
| १० | शिशु शाळा आणि प्राथमिक इंग्रजी माध्यमाची शाळा, पुणे ५ | १९८२ |
| ११ | शिशु विद्या मंदिर आणि प्राथमिक विद्या मंदिर, निगडी | १९८६ |

प्रकाशक : प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे, ४११ ००५

मुद्रक : साप्ताहिक मुद्रण, १२०५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ डिझाईन व निर्मिती / रविमुकुल, ८९२ सदाशिव, पुणे ३०